(डॉ. एन. रामबाबू)
संचालक
सं.ओ.क्र # ०८१३५५०७

स्वाक्षरित
(एन. वासुदेवन)
व्यवस्थापकीय संचालक
सं.ओ.क्र # ०८९४०३१९

स्वाक्षरित
(सीएस सौरव सिंह)
कंपनी सचिव
ए-२२०५३

स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०

## महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

## दिनांक ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या वर्षाकरिता स्वतंत्र रोख प्रवाह विवरणपत्र

| तपशील | २०१९-२० (रु) | | २०१८-१९ (रु) | |
|---|---|---|---|---|
| **(अ) चालू कार्यविधीपासून रोख प्रवाह** | | | | |
| नफातोटयाचे हिशेबानुसार (करपूर्व)नफा | | ४७८९०६४८३ | | १३९७३६१२४० |
| **खालील बाबी करिता समायोजन:-** | | | | |
| घसारा | १११७१७०३ | | १२१४६२१८ | |
| संदिग्ध ऋणाकरीता तरतूद (निव्वळ) | ११९५१८२ | | २२४०७३६ | |
| निर्लेखित केलेली रक्कम | ८३७४८८१ | | १६०११७२ | |
| निर्लेखित रोपवन खर्च | ४२५७०९३४ | | २८१७६७३० | |
| बीज भूखंड विकास खर्चाचे निर्लेखन | १८९६५४ | | २३७०६८ | |
| व्याजाची प्राप्ती (वेगळयाने दर्शविलेली) | (२२८८१८७६३) | | (२२२५९९४०४) | |
| नफातोटयाचे हिशेबात जमा केलेली जास्तीची तरतूद | (२०४०२२१०) | | (१४९५६५) | |
| संपत्ती,यंत्रे व उपकरणाच्या विक्रीवरील नफा | - | | (४४०९८) | |
| वनविभाग/इतर यंत्रणाना रोपवने हस्तांतरीत केल्यामुळे क्षतीपूर्ती दाव्याची प्राप्ती व त्याबाबत किंमतीचे निर्लेखन (निव्वळ) | (७६६३३०४) | | (११०७७५७९१) | |
| | | **(१९३३८१९२२)** | | **(२८९१६६९३४)** |
| **कार्यकारी भांडवल बदलापूर्वी चालू कार्यविधीपासून नफा** | | **२८५५२४५६१** | | **११०८१९४३०६** |
| **खालील बाबी करिता समायोजन:-** | | | | |
| व्यापारी येणे | (२८०३१४१६) | | (१६९८२९५२) | |
| इतर चल/अचल संपत्ती | (११३३६९२०७) | | (१२९६५७९४३) | |
| वस्तुसूची (तयार माल/प्रगतीपथावरील कामे) | (२११९८०६५८) | | (१५१६११६७०) | |
| रोपवने व रोपवाटिका | (७६१००६५७९) | | (६८६४१४०८४) | |
| ऋण / गुंतवणूक | (१८७३३१७५०) | | (२९४९७५३३) | |
| व्यापारी देणे/इतर चल देयता | ४७६११०५६५ | | ७७३३१५०६ | |
| | | **(८२५६०९०४५)** | | **(९३६८३२६७५)** |
| **चालू कार्यविधीपासून रोख उत्पन्न** | | **(५४००८४४८४)** | | **१७१३६१६३१** |
| प्रत्यक्ष कराचे शोधन | | (२५४४४९२७५) | | (३३२०३९३३३) |
| **चालू कार्यविधीपासून निव्वळ रोख अंतप्रवाह / उत्प्रवाह** | | **(७९४५३३७५९)** | | **(१६०६७७७०२)** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(ब) गुंतवणूक कार्यविधीपासून रोख प्रवाह** | | | | |
| संपत्ती, यंत्रे व उपकरणे खरेदी | | (२२५१४२२८) | | (९२३५२२३) |
| मुदत ठेवीची खरेदी | | (२६८२५०११२७) | | (२६९६०२६६२८) |
| मुदत ठेवीपासून प्राप्ती | | २६९६०२६६२८ | | २०९९२४५३९६ |
| संपत्ती, यंत्रे व उपकरणे यांची विक्री | | -- | | ४४०९८ |
| क्षतीपूर्ती दाव्याची प्राप्ती | | ७६६३३०४ | | ११०७७५७९१ |
| व्याजाची प्राप्ती | | २२८८१८७६३ | | २२२५९९४०४ |
| गुंतवणूक कार्यविधीत वापरलेली निव्वळ रोख | | **२२७४९३३३९** | | **(२७२५९७१६२)** |
| **(क) वित्तीय कार्यविधीपासून रोख प्रवाह** | | | | |
| महाराष्ट्र शासनाकडून भागभांडवल | | -- | | -- |
| महाराष्ट्र शासनाकडून/इतर यंत्रणा / कार्यविधी पासून निधी | | ३१४५७३२७४ | | २५७०९७८१९ |
| लाभांश आणि त्यावरील कराचे शोधन | | (४७९२२१००) | | (३५४१६९९४) |
| वित्तीय कार्यविधीत वापरलेली निव्वळ रोख | | **२६६६५११७४** | | **२२१६८०८२५** |
| रोख आणि रोख सममूल्य यामध्ये निव्वळ वाढ/(घट) | | (३००३८९२४५) | | (२११५९४०३९) |
| रोख आणि रोख सममूल्य याचे सुरुवातीचे आधिक्य | | **७४४२३३८५०** | | **९३५८२७८८९** |
| रोख आणि रोख सममूल्य यांचे अखेरचे आधिक्य | | **४४३८४४६०५** | | **७२४२३३८५०** |

**दिनांक ३१.०३.२०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरीता स्वतंत्र रोख प्रवाह विवरणपत्र**

**रोख प्रवाह विवरण पत्रास टिपणी**

(अ) लेखांकन मानक क्र. ७ "रोख प्रवाह विवरण पत्र" मध्ये निर्देशित केल्यानुसार उपरोक्त "रोख प्रवाह विवरण पत्र" हे अप्रत्यक्ष पध्दतीने तयार करण्यात आले आहे.

(ब) मागील वर्षाचे आकडे चालू वषातील वर्गवारीचे अनुरुप करण्यासाठी आवश्यक त्याठिकाणी पुर्न:मांडणी करुन घेण्यात आले आहेत.

(क) रोख आणि रोख सममूल्य यामध्ये रोख व बँकेतील शिल्लक अंतर्भूत आहे.

आमचे सम दिनांकाचे संलग्न अहवालानुसार
रतन चांडक आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. १०८६९६ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए सुधीर बाहेती)
भागीदार
स.क्र.०४२७११

संचालक मंडळाचे वतीने व करिता

स्वाक्षरित
(डॉ. एन. रामबाबू)
संचालक
सं.ओ.क्र # ०८१३५५०७

स्वाक्षरित
(एन. वासुदेवन)
व्यवस्थापकीय संचालक
सं.ओ.क्र # ०८९४०३१९

शाह बाहेती चांडक आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए जय पोपटानी)
भागीदार
रा.क्र.१३५०३८
स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०

स्वाक्षरित
(सीएस सौरव सिंह)
कंपनी सचिव
ए-२२०५३
स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०

स्वतंत्र विवरणपत्रे

टिपणी - १ (अ) संपत्ती, यंत्रे व उपकरणे (PPE)

(रक्कम रुपयात)

| तपशील | सकल मूल्य | | | | घसारा | | | | निव्वळ मूल्य | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दि.१ एप्रिल २०१९ रोजीचे मूल्य | भर | विल्हेवाट (विक्री/ समायोजन) | दि.३१ मार्च २०२० रोजी एकूण मूल्य | दि.१ एप्रिल २०१९ रोजी संचित घसारा | चालू वर्षाकरिता | विल्हेवाट (विक्री/ समायोजन) | दि.३१ मार्च २०२० रोजी संचित घसारा | ३१ मार्च २०२० रोजी | दि.३१ मार्च २०१९ रोजी |
| मूर्त संपत्ती | | | | | | | | | | |
| (अ)जमीन - मुक्त हस्त | ११०७३८ | - | - | ११०७३८ | - | - | - | - | ११०७३८ | ११०७३८ |
| (ब) रस्ते | ३६९४०२३ | - | - | ३६९४०२३ | २७७८८६५ | ५९५३४२ | | ३३७४२०७ | ३१९८१६ | ९१५१५८ |
| (क) इमारती | | | | | | | | | | |
| i) आर.सीसी फ्रेम बांधकाम | १०९८१७१२३ | - | - | १०९८१७१२३ | ११९७४७४५ | १७४५३१७ | - | १३७२००६२ | ९६०९७०६१ | ९७८४२३७८ |
| ii) आरसीसी फ्रेम शिवाय बांधकाम | ९३५१७९४९ | १४१४८५३ | - | ९४९३२८०२ | ५१६४३४०० | २८११९६२ | - | ५४४५५३६२ | ४०४७७४४० | ४१८७४५४९ |
| iii) कुंपण, विहीर, कुपनलिका | ९७८२७६४ | ५४२६७९ | - | १०३२५४४३ | ७७५४३४४ | ९६१२२४ | - | ८७१५५६७ | १६०९८७६ | २०२८४२० |
| iv) इतर (अस्थायी बांधकामे इ.सह) | १५६७७५४० | - | २०१५४७५ | १३६६२०६५ | १४३५६६७८ | १०४२३४८ | २०१५४७० | १३३८३५५६ | २७८५०९ | १३२०८६२ |
| एकूण i ते iv | २२८७९५३७६ | १९५७५३२ | २०१५४७५ | २२८७३७४३३ | ८५७२९१६६ | ६५६०८५० | २०१५४७० | ९०२७४५४६ | १३८४६२८८६ | १४३०६६२०९ |
| (ड)यंत्रे व संयंत्रे | २०४२७४९१ | २४४९२१ | - | २०६७२४११ | ५६९९४७२ | १२३११२७ | ६९५७ | ६९२३६४३ | १३७४८७६९ | १४७२८०१८ |
| (इ) उपस्कर व जोडकाम | ४२४५५०९० | ३१८०४४ | - | ४२७७३१३४ | १७७८६०५८ | ४००९०५४ | ९३४८ | २१७८५७६४ | २०९८७३७० | २४६६९०३२ |
| (फ) वाहने | | | | | | | | | | |
| i) मोटार गाडया | १०८४५०८७ | - | - | १०८४५०८७ | ७११४८१७ | ८१६६३४ | - | ८०११४५१ | २८३३६३७ | ३६५०२७१ |
| ii) इतर वाहने | ४२१८४७६९ | २९६२२१० | - | ४५१४६९७९ | ३०६९८१७५ | ३०२४७५९ | - | ३३७२२९३४ | ११४२४०४५ | ११४८६५९४ |
| एकूण फ ( iते ii) | ५३०२९८५६ | २९६२२१० | - | ५५९९२०६६ | ३७८१२९९९ | ३८४१३९३ | - | ४१७३४३८५ | १४२५७६८२ | १५१३६८५६ |
| (ग)कार्यालयीन उपकरणे | | | | | | | | | | |
| i) कार्यालयीन उपकरणे | २२६००००४ | ११३०४११५ | - | ३३९०४११९ | १२६८८१८८ | ४८८०९०४ | २८२९ | १७५६६२६७ | १६३३७८५२ | ९९११८१६ |
| ii) सर्वेक्षण व गणितीय उपकरणे | १६८६७७३ | ८०८९७० | - | २४९५७४३ | १२९३९६७ | ४०२९५२ | - | १६९६९१९ | ७९८८२४ | ३९२८०६ |
| iii) बिनतारी संदेश उपकरणे | १० | - | - | १० | - | - | - | - | १० | १० |
| एकूण i ते iii | २४२८६७८७ | १२११३०८५ | - | ३६३९९८७२ | १३९८२१५५ | ५२८३८६१ | २८२९ | १९२६३१८६ | १७१३६६८६ | १०३०४६३२ |
| (ह) संगणके | ११८५३१३३ | ४९१८४३६ | ६३००० | १६७०८५६९ | ९४७२२०२ | १४९७४५२ | ८९१५८ | १०८८०४९६ | ५८२८०७३ | २३८०९३१ |
| आय)जाखाका संपत्ती (नाममात्र मूल्याने) | १ | - | - | १ | - | - | - | - | १ | १ |
| जे) म.वा.प्र. अंतर्गत संगणक संपत्ती (नाममात्र मूल्याने) | १ | - | - | १ | - | - | - | - | १ | १ |
| एकूण बेरीज ( अ ते जे) | ३८४६५२४९५ | २२५१४२२८ | २०७८४७५ | ४०५०८८२४९ | १७३३४०९१० | २३०११०७९ | २१२३७६२ | १९४२३६२२७ | २१०८५२०२२ | २११३११५८६ |
| मागील वर्ष (वापरास अयोग्य घोषित परंतु विकल्या न गेलेली संपत्ती अंतर्भूत करुन | ३७६१७१७९७ | ९९९९०२३ | ७१८३२४ | ३८४६५२४९५ | १४९७५८६३२ | २४३०१२०० | ७१८९२२ | १७३३४०९१० | २११३११५८६ | २२६४१३१६४ |
| टिपणी - १ (ब) प्रगतीपथावरील भांडवली कामे | | | | | | | | | | |
| प्रगतीपथावरील भांडवली कामे | २५५३५९ | - | ३६२०० | २१९१५९ | - | - | - | - | २१९१५९ | २५५३५९ |

स्वतंत्र विवरणपत्रे

टिपणी - २ अचल वित्तीय संपत्ती :- गुंतवणूक

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| अ) समता भाग भांडवलामध्ये गुंतवणूक (Unquoted) | | |
| i) दुय्यम (Subsidiaries) अंगभूत कंपनी | | |
| अ) समभाग प्रत्येकी रु. १० चे एफडीसीएम एस्सेलवर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड | १ | १ |
| **एकूण - बेरीज** | १ | १ |

महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

टिपणी - २ अ ऋण

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| **अ) सुरक्षा ठेवी :- अप्रतिभूत, प्रतिप्राप्य** | | |
| संचालकाकडून येणे रुपये निरंक (मागील वर्षी रुपये निरंक) | ३१२११२७४ | १४६०८२१५ |
| **ब) कर्मचा-यांना ऋण व अग्रिम - प्रतिभूत व प्रतिप्राप्य** | | |
| i) वाहन अग्रीम | २८८१७० | २८९९८० |
| त्यावरील उपार्जित परंतु देय न झालेले व्याज | ११५६७१ | १४२४६६ |
| उपार्जित आणि देय झालेले व्याज | -- | -- |
| ii) घर बांधणी अग्रीम | २२१४५६१३ | ८३९९५९७ |
| त्यावरील उपार्जित परंतु देय न झालेले व्याज | ३३६०६५३ | २०७९५७० |
| iii) संगणक अग्रीम | ४४६८०० | १४०४५४ |
| **एकूण - उप बेरीज** | २६३५६९०७ | ११०५२०६७ |
| संचालकाकडून येणे रुपये निरंक (मागील वर्षी रुपये निरंक) | | |
| **एकूण - बेरीज** | ५७५७६१८१ | २५६६०२८२ |

महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

टिपणी - ३ इतर चल संपत्ती

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| **अप्रतिभूत प्रतिप्राप्य** | | |
| अ) शासन / इतर यंत्रणे कडून रोपवन संपत्तीपोटी क्षतीपूर्वी दावे-येणे रकमा | २९१३३०३७१० | २९१५६३६१७१ |
| ब) इतर येणे रक्कम<br>संचालकांकडून येणे रुपये निरंक (मागील वर्षी रुपये निरंक) | ५०३३०३५ | २९०४८०५३ |
| **एकूण बेरीज** | २९१८३३६७४५ | २९४४६८४२२४ |

स्वतंत्र विवरणपत्रे
टिपणी - ४ जैविक संपत्ती

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| अ) रोपवाटिका (परिव्यय मूल्याने) | ५४८५४६१४ | ४७३२०८२३ |
| ब) रोपवने (परिव्यय मूल्याने) | १११२३५०२७५६ | १०३७००२९९६९ |
| एकूण बेरीज | १११७८३५७३७१ | १०४१७३५०७९२ |

टिपणी - ४ (अ) वस्तुसूची

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| अ) प्रगतीपथावरील कामे (परिव्यय मूल्याने) | ६३९३४३२८२ | ३६२४६१८५३ |
| ब) तगार माल (निव्वळ वसूलीयोग्य मूल्याने) | ८३२१३४९७६ | ८९७०३५७४७ |
| एकूण बेरीज | १४७१४७८२५८ | १२५९४९७६०० |

स्वतंत्र विवरणपत्रे

टिपणी - ५ व्यापारी येणे

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे रुपये |
|---|---|---|
| **व्यापारी येणे** | ४६९८५४७०१ | ४४२८२२७८५ |
| वजा : संदिग्ध व्यापारी येणे रकमाकरिता तरतूद | ३०१९८९९२ | ३११९८४९२ |
| **एकूण** | **४३९६५५७०९** | **४११६२४२९३** |
| प्रतिभूत व प्रतिप्राप्य | २०२१३०१४२ | २४५२७३६७७ |
| अप्रतिभूत व प्रतिप्राप्य | २३७५२५५६७ | १६६३५०६१६ |
| अंतर्भूत:- | | |
| संचालकाकडून येणे | -- | -- |

महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

टिपणी - ६ रोख आणि रोख सममूल्य

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे रुपये |
|---|---|---|
| अ) बँकेतील शिल्लक | | |
| i) चल खाते | ६६७०२७९५ | ९३०२३९५४ |
| ii) बचत खाते | ३५६४५५०२६ | ६२८७२८८५८ |
| ब) हस्तस्थ धनादेश, धनाकर्ष | ६७८६६० | २४७४११५ |
| क) हस्तस्थ रोख व पोष्टाची तिकीटे | ८१२४ | ६९२३ |
| एकूण बेरीज | ४२३८४४६०५ | ७२४२३३८५० |

स्वतंत्र विवरणपत्रे

टिपणी - ६ अ बँकेतील शिल्लक वरील (ii) व्यतिरिक्त

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे रुपये |
|---|---|---|
| मुदती ठेवी तीन महिण्याचे वर परंतू १२ महिण्याचे आत परिपक्वता असलेले | २६८२५०११२७ | २६९६०२६६२८ |
| एकूण बेरीज | २६८२५०११२७ | २६९६०२६६२८ |

टिपणी - ७ ऋण

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे रुपये |
|---|---|---|
| इतर ठिकाणी वेगळा उल्लेख नसल्यास अप्रतिभूत प्रतिप्राप्य | | |
| अ) कर्मचा-यांना ऋण व अग्रीम / इतर | २२८५४५१११ | ७३१२९२६१ |
| एकूण बेरीज | २२८५४५१११ | ७३१२९२६१ |
| अंतर्भूत | | |
| संचालकांकडून येणे | -- | -- |

टिपणी - ७ अ इतर वित्तीय संपत्ती

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे रुपये |
|---|---|---|
| अ) उपार्जित | | |
| ठेवी वरील उपार्जित व्याज | ८५४२५७२२ | ८२१७२३६८ |
| एकूण बेरीज | ८५४२५७२२ | ८२१७२३६८ |
| अंतर्भूत | | |
| संचालकांकडून येणे | -- | -- |

स्वतंत्र विवरणपत्रे

टिपणी - ८ इतर चल संपत्ती

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे<br>रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे<br>रुपये |
|---|---|---|
| इतर ठिकाणी वेगळा उल्लेख नसल्यास अप्रतिभूत प्रतिप्राप्य | | |
| अ) विमा दाव्याची येणे रक्कम | २८६१३८७ | २६८११६६ |
| ब) इतर येणे | ५३१५४६३८ | ६४७२४०१९ |
| क) पूर्वदत्त व्यय | २३१६४१४ | ८६२८४३५ |
| ड) पुरवठाधारक / कंत्राटदार / इतर यंत्रणेकडे ठेवी | १६२९४८४३ | ११९८६७०४ |
| **एकूण बेरीज** | **७४६२७२८१** | **८८०२०३२४** |
| अंतर्भूत | | |
| संचालकांकडून येणे | -- | -- |

महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

टिपणी - ९ समता भाग भांडवल

(रक्कम रुपये)

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे |
|---|---|---|
| अ) <u>अधिकृत</u><br>३३०००००० समता भाग प्रत्येकी रु. १०० चे मतदान अधिकारासह | ३३०००००००० | ३३०००००००० |
| ब) निर्गमित व अभिदत्त व पूर्णदत्त<br>मतदान अधिकारासह प्रत्येकी रु. १०० चे समभाग (यापैकी १६६६३६ भाग रोखी व्यतिरिक्त मोबदल्याचे स्वरुपात निर्गमित) | ३२३१२३४८०० | ३२३१२३४८०० |
| **एकूण बेरीज** | **३२३१२३४८००** | **३२३१२३४८००** |

अ) समता भागाशी संलग्न अधिकार व शर्ती

कंपनीकडे रु. १०० प्रति समभाग मूल्याचे फक्त एकाच वर्गवारीचे समभाग आहेत
(मागील वर्ष रु. १०० प्रति समभाग)

ब) कंपनीच्या एकूण भागापैकी भागधारकांनी ५% पेक्षा अधिक धारण केलेले भाग

| भागाची वर्गवारी | तपशील | दि. ३१ मार्च २०२० रोजी | | दि. ३१ मार्च २०१९ रोजी | |
|---|---|---|---|---|---|
| | भाग धारकाचे नांव आणि धारण केलेल्या भागाची संख्या | धारण केलेल्या भागाची संख्या | भागाच्या त्या वर्गवारीत धारण केलेली टक्केवारी | धारण केलेल्या भागाची संख्या | भागाच्या त्या वर्गवारीत धारण केलेली टक्केवारी |
| (अ) मतदान अधिकारासह समभाग | महाराष्ट्राचे राज्यपाल (२ नामनिर्देशित व्यक्तीनी धारण केलेले २ भाग अंतर्भूत करुन) | ३२३१२३४८ | १०० | ३२३१२३४८ | १०० |
| (ब) अधिमान भाग | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**टिपणी**

(क) प्रतिवेदन कालावधीचे सुरुवातीस आणि शेवटी भागाची संख्या व प्रलंबित रकमा यांचा ताळमेळ-

| तपशील | सुरुवातीची शिल्लक | नविन निर्गम | अधिलाभांश | इतर बदल | अखेरची शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| मतदान अधिकारासह समभाग | | | | | |
| ३१ मार्च २०२० रोजी संपणा-या वर्षाकरिता | | | | | |
| भागांची संख्या | ३२३१२३४८ | -- | -- | -- | ३२३१२३४८ |
| रक्कम रुपये | ३२३१२३४८०० | -- | -- | -- | ३२३१२३४८०० |
| दि. ३१ मार्च २०१९ रोजी संपणा-या वर्षाकरिता | | | | | |
| भागांची संख्या | ३२३१२३४८ | -- | -- | -- | ३२३१२३४८ |
| रक्कम रुपये | ३२३१२३४८०० | -- | -- | -- | ३२३१२३४८०० |

ड) समभागाशी संलग्न अधिकार, अधिमान व निर्बंध :-

| तपशील | चालू वर्ष दि. ३१.३.२०२० | मागील वर्ष दि. ३१.३.२०१९ |
|---|---|---|
| मतदान हक्क | ३२३१२३४८ | ३२३१२३४८ |
| लाभांश हक्क | ३२३१२३४८ | ३२३१२३४८ |
| निर्बंध | -- | -- |
| अन्य बाबी | -- | -- |
| **एकूण** | ३२३१२३४८ | ३२३१२३४८ |

इ) भागधारक कंपनी इत्यादिचा तपशील : लागू नाही

फ) समभाग / अधिमान भागात परिवर्तनिय रोख्याबाबत तपशील : निरंक

स्वतंत्र विवरणपत्रे
टिपणी - १० इतर भाग (संचिती)

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे<br>रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे<br>रुपये |
|---|---|---|
| **संचिती व अतिरेक** | | |
| **अ) भांडवल संचिती** | | |
| प्रतिवेदन कालावधीच्या सुरुवातीची शिल्लक | ५६५४४०८४१५ | ५१०६१३१३४७ |
| अधिक : चालू वर्षातील बदल | ४१९८२५८१९ | ५४८२७७०६९ |
| प्रतिवेदन कालावधी अखेरची शिल्लक | **६०७४२३४२३५** | **५६५४४०८४१५** |
| **ब) संचित नफा** | | |
| सुरुवातीची शिल्लक | ७८०७५५००५४ | ७०४८६०२२१६ |
| अधिक : चालू वर्षातील नफा | ३७१६५६३३४ | १०७०१७३३९१ |
| यापूर्वीच्या वर्षातील आयकर परतावा | -- | -- |
| | ८१७९२०६३८८ | ८११८७७५६०८ |
| **वजा :- विनियोग** | | |
| i) समता भागधारकांना लाभांश वितरण | ३९७५०००० | २९२००००० |
| ii) लाभांशावरील कर | ८१७२१०० | ६२१६९९४ |
| iii) व्यवस्थापन आराखड्यानुसार (अनिवार्य) रोपवनासाठी भांडवली संचिती | २३४६११६६७ | २७५८०८५५९ |
| **आधिक्याची अखेरची शिल्लक (ब )** | **७८९६६७२६२१** | **७८०७५५००५४** |
| **एकूण बेरीज (अ+ब)** | **१३९७०९०६८५६** | **१३४६११९५८४७०** |

स्वतंत्र विवरणपत्रे

टिपणी - ११ ऋण

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे रुपये |
|---|---|---|
| महाराष्ट्र शासनाकडून अप्रतिभूत ऋण | निरंक | निरंक |
| एकूण बेरीज | -- | -- |

महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

टिपणी - १२ व्यापारी देणे

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे रुपये |
|---|---|---|
| व्यापारी देणे : | | |
| अ) व्यापारी देणे (इतरांना देय) (लघुउद्योग उपक्रमा व्यतिरिक्त) | २३५३३५१ | २३८२७३९ |
| एकूण बेरीज | २३५३३५१ | २३८२७३९ |

स्वतंत्र विवरणपत्रे

टिपणी - १३ इतर चल देयता

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे रुपये |
|---|---|---|
| अ) पुरवठाधारक / कंत्राटदार यांचेकडून व्यापारी ठेवी | ३५५०६४८० | ३१४६९८५८ |
| ब) ग्राहक व इतरांकडून अग्रीम | ६७१४५२९४३ | ४१०७८८२१२ |
| क) संविधीक / इतर भरणा करावयाची रक्कम | ६७२०९७८३ | ७७१४८६१२ |
| ड) इतर देणे | ९४९११४०३९ | ५२७४३१९१८ |
| इ) विविध शासन योजना अंतर्गत इतर ठेवी | १०३५६५३०८८ | १२३५९५७७८० |
| एकूण बेरीज | २७५८९३६३३३ | २२८२७९६३८१ |

महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

टिपणी - १४ चालू कर संपत्ती (निव्वळ)

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० अखेरचे आकडे रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ अखेरचे आकडे रुपये |
|---|---|---|
| आयकर संपत्ती (निव्वळ) | १९०६५९०५९ | ४०८०२६८४ |

महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

स्वतंत्र विवरणपत्रे

टिपणी - १५ कार्यापासून महसूल

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० करिता आकडे<br>रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ करिता आकडे<br>रुपये |
|---|---|---|
| अ) उत्पादनाची विक्री (सकल) (खालील टिपणी १५ (i) पहावी) | १५१९७३१५९२ | २०४११८९०८३ |
| वजा : माल परत | २२२२०० | ३९९१०० |
| **उत्पादनाची विक्री (निव्वळ)** | **१५१९५०९३९२** | **२०४०७८९९८३** |
| ब) टर्न की रोपवन प्राप्ती | २४८०६२४८ | ९४७९५२१८ |
| क) कार्यापासून इतर महसूल | २०४९२७८५ | २०२४४६१५ |
| ड) निसर्ग पर्यटनापासून प्राप्ती | ८१८१६६७ | १२३३६५५९ |
| **कार्यापासून महसूलाची एकूण बेरीज** | **१५७२९९००९३** | **२१६८१६६३७५** |

टिपणी - १५ (i)

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० करिता आकडे<br>रुपये | म्मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ करिता आकडे<br>रुपये |
|---|---|---|
| **i) उत्पादनाचे विक्रीत (सकल) अंतर्भूत** | | |
| अ) रोपवन विरलन कार्यविधी | ७००४२०११७ | ९१८६३२१२८ |
| ब) कापणी कार्यविधी | ७७३४३८७३ | ९३५२४३८३ |
| क) वृक्ष काढणी कार्यविधी | ७११८८३३१७ | १०२३४८६६२२ |
| ड) इतर (बियाणे, सागी जड्या / रोपे / मिश्र खत/ गांडूळ खत इ. अंतर्भूत) | २२०८४२०५ | ५५४५९५१ |
| इ) औषधी वनस्पती रोपवन कार्यविधी | -- | -- |
| **उत्पादनाचे विक्रीची एकूण बेरीज** | **१५१९७३१५९२** | **२०४११८९०८३** |
| **ii) माल परत :** | | |
| अ) रोपवन विरलन कार्यविधी | ६५८३१ | -- |
| ब) कापणी कार्यविधी | १५६३६९ | २१६२०० |
| क) वृक्ष काढणी कार्यविधी | -- | १८२९०० |
| **माल परत एकूण बेरीज** | **२२२२००** | **३९९१००** |

स्वतंत्र विवरणपत्रे

टिपणी - १६ इतर उत्पन्न

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० करिता आकडे<br>रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ करिता आकडे<br>रुपये |
|---|---|---|
| अ) व्याजाचे उत्पन्न | २२८८१८७६३ | २२२५९९४०४ |
| ब) क्षतीपूर्ती दावे प्राप्ती | ७६६३३०४ | ११०७७५७९१ |
| क) कार्याव्यतिरिक्त इतर उत्पन्न | ३७०७३९४४ | १७२५२९१८ |
| इतर उत्पन्न - एकूण बेरीज | २७३५५६०१० | ३५०६२८११३ |

स्वतंत्र विवरणपत्रे
टिपणी - १७ वापरलेल्या गालाची किंमत

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० करिता आकडे<br>रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ करिता आकडे<br>रुपये |
|---|---|---|
| विरलन कार्यक्रम | ४७२५५८५८१ | ३७४२७७२७४ |
| कापणी कार्यक्रम | ८९९६६९०७ | ६५२८४६५७ |
| वृक्ष काढणी कार्यक्रम | ३७८६१९१४३ | ३१७७२५७२६ |
| विभाजनीय व्ययाची वाटणी | | |
| i) विरलन कार्यक्रमावर | ९७८६७५६८ | ७४६७७२२५ |
| ii) कापणी कार्यक्रमावर | १६१८१३८८ | ११८४७४८३ |
| iii) वृक्ष काढणी कार्यक्रमावर | ९३५६१७३५ | ७५६३३९५९ |
| बिज संकलन कार्यविधी | ७४७७२०९ | ७२८०४९७ |
| गांडूळ खत / मिश्र खत कार्यविधी | १८९०२९२ | १२८०६०४ |
| औषधी वनस्पती कार्यविधी | १०५३८५२९ | ७९७२२८९ |
| टर्नकी रोपवन खर्च | २९५८३९३० | ९६५३२३७२ |
| विक्री झालेल्या सागी जड्या / रोपे / पॉलीपॉट इत्यादिंची किंमत | ११२३४१८५ | ७८१९८१ |
| **वजा:- विभागीय कामासाठी वापर** | | |
| i) विभागीय कामासाठी वापरलेल्या बियांण्यांची किंमत | (५४१२९०६) | (७६९८६०३) |
| ii) विभागीय कामासाठी वापरलेल्या मिश्र खत / गांडूळ खताची किंमत | (१५२८४९०) | (२३२६१९०) |
| iii) विभागीय कामासाठी वापरलेल्या विरलन मालाची किंमत | (५१२६६१) | (२६०१५) |
| iv) विभागीय कामासाठी वापरलेल्या कापणी कार्यक्रम मालाची किंमत | -- | (७९१३२) |
| v) विभागीय कामासाठी वापरलेल्या वृक्ष काढणी कार्यक्रम मालाची किंमत | (२६४९३) | -- |
| **एकूण वापरलेल्या मालाची किंमत** | **१२०१९९८९१८** | **१०२३१६४१२८** |

स्वतंत्र विवरणपत्रे

टिपणी - १७ (i) तयार मालाची वस्तुसूची व प्रगती पथावरील कामे यातील बदल

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० करिता आकडे<br>----------------------<br>रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ करिता आकडे<br>-------------------------<br>रुपये |
|---|---|---|
| **प्रगतीपथावरील कामे** | | |
| सुरवातीची शिल्लक (अ) | ५३०९४९०२ | ६९०१३१९७ |
| अखेरची शिल्लक (ब) | १३१७२८०२२ | ५३०९४९०२ |
| **प्रगतीपथावरील कामातील बदल क = (अ - ब)** | **(७८६३३१२०)** | **१५९१८२९५** |
| **तयार माल** | | |
| सुरवातीची शिल्लक (ड) | ८९७०३५७४७ | ७९३१८७६५३ |
| अखेरची शिल्लक (इ) | ८३२१३४९७६ | ८९७०३५७४७ |
| **तयार मालाचे वस्तुसूचीतील बदल फ = (ड - इ)** | **६४९००७७१** | **(१०३८४८०९४)** |
| **तयार मालाची वस्तुसूची व प्रगतीपथावरील कामातील बदल ग = क + फ** | **(१३७३२३४९)** | **(८७९२९७९९)** |

महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

स्वतंत्र विवरणपत्रे

टिपणी - १८ कर्मचारी लाभ खर्च

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० करिता आकडे रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ करिता आकडे रुपये |
|---|---|---|
| अ) विभाजनीय व्यय | | |
| १) वेतन व मजुरी | २५१७८९८१२ | १९१११८५६७ |
| २) भविष्य निर्वाह निधी आणि इतर निधीतील अंशदान | | |
| i) सेवा उपदान | १५०१३५३२ | १२०३२०७२ |
| ii) रजा रोखीकरण आणि निवृत्ती लाभ | १८७८९८ | ५९२६०७७ |
| iii) निवृत्ती / रजा वेतन अंशदान | ४०३२२२१ | ३७६५७४७ |
| iv) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि इतर अंशदान | २७६०८६८७ | १९२१४३६० |
| ३) कर्मचारी कल्याण खर्च | १०३९८१६ | १००९४८१ |
| एकूण सकल कर्मचारी लाभ खर्च | २९९६७१९६६ | २३३०६६३०४ |
| वजा : ९०% विभाजनीय व्यय स्थानांतरीत (टिपणी क्र. २१, टिपणी क्र. २३ सोबत वाचावे) | २६९७०४७६९ | २०९७५९६७३ |
| निव्वळ विभाजनीय व्यय | २९९६७१९७ | २३३०६६३१ |
| ब) अविभाजनीय व्यय | | |
| १) कर्मचा-यांना प्रोत्साहन पर रक्कम | ६००००००० | ८००००००० |
| कर्मचारी लाभ खर्च | ८९९६७१९७ | १०३३०६६३१ |

महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

टिपणी - १९ घसारा व परिशोधन खर्च

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० करिता आकडे रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ करिता आकडे रुपये |
|---|---|---|
| अ) विभाजनीय व्यय | | |
| घसारा टिपणी क्र. १ अ नुसार | २३०१९०७९ | २४३०१२०० |
| वजा : इतर कार्यक्रमातंर्गत स्थानांतरण | ३४७९५४० | ३८२१०५८ |
| निव्वळ घसारा | १९५३९५३९ | २०४८०१४२ |
| वजा : ९०% विभाजनीय व्यय स्थानांतरीत (टिपणी क्र. २१, टिपणी क्र. २३ सोबत वाचावे) | १७५८५५८५ | १८४३२१२८ |
| एकूण घसारा व परिशोधन खर्च | १९५३९५४ | २०४८०१४ |

स्वतंत्र विवरणपत्रे
टिपणी - २० इतर खर्च

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० करिता आकडे<br>रुपये | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ करिता आकडे<br>रुपये |
|---|---|---|
| अ) विभाजनीय व्यय | | |
| **प्रशासकीय खर्च** | | |
| व्यवस्थापकीय संचालकांचे पारिश्रमिक | ३२५४९२४ | ३०२५७७० |
| संचालकांना बैठक शुल्क | १००३० | ८५०० |
| प्रवास व वाहन खर्च | ३९७४५१५ | ४९४८१७७ |
| भाटक | ११०९५१६ | ९३४२०० |
| कर व सारा | ९७७३३१ | ९७१९२४ |
| जाहिरात | २५३३३५ | ४४४०१५ |
| पुस्तके आणि नियतकालीके | ११७९३४ | १६७४३४ |
| छपाई व लेखन सामुग्री | २५३५२४५ | ४१३१६९२ |
| टपाल, दूरध्वनी, दूरसंदेश | १५७१६४४ | १७०६८३६ |
| कार्यालयीन खर्च | २३६२८५६८ | २२६७७१९१ |
| अधिकोष आकार / वर्तन | २९०८०१ | २२९०३६ |
| कर्मचा-यांकरीता गणवेष खर्च | ३९१०३२ | ६९४१६८ |
| संपत्तीवरील विमा | ९७२२६९ | ८६८६०१ |
| वेबसाईट खर्च | -- | ३१८६० |
| प्रशिक्षण खर्च | ८१६६२५९ | ४०५०११७ |
| **दुरुस्ती व देखभाल खर्च :-** | | |
| रस्ते व इमारती | ६३९०२००५ | २०४५३६४५ |
| यंत्रे व संयंत्रे | ६००७१० | ३८४११२ |
| वाहने | ९८६६६०२ | ११००३३२१ |
| | **१२१६२२७१९** | **७६७३०५९७** |
| वजा : विभाजनिय व्यय स्थानांतरीत (टिपणी २१ टिपणी २३ सोबत वाचावे) | १०९४६०४४८ | ६९०५७५३७ |
| **विभाजनीय व्ययाची उप बेरीज (अ)** | **१२१६२२७१** | **७६७३०६०** |

| | | |
|---|---|---|
| **ब) अविभाजनीय व्यय** | | |
| प्रशासकीय खर्च | | |
| अध्यक्षांना मानधन | १२३९०० | १५०२१० |
| **लेखा परीक्षकांना शोधन :-** | | |
| लेखा परीक्षण शुल्क | ३२५६८० | २७५६२० |
| कर लेखा परीक्षण शुल्क | ७०८०० | ७०८०० |
| वस्तू व सेवा कर लेखा परिक्षण शुल्क | २३६००० | २३६००० |
| सेवा उपदान ट्रस्टचे लेखा परीक्षण शुल्क / अंशदान | -- | ११९७७१७ |
| लेखा परीक्षकांनी केलेला खर्च (प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती) | १७७७९ | ८९३० |
| व्यवसाय कर | २००० | २००० |
| महाराष्ट्र मूल्यवर्धित कर / वस्तु व सेवा कर खर्च | १०१६९८२ | ८२७७८६ |
| दाखल शुल्क व नोंदणी शुल्क | २६५४० | १२३७२७ |
| विधी व्यय | ८३९३३५ | ५८६३७० |
| **निसर्ग पर्यटन कार्यविधी** | | |
| एकूण खर्च | १८०७९४०२ | २१००६२०६ |
| **वजा : संबंधित कार्यविधीला स्थानांतरण** | (५१८८७९) | (१७९०५४९) |
| **निव्वळ खर्च** | **१७५६०५२३** | **१९२१५६५७** |
| संशोधन व विकास | २५२३४ | १३३४४८ |
| नियुक्ती प्रक्रीया खर्च | -- | ३३२४५६२ |
| संयुक्त सामाजिक जबाबदारी (CSR) खर्च | २५४६२००० | २०३९०००० |
| डॉ. एपीजे कलाम उद्यान खर्च | २८१७१४६ | ३४२६५३३ |
| निर्लेखित केलेली रक्कम | ८३७४८८१ | १६०११७२ |
| सेवा समाप्ती क्षतीपूर्ती | २१८४७०८ | ५८००००० |
| वन्यप्राणी हल्ल्यामुळे क्षतीपूर्ती इ. | १५०१०९३९ | १३५५९९४६ |
| संदिग्ध ऋण व अग्रीमा करीता तरतूद | ११९५१८२ | २२४०७३६ |
| **एकूण अविभाजनीय व्ययाची उपबेरीज (ब)** | **७५२८९६२९** | **७३१७१२१४** |
| **एकूण बेरीज** | **८७४५११००** | **८०८४४२७४** |

................

महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

स्वतंत्र विवरणपत्रे

टिपणी क्र. - २१

सन २०१९-२० या वर्षाकरिता ९०% विभाजनीय व्ययाची विभागणी (रक्कम रु)

| कार्यविधी | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२० करिता आकडे<br>विभाजनीय व्ययाचा हिस्सा | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०१९ करिता आकडे<br>विभाजनीय व्ययाचा हिस्सा |
|---|---|---|
| टिपणी क्रमांक २३ नुसार | | |
| १) महाराष्ट्र वानिकी प्रकल्प | -- | ६३३८१ |
| २) पडीत जमिन विकास कार्यक्रम | -- | -- |
| (बँक अर्थसहाय्या अंतर्गत) | | |
| ३) चालू साग रोपवन कार्यक्रम | १२६७४९६५ | ४२६६३०८ |
| ४) समृध्दी रोपवन कार्यक्रम | -- | -- |
| ५) व्यवस्थापन आराखड्यानुसार (अनिवार्य) रोपवन कार्यक्रम | १०९३८८८८२ | ९२८५९१५२ |
| ६) टर्न की रोपवने (प्रगतीपथावरील कार्य) | ६६४८२४६२ | ३६३४८९०१ |
| ७) **औषधी वनस्पती** | | |
| i) एनएमपीबी अंतर्गत | २४१५८२ | ८६०९११ |
| ii) अन्यस्त्रोतातंर्गत | -- | -- |
| **एकूण (१ ते ७)** | **१८८७८७८९१** | **१३४३९८६५३** |
| ८) विरलन कार्यक्रम मालाची किंमत | ९७८६७५६८ | ७४६७७२२५ |
| ९) कापणी कार्यक्रम मालाची किंमत | १६१८१३८८ | ११८४७४८३ |
| १०) वृक्ष काढणी कार्यविधी मालाची किंमत | ९३५६१७३५ | ७५६३३९५९ |
| ११) टर्नकी रोपवने (पूर्ण झालेले प्रकल्प) | ३५२२२० | ६९२०१८ |
| **एकूण (८ ते ११)** | **२०७९६२९११** | **१६२८५०६८५** |
| **एकूण बेरीज** | **३९६७५०८०२** | **२९७२४९३३८** |

## महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

## दिनांक ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाचे स्वतंत्र वित्तीय विवरण पत्राशी संबंधित असलेली टिपणी

### टिपणी - २२ : महत्वाच्या लेखाविषयक धोरणांचा सारांश.

**ए) वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याचा आधार.**

कंपनी व्यवहार मंत्रालय (MCA) यांचेव्दारे निर्गमित अधिसूचनेनुसार कंपनीने दिनांक १ एप्रिल २०१६ पासून कंपनी नियम (भारतीय लखांकन मानक) २०१५ अंतर्गत अधिसूचीत भारतीय लेखांकन मानक ("Ind AS") स्विकृत केले आहे. मागील कालावधीसुध्दा भारतीय लेखांकन मानक ("Ind AS") प्रमाणे पुनर्निश्चित करण्यात आला आहे. ही वित्तीय विवरणपत्रे कंपनी (भारतीय लेखांकन मानक) नियम २०१५ अन्वये अधिसूचीत भारतीय लेखांकन मानक ("Ind AS") नुसार तयार करण्यात आली आहेत. कंपनी अधिनियम २०१३ कलम १३३ सह वाचावे.

ज्यांचे मूल्यांकन संबंधित भारतीय लेखांकन मानकानुसार आवश्यक असल्याप्रमाणे योग्य किंमतीने करण्यात आले आहे अशा ठराविक वित्तीय संपत्ती व देयता वगळता वित्तीय विवरणपत्रे लेखांकनाच्या अर्जित संकल्पनेवर आधारित ऐतिहासिक मूल्य संकेतांतर्गत तयार करुन सादर करण्यात आली आहेत.

सदर वित्तीय विवरणपत्रे तयार करतांना अनुसरलेली लेखाविषयक धोरणे मागील वर्षी अनुसरलेल्या धोरणाशी सुसंगत आहेत.

**बी) प्राक्कलनाचा उपयोग**

सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वांनुसार (जीएएपी) लेखाविषयक पध्दतीशी अनुरुप अशी वित्तीय विवरणपत्रे तयार करतांना व्यवस्थापनास अंदाज आणि अनुमान करावे लागतात, त्याचा परिणाम वित्तीय विवरणपत्राचे दिनांकास प्रतिवेदित केलेल्या संपत्ती व देयतेच्या रकमा आणि त्या प्रतिवेदित कालावधीतील प्रतिवेदित महसूल आणि खर्चाच्या रकमांवर होत असतो. सोबतच्या विवरणपत्रात उपयोगात आणलेले अंदाज आणि अनुमान व्यवस्थापनाने त्या दिवशी संबंधित वस्तुस्थितीचे व परिस्थितीचे केलेल्या मूल्यांकनावर आधारित आहेत, प्रत्यक्ष परिणाम अशा अंदाजापेक्षा भिन्न राहू शकतील.

वित्तीय विवरणपत्रे तयार करतांना उपयोगात आणलेले अंदाज हे दूरदर्शी असून वाजवी आहेत असा व्यवस्थापनास विश्वास आहे. लेखाविषयक अंदाजात काही सुधारणा झाल्यास त्या भावी प्रभावाने भविष्यातील कालावधीत विचारात घेण्यात येतात.

अशा अंदाजाचे उदाहरणा अंतर्गत संदिग्ध ऋणाकरिता तरतूद, आयकर, संपत्ती, यंत्रे व उपकरणांचा वापरायोग्य कालावधी इत्यादिचा अंतर्भाव आहे.

**सी) रोख आणि रोख सममूल्य व बँकेतील शिल्लक**

ताळेबंदातील रोख आणि रोख सममूल्य यात बँकेतील शिल्लक, रोख आणि हस्तस्थ धनादेश/धनाकर्ष, हस्तस्थ पोष्टाची तिकीटे इत्यादि अंतर्भूत आहेत. यामध्ये तीन महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीचे मूळ मुदती ठेवीचा समावेश आहे.

ताळेबंदात दर्शविलेली बँकेतील शिल्लक यामध्ये तीन महिन्यापेक्षा जास्त परंतु बारा महिन्यापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीच्या मुदती ठवीचा अंतर्भाव आहे.

### डी) विभाजनीय व्यय

पूर्वप्रथेनुसार कंपनीने विभाजनीय व्यय म्हणून कंपनीकरिता एकत्रित संबोधित केलेल्या आस्थापना व वरकड खर्चाचे संविभाजन चालू वर्षात राबविण्यात आलेल्या काही ठराविक दिर्घ मुदती निश्चित कार्यक्रमांवर भांडवलीकरण करुन उर्वरीत नफा तोट्याच्या हिशेबात टिपणी क्र. २३ (टिपणी क्र.२१ सोबत वाचावे) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करण्यात आले आहे.

### ई) प्रत्यक्ष खर्च

कार्यक्रमाशी प्रत्यक्ष संबंध असलेला आणि त्या कार्यक्रमांकरिता झालेला खर्च साधारणपणे अशा संबंधित कार्यक्रमावर खर्ची टाकण्यात येतो. अशा खर्चात मजुरी, साहित्य, आस्थापना व इतर वरकड खर्चाचा अंतर्भाव असतो.

भांडार साहित्य व सुट्या भागाचे खरेदीवरील या वर्षातील खर्च हा संबंधित लेखा शिर्षाअंतर्गत चालू वर्षात खर्ची टाकण्यात आला आहे.

### एफ) जैविक संपत्ती

वानिकी रोपवनाचे बाजारमूल्य उपलब्ध नसून त्यांचे पर्यायी रास्त किंमतीने मूल्यांकन करणे विश्वसनीय नसल्यामुळे रोपवाटीका, वानिकी रोपवने अशा जैविक संपत्तीचे मूल्यांकन परिव्यय मूल्याने करण्यात आले आहे.

आर्थिक वर्षाचे सुरुवातीस आणि वर्ष अखेरीस प्रत्येक प्रकारच्या जैविक संपत्तीचे भर, विल्हेवाट आणि इतर समायोजना दर्शविणारे वहनक्षम मूल्य याबाबत ताळमेळ स्वतंत्रपणे प्रकट करण्यात आलेला नाही.. कारण रोपवाटिका व रोपवनातील भर / घटीचे नैसर्गिक वाढीचे मूल्यांकन शक्य नाही.

रोपवाटिका आस्थापना या लेखा शिर्षाअंतर्गत आरंभीचे आधिक्य अधिक चालू वर्षातील खर्च यामधून १०% खर्च आणि रुट ट्रेनर / क्लोनल रोपवाटिका आस्थापना या लेखा शिर्षाअंतर्गत एकूण खर्चामधून २०% खर्च अनुक्रमे साग रोपवाटीका आणि रुट ट्रेनर व क्लोनल रोपवाटिका या लेखा शिर्षाअंतर्गत स्थानांतरित करण्यात आलेले आहे. ज्या रोपवाटिकेत कामे सुरु नाहीत अशा रोपवाटिकांचे बाबतीत अशा प्रकारचा १०% / २०% खर्च नफातोट्याचे हिशेबाबत निर्लेखित करण्यात आला आहे. तथापि, ज्या रोपवाटिकेत आंशिक स्वरुपात कामे सुरु आहेत अशा रोपवाटिकांच्या बाबतीत अशा १०% / २०% खर्चापैकी उद्दिष्टांच्या तुलनेत प्रत्यक्ष वापरलेल्या क्षमतेच्या प्रमाणात खर्च निर्लेखित करण्यात आला आहे.

### जी) रोपवन खर्च व बीज भूखंड विकास खर्चाचे निर्लेखन

i) वेगवेगळ्या क्षेत्रातील जिवंत रोपांची वेगवेगळी टक्केवारी लक्षात घेता, विरलनापूर्वी उभ्या असलेल्या एकूण झाडावरील सुरुवातीच्या प्रमाणशीर रोपवन खर्चाचे प्रमाणात विरलन कामात संबधित क्षेत्रातून तोडलेल्या झाडावरील सुरुवातीचा प्रमाणशीर रोपवन खर्च निर्लेखित करण्यात आला आहे. बांबू रोपवनाच्या सुरुवातीच्या प्रमाणशीर खर्चाचे निर्लेखन एकूण आठ कापणीमध्ये करण्यात आले आहे. औषधी वनस्पती रोपवन खर्चाचे निर्लेखन भिन्न रोपासाठी भिन्न कालावधी विचारात घेवून उत्पादनाच्या वर्षात करण्यात आले आहे. शासनास किवा प्रकल्प प्राधिकरणास आदेशानुसार हस्तांतरित करण्यात आलेल्या रोपवनाचे बाबतीत सुरुवातीचा एकूण रोपवन खर्च लेख्यात निर्लेखित / समायोजित करण्यात आला आहे. बीज घटकाअंतर्गत बीज भूखंडा संबंधाने विकास कामावरील खर्च त्या शिर्षाअंतर्गत सुरुवातीच्या आधिक्याचे २०% या दराने निर्लेखित करण्यात आला आहे.

ii) ताळेबंदात जैविक संपत्ती म्हणून अंतर्भूत केलेल्या रोपवन खर्चाची चालू वसुली योग्य एकूण किंमत जोपर्यंत अंदाजित केलेल्या एक अथवा अधिक भागातील नुकसान भरुन काढण्यासाठी पुरेशी आहे तोपर्यंत अशा काही भागातील अयशस्वी रोपवने निर्लेखित करण्यात आलेली नाहीत.

---

**एच) संपत्ती, यंत्रे व उपकरणे आणि प्रगतीपथावरील भांडवली कामे**

भारतीय लेखांकन मानंकाकडे (Ind AS) संक्रमण करतांना कंपनीने आपल्या सर्व संपत्ती, संयत्रे व उपकरणांचे मूल्यांकन दिनांक १ एप्रिल २०१५ रोजी पूर्वीचे सर्व साधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वानुसार (GAAP) विचारात घेवून असे वहनक्षम मूल्य संपत्ती, संयंत्रे व उपकरणांचे मानीव मूल्य म्हणून उपयोगात आणण्याचे ठरविले आहे.

मूर्त आणि अमूर्त अशा दोन्ही प्रकारच्या संपत्ती, यंत्रे व उपकरणे संपादित मूल्य / बांधकाम मूल्य यातून संचित घसारा कमी करुन दर्शविण्यात आले आहे. संपत्ती मूल्यात खरेदी किंमत, कर, शुल्क, भाटक व संपत्ती उद्देशित उपयोगासाठी चालू स्थितीत आणण्यासाठी लागणा-या इतर प्रत्यक्ष खर्चाचा समावेश आहे. महत्वाच्या प्रकल्पाकरिता इतर पूर्व तयारी वरील खर्चाचे सुध्दा उचित ठिकाणी भांडवलीकरण करण्यात आले आहे.

प्रगतीपथावरील भांडवली कामात संपत्ती, यंत्रे व उपकरणे संपादित करण्यासाठी दिलेल्या अग्रिमाचा तसेच ज्या संपत्ती यंत्रे व उपकरणे उद्देशित उपयोगासाठी वर्षअखेर अजून तयार नाहीत त्यावरील खर्चाचा अंतर्भाव आहे.

ताळेबंदाच्या दिवशी हस्तस्थ आणि उपयोगात न आलेल्या बांधकाम साहित्याची किंमत "प्रगतीपथावरील भांडवली कामे" या स्वतंत्र लेखाशिर्षा अंतर्गत समाविष्ट आहे.

**आय) घसारा आणि परिशोधन**

कंपनी अधिनियम २०१३ च्या परिशिष्ट II मध्ये विहित केल्यानुसार मूर्त संपत्ती, यंत्रे व उपकरणांचे वापरायोग्य आयुष्य विचारात घेवून त्याआधारे घसा-यांची तरतूद करण्यात आली आहे.

कंपनी अधिनियम २०१३, लागू झाल्यानंतर कंपनीने परिशिष्ट II मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार अंदाजित वापरायोग्य कालावधीचे प्रयोजन केले आहे. त्यानुसार संपत्तीचे शिल्लक वहनक्षम मूल्य सुधारीत उर्वरित वापरायोग्य कालावधी मध्ये अवक्षयित करण्यात येत आहे.

संपत्तीची भर किंवा घट यासबंधाने पूर्ण महिना आधारभूत धरुन भर / घटीचे संबंधात प्रमाणशीर घसा-याची परिगणना करण्यात आली आहे. वापरास अयोग्य परंतु विक्री न झालेल्या संपत्तीवर वापरास अयोग्य घोषित केल्यानंतर घसा-याची आकारणी करण्यात आलेली नाही. तसेच प्रकल्प प्राधिकरणास किंवा शासनास, आदेशानुसार स्थानांतरीत केलेल्या स्थिर संपत्तीचे निर्लेखन अवक्षयित मूल्याने करण्यात आले आहे.

प्रत्येकी रु. पांच हजार पर्यंत किंमतीच्या संपत्ती, खरेदीचे वर्षात पूर्णपणे अवक्षयित करण्यात येतात.

**जे) संपत्तीचे नुकसान**

प्रत्येक ताळेबंदाच्या दिवशी संपत्तीच्या वहनक्षम मूल्यात काही नुकसान झाले किंवा कसे हे ठरविण्यासाठी अशा वहनक्षम मूल्याचा आढावा घेण्यात येतो त्यात काही संपत्तीचे वहनक्षम मूल्य वसुलीयोग्य मूल्यापेक्षा अधिक असल्यास त्या मर्यादेपर्यंत झालेल्या नुकसानीची तरतूद करण्यात येते. संपत्तीचे वसुलीयोग्य मूल्य हे निव्वळ विक्रीमूल्य तसेच वापरातील मूल्यापेक्षा जास्त आहे. संपत्तीच्या सतत वापरानंतर आणि वापरायोग्य कालावधी संपल्यानंतर अशा संपत्तीच्या विल्हेवाटीपासून प्राप्त होणारा भविष्यातील अंदाजित अपेक्षित रोख प्रवाह हे संपत्तीचे वापरातील सध्याचे मूल्य आहे. बिघाडामुळे झालेले नुकसान नफातोट्याचे हिशेबात अथवा पुर्नमूल्यांकन संचिती मधून, जे लागू असेल त्याप्रमाणे विचारात घेण्यात येते.

के) **अनुदानाचे लेखांकन**

शासकीय अनुदानाशी संबंधित संलग्न अटींचे अनुपालन करण्यात येईल आणि अनुदान प्राप्त होईल यासंबंधाने पुरेशी खात्री असेल तरच असे अनुदान कंपनीव्दारे मान्य करण्यात येते.

प्रवर्तकाचे अंशदान या स्वरुपातील शासन अनुदान हे संचिती अंतर्गत जमा करण्यात येते व भागधारकाच्या निधीचा भाग म्हणून संबोधण्यात येते.

उत्पनाशी संबंधित शासकीय अनुदान, ज्या संबंधित खर्चाची भरपाई उद्देशित आहे त्या मर्यादेपर्यंत आवश्यक कालावधी मध्ये नफा तोटा पत्रकात पध्दतशीर आधारावर दर्शविण्यात येते. असे अनुदान एकतर उत्पन्नांतर्गत स्वतंत्रपणे दर्शविण्यात येते किंवा संबंधित खर्च प्रतिवेदित करतांना कमी करण्यात येते.

ठराविक कार्यविधीसाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधी संबंधित कार्यविधीच्या निधी लेख्यात जमा करण्यात आला आहे.

एल) **गुंतवणूक**

चालू गुंतवणूक अशी गुंतवणूक आहे की, ज्याचे स्वरुप त्वरीत वसुलीयोग्य आहे आणि ज्या मागील हेतू गुंतवणूक केल्याचे दिनांकापासून एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी ठेवण्याचा नाही.

एम) **संशोधन व विकास खर्च**

प्रायोगिक तत्वावर घेण्यात आलेली सिंचित /उर्जा रोपवने इत्यादि सह कंपनीमध्ये किंवा अन्यथा "**संशोधन व विकास**" या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आलेला खर्च ज्या वर्षात करण्यात आला त्याच वर्षी पूर्णपणे नफातोटयाचे हिशेबात सदर लेखाशिर्षाअंतर्गत खर्ची टाकण्यात आला आहे.

एन) **महसूल मान्यता**

मालाच्या विक्रीपासूनचे उत्पन्न महत्वाची जोखीम व स्वामित्वाचा मोबदला खरेदीदारांकडे स्थानांतरीत केल्यानंतरच मान्य करण्यात येते, आणि व्यापारी कसर व सूट विचारात घेवून निव्वळ रकमेने दर्शविण्यात आले आहे.

" टर्न की " आधारावर घेतलेल्या रोपवन प्रकल्पाचे बाबतीत लाभ किंवा हानीची परिगणना कंपनीव्दारे ज्या वर्षात प्रकल्प पूर्ण झाला / करार समाप्त झाला त्या वर्षात करण्यात आली आहे.

ओ) **रजा रोखीकरण**

कंपनीव्दारे कर्मचा-यांकरिता रजा रोखीकरण निवृत्ती लाभाकरिता तरतूद करण्यात येते. कर्मचा-यांना भविष्यात रोखीकरण करण्यासाठी ठराविक मर्यादेच्या अधिन राहून रजा संचय करण्याचा हक्क आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळाने कळविलेल्या वार्षिक रकमेच्या आधारावर देयतेची तरतूद करण्यात आली आहे.

---

**पी) सेवा उपदान**

भाविष्यात देय असलेल्या सेवा उपदानाच्या लाभाची प्रत्येक ताळेबंदाच्या दिनांकाची देयता भारतीय आयुर्विमा महामंडळातर्फे प्रक्षेपित एकक पत (Projected Unit credit Method) पध्दतीचा उपयोग करुन ठरविली जाते. विमागणित शास्त्रानुसार गृहीतकातील बदलामुळे उत्पन्न होणारा लाभ अथवा हानी निर्मितीच्या कालावधीचे नफातोटयाचे विवरणपत्रात दर्शविण्यात आली आहे.

सेवा उपदानासाठी भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या गट सेवाउपदान विमा योजनेमार्फत निधी उपलब्ध होत आहे.

आयुर्विमा महामंडळाने केलेल्या मुल्यांकनाचे आधारे कंपनीच्या पात्र समयश्रेणी कर्मचा-यांकरिता सेवा उपदानाची तरतूद करण्यात आली आहे.

**क्यू) वस्तू व सेवा (GST) कराची वसुली आणि शोधन**

वस्तू व सेवा (GST) कराची वसुली आणि भरणा याची नोंद त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या वेगळया लेख्यात करण्यात आली आहे. यापूर्वीच्या निर्धारण वर्षाशी संबंधित, यापूर्वी निश्चित करता येण्यासारखी नसलेली कोणतीही निर्विवाद कर मागणी ज्या वर्षात शोधन झाले किंवा आदेश प्राप्त झाले त्या वर्षात हिशेबात घेण्यात आली आहे.

**आर) शासकीय विभाग/यंत्रणाकडे स्थानांतरीत रोपवन व इतर संपत्तीचे क्षतिपूर्ती दावे**

शासकीय विभाग/यंत्रणांकडे स्थानांतरीत करावयाच्या रोपवन व इतर संपत्तीचे क्षतिपूर्ती दाव्याची रक्कम, प्रकल्प प्रस्तावास शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर कंपनीने सादर केलेल्या दाव्याच्या आधारे करण्यात आली आहे. कंपनीची रोपवन व इतर संपत्ती शासकीय विभागास सर्मपित केल्याचे प्रकरणी क्षतिपूर्तीच्या दाव्याची रक्कम खर्चाचे आधारावर दर्शविण्यात आली आहे.

**एस) तरतूद आणि संभाव्य देयता.**

भूतकाळातील घटनांपासून निर्मित संभवनीय दायित्व परंतु ज्याचे अस्तित्व घडणे किंवा न घडणे यावरुन निश्चित करता येईल, एक किंवा अधिक भविष्यकालीन घटना ज्या पूर्णपणे कंपनीच्या नियंत्रणात नाहीत किंवा ज्या प्रकरणात भविष्यकालीन साधनांच्या विल्हेवाटीसंबंधाने सध्याचे दायित्व मोजता येवू शकत नाही किंवा दायित्वाबाबत विश्वसनीय अंदाज करता येत नाही अशा संभाव्य देयता दर्शविण्यात आल्या आहेत.

साधनांच्या विल्हेवाटीत अंतर्भूत आर्थिक लाभामुळे दायित्व निकाली काढता येणे शक्य असेल आणि ज्या संबंधाने निश्चित अंदाज करता येतील अशा विश्वसनीय अंदाजाचे आधारावर तरतूद करण्यात आली आहे. केलेली तरतूद आवश्यकतेपेक्षा कमी नाही तसेच वर्षाचे शेवटचे दिनांकास असलेले दायित्व निकाली काढण्यासाठी आवश्यक तरतूद योग्य अशा अंदाजाचे आधारावर ठरविण्यात आली आहे.

संभाव्य संपत्ती विचारात घेण्यात आलेल्या नाहीत किंवा वित्तीय विवरणपत्रात प्रकटन करण्यात आलेले नाही.

### टी) उत्पन्नावरील करांचे लेखांकन

करासंबंधाने खर्चात चालू आयकर आणि लांबणीवर टाकलेला कर भार/जमा यांचा अंतर्भाव आहे. आयकर अधिनियम १९६१ च्या तरतूदीनुसार कर देयतेची परिगणना करुन त्या आधारावर दरवर्षी चालू कराची तरतूद करण्यात येते.

ताळेबंदाच्या दिनांकास अधिनियमित किंवा कायम अधिनियमित कर दर तसेच कर नियम यांचा उपयोग करुन कर देय उत्पन्न आणि लेख्यानुसार उत्पन्न यामधील कालावधीतील फरकामुळे लांबणीवर टाकलेल्या देयतेची नोंद करण्यात आली आहे. लांबणीवर टाकलेल्या संपत्तीच्या वसुलीची वाजवी निश्चिती असल्यानंतरच त्याचा विचार करण्यात येतो.

### यु) रोख प्रवाह विवरणपत्र

रोखप्रवाह अप्रत्यक्ष पध्दतीचा उपयोग करुन प्रतिवेदित करण्यात आला आहे. ज्याव्दारे रोख स्वरुपात नसलेले व्यवहार पुढे ढकललेले किंवा उपार्जित भूत किंवा भविष्यातील कामांपासून रोख प्राप्ती किंवा शोधन आणि गुंतवणूकीच्या किंवा वित्तीय रोख प्रवाहाशी संबंधित उत्पन्न किंवा खर्चाच्या कोणत्याही बाबी याच्या परिणामाकरिता आयकरापूर्वीचा नफा समायोजित करण्यात आला आहे. कंपनीचे कार्य, गुंतवणूक तसेच वित्तीय कार्यविधीपासूनचा रोखप्रवाह स्वतंत्रपणे दर्शविण्यात आला आहे.

### व्ही) वस्तुसूची

कृषी विषयक कार्यविधी आणि निष्काषित केलेले कृषी उत्पादन / वनोपज यांना भारतीय लेखांकन मानक (Ind AS) – 2 (वस्तूसूची) चे परिच्छेद ३ (अ) अन्वये जैविक संपत्तीमधून विनिर्दिष्टपणे वगळण्यात आल्यामुळे ते कंपनीला लागू नाही.

वस्तुसूची मध्ये अंतर्भूत प्रगतीपथावरील कामांचे मूल्यांकन परिव्यय मूल्यावर आधारीत आहे. कापणी प्रक्रियेच्या परिणाम स्वरुप प्राप्त उत्पादन म्हणजे विक्रीसाठी तयार वनोपज मालाच्या संवरण स्कंधाचे मूल्यांकन निव्वळ वसूलीयोग्य मूल्य / रास्त मूल्याने करण्यात आले असून अशा मूल्यातील बदल त्या कालावधीच्या नफा किंवा तोट्यात विचारात घेण्यात आला आहे.

### डब्ल्यू) प्रतिभाग मिळकत

समता भागधारकाचा संबंध असलेल्या चालू वर्षाचे नफा किंवा तोटयास या वर्षात शिल्लक असलेल्या समता भागाचे भारित सरासरीने भागून मूळ प्रतिभाग मिळकतीची परिगणना करण्यात आली आहे.

### एक्स) प्रस्तावित लाभांश

वार्षिक सर्वसाधारण सभेची मान्यता प्रलंबित असल्याने संचालक मंडळाने शिफारस केलेल्या लाभांशाची तरतूद लेख्यात करण्यात आली नाही. भागधारकांनी मान्यता दिलेल्या दिनांकास भागावरील लाभांशाची नोंद देयता म्हणून करण्यात येते.

## टिपणी - २३ विभाजनीय व्ययाचे संविभाजन

चालू वर्षातील एकूण रु.४४०८.३४ लाख (मागील वर्षी रु. ३३०२.७७ लाख) विभाजनीय व्ययापैकी रु.१८८७.८८ लाख (मागील वर्षी रु. १३४३.९९ लाख) रकमेचे ठराविक दीर्घ मुदती कार्यविधीवर त्या कार्यविधी अंतर्गत क्षेत्रीय कामावरील खर्चाचे प्रमाणात भांडवलीकरण करण्यात आले आहे.

## टिपणी — २४ पडीत जमिन विकास कार्यक्रम

शासन निर्णय क्रमांक एफएलडी- १०८६/३०३/प्रक्र-३/फ-२ दि. ३ जून १९८७, क्रमांक इजीएस-११८८/१८८/इजीएस-६ दि. ७ फेब्रुवारी १९८९ आणि क्रमांक एफडीएम-१०९०/२४००/ प्रक्र-७३/९०/फ-२ दि. १ फेब्रुवारी १९९१ नुसार शासन अर्थसहाय्याअंतर्गत त्याचप्रमाणे बँकांकडून अर्थसहाय्याअंतर्गत पडीत जमिन विकास कार्यक्रम राबविण्यात आला आहे. शासन अर्थसहाय्याअंतर्गत पडीत जमीन विकास कार्यक्रम रोजगार हमी योजना/महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोहयो सह महाराष्ट्र शासनाचा अभिकर्ता म्हणून राबविण्यात येत आहे. शासनाने आस्थापना व वरकड खर्च तसेच पडीत जमीन विकास कार्यक्रमाअंतर्गत कामाच्या खर्चासाठी पुरविलेला निधी हा प्राप्तीचे स्वरुप विचारात घेवून संचिती व अतिरेक, अप्रतिभूत ऋण तसेच ठेवी आणि अग्रिम या शिर्षाअंतर्गत विनियोजित करण्यात आला आहे आणि खर्च सुध्दा त्यानुसार संबंधित रोपवन लेख्याअंतर्गत विनियोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत प्राप्त निधीपेक्षा जास्त झालेला खर्च रु.२४७.४३ लाख, (मागील वर्षी रु. २३९.२० लक्ष) चल संपत्तीअंतर्गत येणे रकमांतर्गत दर्शविण्यात आला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत एकूण खर्चात पश्चिम नाशिक वनप्रकल्प विभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी सन २०१२-१३ मध्ये केलेल्या रु.११२.१४ लाख (मागील वर्षी रु. ११२.१४ लाख) खर्चाचा अंतर्भाव त्यांचे विरुध्द सुरु केलेल्या व प्रगतीपथावर असलेल्या चौकशीच्या निर्णयाच्या अधिन राहून आहे.

## टिपणी - २५ औषधी वनस्पती रोपवन कार्यविधी

कंपनीच्या औषधी वनस्पती रोपवन कार्यविधीअंतर्गत विविध स्त्रोताअंतर्गत प्राप्त निधी ताळेबंदात " संचिती व अतिरेक / ठेवी व अग्रिम " अंतर्गत दर्शविण्यात आला असून, खर्च "जैविक संपत्ती" अंतर्गत औषधी वनस्पती रोपवन कार्यविधी अंतर्गत दर्शविण्यात आला आहे. औषधी वनस्पती संवर्धन व विकास शाखेचा आस्थापना व वरकड खर्च हा औषधी वनस्पती कापणी कार्यविधीवर दर्शविण्यात आला आहे.

## टिपणी - २६ कॅम्पाअंतर्गत कार्यविधी / योजना

भारत सरकारने नैसर्गिक सहाय्यभूत पुनर्निर्मिती, वनव्यवस्थापन, पायाभूत सुविधांचा विकास, वन्यजीव संरक्षण व व्यवस्थापन व इतर संलग्न कार्यविधीसाठी कॅम्पाअंतर्गत प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेमार्फत निधी निर्गमित केला आहे. प्राप्त निधी व खर्च (निव्वळ खर्च) ताळेबंदात इतर चल देयता व इतर भाग — सचिंती व अतिरेक अंतर्गत अंतर्भूत करण्यात आला आहे

## टिपणी - २७ गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय

शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी/१००९/प्रक्र-११९/फ-१ दि.२५.११.२०११ नुसार नागपूर येथे गोरेवाडा प्रकल्प कंपनीव्दारे कोणत्याही अभिकर्तृत्व वर्तना शिवाय राबविण्यात येत आहे. चालू वर्षात कंपनीला यासाठी रु. ११९९.९९ लाख (मागील वर्षी रु. २०००.०० लाख) निधी प्राप्त झाला असून कंपनीव्दारे रु. ४३८२.४२ लाख (मागील वर्षी रु. २४०९.८६ लाख) खर्च करण्यात आला आहे. शासनाकडून मिळालेला निधी हा अप्रतिभूत ऋण व अग्रीमाचे स्वरुपात नसल्यामुळे प्राप्त निधी व खर्च (निव्वळ खर्च) "इतर चल देयता" या शिर्षाअंतर्गत अंतर्भूत करण्यात आला आहे. उपयोगात न आलेल्या निधीवरील व्याज इ. इतर उत्पन्नात अंतर्भूत करण्यात आला आहे.

एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड ही फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड (FDCM) ची दुय्यम अंगभूत कंपनी असून ती गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणिसंग्रहालयाच्या विकासासाठी दि १४.११.२०१८ रोजी संस्थापित झाली आहे. एफडीसीएम लि. ने दुय्यम अंगभूत कंपनीत रु. ५१००००/- चे ५१% समता भाग (५१००० भाग प्रत्येकी रु. १० दर्शनीमूल्याचे) धारण केलेले आहे. कंपनीने दुय्यम कंपनीत केलेली गुंतवणूक ही एक रुपया सांकेतिक मूल्याने अभिलिखित केलेली आहे कारण ही गुंतवणूक गोरेवाडा प्रकल्पाच्या निधीतून करण्यात आली आहे.

## टिपणी - २८ बीज उत्पादन क्षेत्र

मखमलाबाद, तळोदा, किनवट आणि आमगांव येथील (अंदाजे) ९०.०० हेक्टर क्षेत्रावरील बीज उत्पादन क्षेत्र त्यातील संपत्तीसह वनविभागाकडून घेतले असून ते कंपनीच्या वापरात व नियंत्रणाखाली आहे. सदर क्षेत्राचे वापरासंबंधी शर्ती व अटी दि. ३१ मार्च २०२० पर्यंत ठरविण्यात आलेल्या नाहीत.

## टिपणी - २९ वृक्षकाढणी / कापणी कार्यविधी

पर्यावरण आणि वन मंत्रालय भारत सरकार यांनी वन विषयक कामास, या कार्यविधी अंतर्गत निधीच्या अधिक्यातून व्यवस्थापन आराखडयानुसार (अनिवार्य) रोपवनांची निर्मिती व देखभाल करण्याचे अधिन राहून मान्यता प्रदान केली आहे. या वर्षात कंपनीने साग रोपवन कार्यवर्तुळाअंतर्गत वृक्षकाढणी व इतर कार्यवर्तुळांतर्गत कापणी कार्यविधी राबविली आहे. या कार्यक्रमाअंतर्गत या वर्षातील एकूण खर्च व महसूल अनुक्रमे उपयोग झालेल्या मालाची किंमत व मालाची विक्री या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविलेला आहे. कंपनीने जैविक संपत्ती अंतर्गत व्यवस्थापन आराखडयानुसार (अनिवार्य) रोपवन कार्यक्रमावर रु.४३३१.७७ लाख (मागील वर्षी रु. ४३३१.५६ लाख) खर्च केला आहे. वृक्ष काढणी कार्यविधीअंतर्गत निष्कासित मालाच्या विक्रीपासून प्राप्त महसूलातून भविष्यात व्यवस्थापन आराखडयानुसार (अनिवार्य) रोपवनांची निर्मिती व देखभाल करण्यासाठी पुरेसा निधी राखून ठेवावयाचा असल्याने त्यासाठी आवश्यक असलेल्या एकूण रु.२३४६.१२ लाख (मागील वर्षी रु. २७५८.०९ लाख निधीची तरतूद लागू असलेल्या किमान वेतन दरानुसार या वर्षात करण्यात आली आहे.

## टिपणी - ३० कंपनीकडे वनक्षेत्राचे हस्तांतरण

एफडीसीएम लिमिटेडकडे हस्तांतरित केलेले वनक्षेत्र निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पत्र क्रमांक एफडीसी-१०९४/प्रक्र-५७८/फ-५ दि.११.९.१९९७ व शासन निर्णय क्रमांक एफडीसी-१०९४/ प्रक्र-५७८/फ-५ दि.२३.९.१९९७ निर्गमित केलेला आहे. भूपट्टयाच्या करारपत्राव्दारे वनक्षेत्र हस्तांतरणाच्या शर्ती व अटी शासनाव्दारे अजूनपर्यंत निश्चित करण्यात आलेल्या नाहीत.

शासन निर्णय क्रमांक एफडीसी-१०७४/६४७४६/फ-५ दि. २७ जून १९७८ चे परिच्छेद क्रमांक (IX) अन्वये भूपट्टयाच्या कराराची अंमलबजावणी किंवा प्रत्यक्षात भूपट्टयावर जमिनीचा ताबा घेणे यापैकी जे अगोदर येईल तेंव्हापासून पाच वर्षापर्यंत वार्षिक रु.१/- याप्रमाणे भाडेपट्टी एफडीसीएम लिमिटेडने द्यावयाची होती. या कालावधीच्या समाप्तीनंतर शासन निश्चित करेल त्याप्रमाणे भाडेपट्टी एफडीसीएम लिमिटेडने शासनास द्यावयाची होती. तथापि भाडेपट्टी अजूनपर्यंत निश्चित करण्यात आलेली नाही. शासन निर्णय क्रमांक एफएलडी-१०८७/२४६२/प्रक्र-३४७/फ-२ दि. ६ सप्टेंबर १९९० नुसार, एफडीसीएम लिमिटेडने वार्षिक रु.१/- प्रति खंड (ब्लॉक) प्रमाणे भूपट्टयाचे भाडे द्यावयाचे आहे. तथापि वन जमिनीचे भूपट्टयाचे करारपत्र दि.३१.३.२०२० पर्यंत झालेले नसल्यामुळे या बाबींवरील देयता निश्चित झालेली नाही, त्यामुळे यापूर्वीचे दि. २७ जून १९७८ चे शासन निर्णयानुसार दि. ३१.३.२०२० पर्यंतच्या भाडेपट्टी देयतेची तरतूद करण्यात आली आहे.

## टिपणी - ३१ कंपनीकडून वनविभागास क्षेत्राचे हस्तांतरण

चालू आर्थिक वर्षात कंपनीने वन विभागास कोणतेही क्षेत्र हस्तांतरीत केलेले नाही.

## टिपणी - ३२ कंपनीची जमीन व इमारतीचा वनविभागाव्दारे ताबा

नाशिक प्रदेशातील तत्कालीन यावल विभागातील चोपडा येथील रु २१.९० लाख (मागील वर्षी रु. २१.९० लाख) रकमेची जमीन व इमारती वनविभागाच्या ताब्यात आहेत. तथापी ही संपत्ती पूर्णपणे अवक्षयीत झालेली आहे. यासंबंधीचा मोबदला किंवा इतर काही असल्यास याबाबत अजून अंतिम निर्णय झालेला नाही आणि त्यामुळे सदर संपत्तीची मालकी अजूनही कंपनीकडें आहे.

## टिपणी - ३३ वस्तुसूची/संपतीची प्रत्यक्ष पडताळणी

कंपनीच्या पूर्ण मालकिच्या जमीनीवर अचल संपत्तीचे हक्क विलेख (Title Deeds) कंपनीचे नांवावर आहेत. तथापी भाडेपट्टीने घेतलेल्या जमीनीवर बांधलेल्या ईमारतीच्या स्वरुपातील स्थावर मालमत्ता जरी कंपनीच्या मालकीची असली तरी कंपनीच्या नावे नाही.

व्यवस्थापनाने अखेरच्या स्कंधाची / संपत्तीची प्रत्यक्ष पडताळणी वर्षअखेर केलेली नाही, तथापि यापूर्वीच्या वर्षात खालील त्रुटी आढळून आलेल्या आहेत. स्थिर मालमत्ता नोंदवही ठेवण्यात आलेली असली तरी संपत्तीचे कोडींग / टॅगींग ई. चे कामे प्रगतीपथावर आहेत.

i) प्रत्यक्ष पडताळणीत मध्य चांदा वनप्रकल्प विभागात रु.३२.२९ लाख (मागील वर्षी रु. ३४.२९ लाख) किंमतीच्या वनोपज मालाच्या स्कंधात तुटीमुळे तफावत आढळून आली आहे. या प्रकरणात प्रशासकीय कार्यवाही सुरु असल्याने सदर माल " मालाचा अखेरचा निलंबन स्कंध" अंतर्गत ठेवण्यात आला आहे.

ii) प्राणहिता वनप्रकल्प विभागातील जिमलगट्टा विक्री आगारातील रु.५.१८ लाख ( मागील वर्षी ५.१८ लाख) किंमतीचा माल समाज विरोधी घटकाव्दारे जाळण्यात आला. या प्रकरणात प्रशासकीय कार्यवाही सुरु असल्याने सदर माल "मालाचा अखेरचा निलंबन स्कंध" अंतर्गत ठेवण्यात आला आहे.

**टिपणी - ३४ कर्मचा-यांचे सेवा उपदान व रजा रोखीकरण लाभासंबंधात प्रकटीकरण**

अ-१) एफडीसीएम लिमी., कर्मचा-यांचे संबंधाने (वनमजूर वगळून) सेवाउपदान :-

| १ | **गृहीतक** (Assumption) | **दि.३१.०३.२०१९ रोजी** | **दि.३१.०३.२०२० रोजी** |
|---|---|---|---|
| | सवलत दर | ७.५०% | ७.२५% |
| | वेतन वृध्दी | ७.००% | ७.००% |
| २ | **दि.३१.०३.२०२० रोजी दायित्वाचे वर्तमान मूल्यातील बदल दर्शविणारा तक्ता** | | रक्कम (रुपये) |
| | वर्षाच्या सुरुवातीस दायित्वाचे वर्तमान मूल्य | ३९५६७९३०४.०० | २९००६३५०५.०० |
| | व्याज खर्च | २९६७५९४७.०० | २१७५४७६३.०० |
| | चालू सेवा खर्च | २४२२७१८७.०० | १५९४६४७२.०० |
| | शोधन केलेले लाभ | (१०६०४७२६२.००) | (६९४५२६०१.००) |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (५३४७१६७१.००) | २९५११५५८.०० |
| | वर्ष अखेर दायित्वाचे वर्तमान मूल्य | २९००६३५०५.०० | २८७९०३६९७.०० |
| | | | |
| ३ | **दि.३१.०३.२०२० रोजी योजनांतर्गत मालमत्तेच्या रास्त मूल्यातील बदल दर्शविणारा तक्ता** | | |
| | वर्षाच्या सुरुवातीस योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ३१५१६८७०५.४२ | ४१५६६७१४०.५१ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अपेक्षित प्राप्ती | (३७४४०६१९.६३) | २६९८०६२६.९९ |
| | अंशदान | २४३९८६३१६.७२ | -- |
| | शोधन केलेले लाभ | (१०६०४७२६२.००) | (६९४५२६०१.००) |

| | | | |
|---|---|---|---|
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर विमागणितीय प्राप्ती/(नुकसान) | निरंक | निरंक |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४१५६६७१४०.५१ | ३७३१९५१६६.५० |
| ४ | **योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य दर्शविणारा तक्ता** | | |
| | वर्षाच्या सुरुवातीस योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ३१५१६८७०५.४२ | ४१५६६७१४०.५१ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीची प्रत्यक्ष प्राप्ती | (३७४४०६१९.६३) | २६९८०६२६.९९ |
| | अंशदान | २४३९८६३१६.७२ | निरंक |
| | शोधन केलेले लाभ | (१०६०४७२६२.००) | (६९४५२६०१.००) |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४१५६६७१४०.५१ | ३७३१९५१६६.५० |
| | निधीची स्थिती | १२५६०३६३५.५१ | ८५२९१४६९.५० |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अंदाजित प्राप्ती पेक्षा जास्तीची प्राप्ती | निरंक | निरंक |
| | (प्रत्यक्ष प्राप्ती दर = अंदाजित प्राप्ती दर वार्षिक नूतनीकरण दिनांक ३१ मार्च रोजी आल्यामुळे) | | |
| ५ | **दि.३१.०३.२०२० रोजी विचारात घेतलेले विमागणितीय प्राप्ती/नुकसान** | | |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | ५३४७१६७१.०० | (२९५९१५५८.००) |
| | वर्षाकरिता विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान योजनेअंतर्गत संपत्ती | निरंक | निरंक |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (५३४७१६७१.००) | २९५९१५५८.०० |
| | या वर्षातील विचारात घेतलेली विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (५३४७१६७१.००) | २९५९१५५८.०० |
| | | | |
| ६ | **ताळेबंद आणि नफातोटयाचे विवरणपत्रात विचारात घ्यावयाची रक्कम** | | |
| | वर्ष अखेर दायित्वाचे वर्तमान मूल्य | २९००६३५०५.०० | २८७९०३६९७.०० |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त | ४१५६६७१४०.५१ | ३७३१९५१६६.५० |

| | | | |
|---|---|---|---|
| | मूल्य | | |
| | निधीची स्थिती | १२५६०३६३५.५१ | ८५२९१४६९.५० |
| | ताळेबंदात विचारात घेतलेली निव्वळ संपत्ती / (देयता) | १२५६०३६३५.५१ | ८५२९१४६९.५० |
| ७ | **नफातोटयाच्या विवरणपत्रात विचारात घेतलेले खर्च** | | |
| | चालू सेवा मूल्य | २४२२७१८७.०० | १५९४६४७२.०० |
| | व्याज खर्च | २९६७५९४७.०० | २१७५४७६३.०० |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अपेक्षित प्राप्ती | (३७४४०६१९.६३) | (२६९८०६२६.९९) |
| | वर्षात विचारात घेतलेले निव्वळ विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (५३४७१६७१.००) | २९५९१५५८.०० |
| | नफा तोटयाचे विवरणपत्रात विचारात घेतलेला खर्च | ३७८७२०८२.०० | ४०३१२१६६.०० |

अ-२) वनमजूर संबंधाने सेवाउपदान :-

| १ | **गृहीतक (Assumption)** | **दि.३१.०३.२०१९ रोजी** | **दि.३१.०३.२०२० रोजी** |
|---|---|---|---|
| | सवलत दर | ७.५०% | ७.२५% |
| | वेतन वृध्दी | ७.००% | ७.००% |
| २ | **दि.३१.०३.२०२० रोजी दायित्वाचे वर्तमान मूल्यातील बदल दर्शविणारा तक्ता** | | रक्कम (रुपये) |
| | वर्षाच्या सुरुवातीस दायित्वाचे वर्तमान मूल्य | १७८४६९३६८.०० | १६८७१५३३८.०० |
| | व्याज खर्च | १३३८५२०३.०० | १२६५३६५०.०० |
| | चालू सेवा खर्च | ५४८२३७०.०० | ४९९१५९९.०० |
| | शोधन केलेले लाभ | (१७७१५१३५.००) | (२७४१५२४४.००) |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (१०४५१५६४.००) | १०४९७८७३.०० |
| | वर्ष अखेर दायित्वाचे वर्तमान मूल्य | १६९१७०२४२.०० | १६९४४३२१६.०० |
| | | | |
| ३ | **दि.३१.०३.२०२०२० रोजी योजनांतर्गत मालमत्तेच्या रास्त मूल्यातील बदल दर्शविणारा तक्ता** | | |
| | वर्षाच्या सुरुवातीस योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ३७५९८३९५.१९ | ५९७०१०८४.६२ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अपेक्षित प्राप्ती | २५८०८२९.८० | ३३४७९१२.५० |

| | | | |
|---|---|---|---|
| | अंशदान | ३७२३६९९४.६० | -- |
| | शोधन केलेले लाभ | (१७७१५१३५.००) | (२७४१५२४४.००) |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर विमागणितीय प्राप्ती/(नुकसान) | निरंक | निरंक |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ५९७०१०८४.६२ | ३५६३३७५३.२० |
| | | | |
| ४ | **योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य दर्शविणारा तक्ता** | | |
| | वर्षाच्या सुरुवातीस योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ३७५९८३९५.१९ | ५९७०१०८४.६२ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीची प्रत्यक्ष प्राप्ती | २५८०८२९.८३ | ३३४७९१२.५८ |
| | अंशदान | ३७२३६९९४.६० | -- |
| | शोधन केलेले लाभ | (१७७१५१३५.००) | (२७४१५२४४.००) |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ५९७०१०८४.६२ | ३५६३३७५३.२० |
| | निधीची स्थिती | (१०९४६९१५७.३८) | (१३३८०९४६२.८०) |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अंदाजित प्राप्ती पेक्षा जास्तीची प्राप्ती | निरंक | निरंक |
| | (प्रत्यक्ष प्राप्ती दर = अंदाजित प्राप्ती दर वार्षिक नूतनीकरण दिनांक ३१ मार्च रोजी आल्यामुळे) | | |
| | | | |
| ५ | **दि.३१.०३.२०२० रोजी विचारात घेतलेले विमागणितीय प्राप्ती/नुकसान** | | |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | १०४५१५६४.०० | (१०४९७८७३.००) |
| | वर्षाकरिता विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान-योजनेअंतर्गत संपत्ती | निरंक | निरंक |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (१०४५१५६४.००) | १०४९७८७३.०० |
| | या वर्षातील विचारात घेतलेली विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (१०४५१५६४.००) | १०४९७८७३.०० |
| | | | |
| ६ | **ताळेबंद आणि नफातोटयाचे विवरणपत्रात विचारात घ्यावयाची रक्कम** | | |
| | वर्ष अखेर दायित्वाचे वर्तमान मूल्य | १६९१७०२४२.०० | १६९४४३२१६.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ५९७०१०८४.६२ | ३५६३३७५३.२० |
| | निधीची स्थिती | (१०९४६९९५७.३८) | (१३३८०९४६२.८०) |
| | ताळेबंदात विचारात घेतलेली निव्वळ संपत्ती / (देयता) | (१०९४६९९५७.३८) | (१३३८०९४६२.८०) |
| | | | |
| ७ | **नफातोटयाच्या विवरणपत्रात विचारात घेतलेले खर्च** | | |
| | चालू सेवा मूल्य | ५४८२३७०.०० | ४९९१५९९.०० |
| | व्याज खर्च | १३३८५२०३.०० | १२६५३६५०.०० |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अपेक्षित प्राप्ती | (२५८०८२९.८३) | (३३४७९१२.५८) |
| | वर्षात विचारात घेतलेले निव्वळ विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (१०४५१५६४.००) | १०४९७८७३.०० |
| | नफा तोटयाचे विवरणपत्रात विचारात घेतलेला खर्च | ५८३५१७९.०० | २४७९५२०९.०० |

**ब)** कर्मचा-यांचे रजा रोखीकरण निवृत्ती लाभ भारतीय आर्युविमा महामंडळाशी संलग्न करण्यात आले आहे. तथापि यासंबंधाने प्रकटीकरण करण्यासाठी आवश्यक माहिती पुरविण्यास आर्युविमा महामंडळाने असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे लेखा मानकानुसार प्रकटीकरण करता येवू शकले नाही.

## टिपणी - ३५ कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्वाबाबत तरतूद

कंपनीने कॉर्पोरेट सामाजीक उत्तरदायीत्व कार्यविधी (CSR) व्यवस्थापनासाठी "एफडीसीएम सी एस आर" ट्रस्टची स्थापना केली आहे. एफडीसीएम सीएसआर ट्रस्ट ला केलेल्या अंशदानाचे स्वरुपात सीएसआर खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

रु कोटी

| तपशील | ३१ मार्च २०२० रोजी | ३१ मार्च २९०१९ रोजी |
|---|---|---|
| चालू वर्षात खर्च करावयाची रक्कम | २.५५ | २.०४ |
| मागील वर्षातील उपलब्ध रक्कम | -- | -- |
| एकूण | २.५५ | २.०४ |
| चालू वर्षात एफडीसीएम सीएसआर ट्रस्ट ला केलेले अंशदान (खर्च) | २.५५ | २.०४ |

## टिपणी - ३६ क्षतिपूर्ती दावे / शासन किंवा शासकीय यंत्रणाकडून येणे रकमा

संचालक मंडळाच्या निर्देशाप्रमाणे कंपनीची मालमत्ता/रोपवनाचे रु ७६.६३ लाख (मागील वर्षी रु. ११०७.७६ लाख) रकमेच्या क्षतीपूर्ती दाव्याचे या वर्षात लेखांकन करण्यात आले आहे. (टिपणी क्र. १६ पहावी)

तसेच महाराष्ट्र शासन/इतर य़ंत्रणाकडून महामंडळाला क्षतिपूर्ती दाव्यापोटी रु २९१३३.०४ लाख (मागील वर्षी २९१५६.३६ लाख) इतकी रक्कम येणे आहे. (टिपणी क्र. ३ पहावी).

सदर प्रकरणात वसुलीसाठी महाराष्ट्र शासन वा इतर य़ंत्रणाकडे कंपनीद्वारे पाठपुरावा सुरु आहे. येणे असलेल्या रक्कमा शासन किंवा शासकीय यंत्रणाकडून येणे असल्यामुळे येणे रक्कमा दिर्घकाळ प्रलंबित असल्या तरी संदिग्ध म्हणून कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

**टिपणी - ३७ उपयोगात न आलेल्या निधीवर व्याज व इतर उत्पन्न**

निधीच्या गुंतवणूकीवरील प्राप्त व्याज इतर उत्पन्नात अंतर्भूत करण्यात आले आहे. ज्या ठिकाणी शासन / निधी पुरविणा-या यंत्रणेकडून स्पष्ट सूचना असतील त्याठिकाणी प्राप्त व्याज हे देयता / इतर देणे म्हणून दर्शविण्यात आले आहे.

शासनास देय असलेली रक्कम तसेच राबविण्यात येत असलेल्या काही ठराविक योजनेअंतर्गत उपयोगात न आलेल्या इतर शासन निधीवर शासनाचे कोणत्याहि निर्देशाअभावी व्याजाची तरतूद करण्यांत आलेली नाही.

**टिपणी - ३८ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास कायदा २००६**

कंपनीकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारीत दि. ३१.३.२०२० रोजी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास कायदा २००६ अंतर्गत नोंदणीकृत कोणतेही सूक्ष्म, लघु आणि मध्यम कंत्राटदार / पुरवठाधारक व सेवा देणारे नाहीत.

**टिपणी - ३९ खंड प्रतिवेदन —**

कंपनीची मुख्य कार्यविधी ही रोपवन निर्मिती असल्यामुळे लेखांकनासंबंधी स्वतंत्र प्रतिवेदन देण्यायोग्य खंड नाही.

**टिपणी - ४० संबंधित पक्षकार व्यवहार प्रकटन -**

**(अ) संबंधित पक्षकारांची यादी**

**(I) दुय्यम अंगभूत कंपनी**

एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड.

(II) **व्यवस्थापकीय प्रमुख व त्यांचे संबंधित नातेवाईक**

श्री एन. वासुदेवन, व्यवस्थापकीय संचालक

डॉ. एन. रामबाबू, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक

**(III) इतर अस्तित्व**

अ) एफडीसीएम लि एम्प्लाइज जी.ज़ी.सि.ए. स्किम

ब) एफडीसीएम सीएसआर ट्रस्ट

**(ब) वरील संबंधित पक्षकारांसोबत केलेल्या व्यवहाराचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.**

## दुय्यम अंगभूत कंपनीत केलेली गुंतवणूक

| अ.क्र. | तपशील | वर्ष २०१९-२० | वर्ष २०१८-१९ |
|---|---|---|---|
| १ | एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड | रुपये १.०० | रुपये १.०० |

## व्यवस्थापकीय प्रमुख व त्यांचे नातेवाईकांसोबत केलेले व्यवहार:-

व्यवस्थापकीय संचालक हे कंपनीचे व्यवस्थापकीय प्रमुख म्हणून संबंधित पक्षकार आहेत. व्यवस्थापकीय संचालक यांना वेतन व भत्यांच्या शोधना व्यतिरिक्त संबंधित पक्षकार संबंधाने या वर्षात कोणतेही व्यवहार नाहीत.

| अ.क्र. | वर्ष २०१८-१९ | व्यवस्थापकीय प्रमुख | कालावधी | वेतन व भत्ते (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. एन. रामबाबू | व्यवस्थापकीय संचालक | १.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ | ३०.२६ |
| अ.क्र. | वर्ष २०१९-२० | व्यवस्थापकीय प्रमुख | कालावधी | वेतन व भत्ते (रुपये लाखात) |
| १ | डॉ. एन. रामबाबू | व्यवस्थापकीय संचालक | १.०४.२०१९ ते ३१.०३.२०२० | ३२.५५ |

## सामायीक नियंत्रणातील भागासंबधी व्यवहार

(रु कोटीत)

| अ.क्र. | वर्ष | एफडीसीएम सी एस आर ट्रस्ट | एफ. डी. सी. एम. लि. एम्प्लॉइज जी.जी.सी.ए. स्किम |
|---|---|---|---|
| | **२०१८-१९** | | |
| १ | वित्तीय वर्षातील अंशदान | २.०४ | १६.९६ |
| | **२०१९-२०** | | (रु कोटीत) |
| १ | वित्तीय वर्षातील अंशदान | २.५५ | २०.५० |

| अ.क्र. | एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लि. | वर्ष २०१९-२० | वर्ष २०१८-१९ |
|---|---|---|---|
| १ | व्हीजीएफ निधी (रु. कोटीत) | १०.०० | -- |
| २ | विद्युत खर्च (रु) | ६०९९१/- | -- |

**टिपणी - ४१ प्रती भाग मिळकत —**

समता भाग धारकांचा संबंध असलेल्या कालावधीकरीता निव्वळ नफ्यास या कालावधीत शिल्लक असलेल्या समता भागाचे भारित सरासरीने भागून मूळ प्रतिभाग मिळकतीची परिगणना करण्यात आली आहे. तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| प्रती भाग मिळकत | २०१९-२० | २०१८-१९ |
|---|---|---|
| कर आणि अनिवार्य संचिती चे तरतूदीनंतर निव्वळ नफा | रु.१३७०.४४ लाख | रु.७९४३.६५ लाख |
| भारित सरासरी समता भागाची संख्या | ३२३१२३४८ | ३२३१२३४८ |
| प्रती भाग मूळ / मिश्रीत मिळकत | रु. ४.२४ | रु. २४.५८ |

**टिपणी - ४२ लांबणीवर टाकलेली कर संपत्ती (निव्वळ)**

**(रु.लाखात)**

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१.०३.२०२० अखेरचे आकडे | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१.०३.२०१९ अखेरचे आकडे |
|---|---|---|
| **लांबणीवर टाकलेली कर संपत्ती** | | |
| संदिग्ध ऋणाकरिता तरतूद | १.८३ | ४.६६ |
| कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अंशदान तरतूद | ६.७९ | १५.९६ |
| संपत्ती, यंत्रे व उपकरणावरील घसारा | ४.९० | १५.४० |
| **एकूण** | **१३.५२** | **३६.०२** |
| **लांबणीवर टाकलेली कर देयता** | | |
| **लांबणीवर टाकलेली कर संपत्ती/(देयता) (निव्वळ)** | **१३.५२** | **३६.०२** |
| **चालू वर्षी लांबणीवर टाकलेला कर** | **२२.५०** | **३.१२** |

**टिपणी — ४३ बँकेतील शिल्लक / बँक हमी**

बँकेतील शिल्लकेत गुंतवणूक केलेल्या दिनांकापासून एक वर्षापेक्षा जास्त कालावधी नसलेल्या बँकेतील अल्पमुदती ठेवींचा समावेश आहे. रु. ७६.९८ लाख रकमेच्या (मागील वर्षी रु.८३.५१ लाख) अल्पमुदती ठेवी बँक हमी घेण्यासाठी बँकांकडे तारण ठेवण्यात आलेल्या आहेत.

**टिपणी - ४४ संपत्तीची हानी -**

संपत्तीचे बिघाड / नुकसान याबाबत सूचना आहे किंवा कसे यासंबंधाने ताळेबंदाचे दिवशी कंपनीने संपत्तीचे निर्धारण केले आहे. ताळेबंदाच्या दिवशी संपत्तीला बिघाड /हानी झाल्याबाबत कोणतीही सूचना नाही.

## टिपणी - ४५ आयकर तरतूद

(रु. लाखात)

| आयकराची तरतूद | २०१९-२० | २०१८-१९ |
|---|---|---|
| सुरुवातीची शिल्लक | १७४०४.०० | १४१२९.०० |
| चालू वर्षातील भर | १०५०.०० | ३२७५.०० |
| एकूण | १८४५४.०० | १७४०४.०० |
| वजा: चालू वर्षातील समायोजना | -- | -- |
| अखेरची शिल्लक | १८४५४.०० | १७४०४.०० |

उत्पन्नाची कृषी तसेच अकृषी या दोन भागात विभागणी करुन प्रत्येक भागाअंतर्गत येणा-या उत्पन्न व खर्चाच्या सर्व ओळख योग्य बाबी विचारात घेवून त्या आधारावर आयकराकरिता रु.१०५०.०० लाख ( मागील वर्षी रु. ३२७५.०० लाख ) रकमेची तरतूद करण्यात आली आहे. सामान्य स्वरुपाच्या महसूली खर्चाची विभागणी प्रत्येक भागावर अशा विभागणीपूर्वी त्या भागातील एकूण प्राप्तीचे आधारे करण्यात आली आहे.

## टिपणी - ४६ संभाव्य देयता

तरतूद न केलेली संभाव्य देयता आणि कंपनी विरुध्द केलेल्या दाव्याचे संबंधात न स्विकारलेल्या देयता :-

ए) i) कंपनीच्या मालकीची/कंपनीचे ताब्यात असलेली काही जमीन, ईमारती इत्यादी वरील नगरपालिका आणि इतर स्थानिक करासंबंधी, निर्धारण प्रलंबित असल्यामुळे तसेच काही प्रकरणात देयता स्विकृत न केल्यामुळे :- याबाबत देयता रक्कम स्पष्ट करण्यासारखी नाही.

ii) सन १९९२-९३ ते २०१९-२० या वर्षाकरिता आगार विभाग बल्लारशाचे बाबतीत नगर परिषद करासंबंधी रु. ८१.३१ लाख (मागील वर्षी रु.६४.७९ लाख) रकमेची देयता समुचित प्राधिका-यांकडे अपील प्रलंबित असल्यामुळे कंपनीने स्विकृत केलेली नाही.

iii) जमीन महसूल जर काही असल्यास.

बी) ताळेबंदाचे दिवशी भांडवली कार्यावरील अंमलबजावणीस शिल्लक असलेल्या कराराची तरतूद न केलेली अंदाजित रक्कम :- निरंक.

सी) i) पात्र मजूरांसाठी या अगोदरच्या वर्षाची भविष्य निर्वाह निधीचे संबंधात जर काही देयता असल्यास.

ii) विविध वनप्रकल्प विभागाअंतर्गत कंपनीव्दारे मजूरांच्या भविष्य निर्वाह निधीचे शोधनात अनियमितता /शोधन न करणे या संबंधाने भविष्य निर्वाह निधी आयुक्त,

नागपूर यांनी आकारलेल्या नुकसान भरपाई बाबत अंदाजित देयता रु. २०८६.९८ लाख (मागील वर्षी रु.१८८४.२३ लाख) सदरहू प्रकरणी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अपील न्यायाधिकरण, नवी दिल्ली यांचे निर्देशानुसार पुढील निर्णयाचे अधिन राहून कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

iii) मजूरांचे संबंधाने उपदानाबाबत जर काही देयता असल्यास.

iv) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे आदेशान्वये किनवट वनप्रकल्प विभागातील मजूरांना कामावरुन कमी करण्याच्या बाबतीत देयता रु.२६.३४ लाख (मागील वर्षी रु.२६.३४ लाख) आणि श्री. के.डी.चव्हाण वनमजूर यांच्यावर झालेल्या वन्य प्राण्याच्या हल्ल्यात जखमी झाल्यामुळे नुकसान भरपाई संबंधाने श्रम न्यायालय नांदेड यांचे प्रकरण क्रमांक डब्लसीए /११/२००० मधील आदेशानुसार व कंपनीने केलेले अपील प्रलंबीत असल्याने देयता रु. ०.८३ लाख.

v) कर निर्धारण वर्ष २०१०-११ व २०११-१२ संबंधाने मूल्य वर्धीत कराची देयता रु. १९.५४ लाख (मागील वर्षी रु. १३.५३ लाख).

डी) विक्रीकर / मूल्यवर्धीत कर वस्तू व सेवा कर / आयकर निर्धारण प्रलंबित असल्यामुळे/लांबणीवर टाकल्यामुळे भूर्दंड, व्याज इ. बाबत जर काही देयता असल्यास.

ई) कर्मचारी आणि मजूर यांच्या विविध मागण्या अभिनिर्णयासाठी प्रलंबित असल्यामुळे, त्याबाबत देयता निश्चित करता येण्यासारखी नाही.

एफ) रोपवन क्षेत्रातील उभ्या झाडांची प्रत्यक्ष पडताळणी न झाल्यामुळे काही संभाव्य नुकसान इत्यादी असल्यास.

जी) टिपणी क्र. २८ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे बीज उत्पादन क्षेत्रासंबंधी निर्धारित न केलेला मोबदला :- रक्कम निश्चित करता येण्यासारखी नाही.

एच) मा. श्रम न्यायालय यांचे तक्रार युएलपी क्र.२७/२०१४ मधील आदेशानुसार नाशिक प्रदेशातील नंदूरबार विभागातील श्री.एस.जे.बारजिभे वनरक्षक यांना वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त केल्याने व अपिल प्रलंबित असल्याने वेतन व भत्ते यांची देयता अंदाजे रु. २१.६१ लाख. ( मागील वर्षी २१.२५ लाख )

आय) मा. श्रम न्यायालय तृतीय नागपूर यांनी प्रकरण क्र. पीजीए/३/२०१३ अन्वये दि. २८.९.२०१५ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार श्री. के.जी.सहारे मजूर नागपूर वन प्रकल्प विभाग यांना सेवा उपदानाचे संबंधाने, कंपनीने दाखल केलेले अपील प्रलंबीत असल्याने देयता रु ०.९७ लाख.

---

जे) एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लि. (सहाय्यक कंपनी) ने मागणी केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम रु. ४९४८८८९७/- अजूनपर्यंत कंपनीने मान्य केलेली नाही.

के) आगार विभाग बल्लारशाह येथील आकस्मिक कामगारांना कामावरुन कमी केल्याचे विरोधात कामगारांनी मा. सुप्रीम कोर्टात दाखल केलेली विशेष याचिका क्र. एसएलपी/८८३६/२०१५ प्रलंबीत असल्याने अंदाजे देयता रु. ३२.५७ लाख (मागील वर्षी).

## टिपणी - ४७ संकिर्ण / इतर महत्त्वाच्या बाबी

अ) व्यापारी येणे अंतर्गत विविध लेख्यातील वैयक्तिक शिल्लक, येणे रकमा आणि इतर येणे विकलनाधिक्य यांस पुष्टी मिळालेली नाही.

ब) रोख व बँकेतील शिल्लक रकमेच्या आधिक्यात गोंदिया वन प्रकल्प विभागातील रोख रकमेची लुटमार झालेल्या रु.३.२२ लाख भरणा न केलेल्या महसूलाचा (मागील वर्षी रु.३.२२ लाख) समावेश आहे. सदर प्रकरणी विभागीय चौकशीची कार्यवाही अजून पूर्ण झालेली नाही.

क) अल्पमुदती ऋण व अग्रिम यात कर्मचा-यांकडून नामंजूर प्रमाणकांची वसुलीयोग्य रक्कम रु.१०८.२९ लाख (मागील वर्षी रु.६७.८२ लाख) चा समावेश आहे.

ड) कंपनीच्या आधीच ताब्यात असलेल्या जमिनीच्या अनुषंगाने जमीन महसूल इ. देय असल्यास त्या संबंधाने कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

ई) जनहित याचिका क्रमांक ३४२१५ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ यांनी पूर्वीच्या खामगाव वन प्रकल्प विभागाचे रोजगार हमी योजना संबंधाने विशेष लेखा परीक्षण करण्याचे निर्देश दिलेले असून मे. ए.एस. दाणी आणि कंपनी सनदी लेखापाल यांनी त्यांचा अहवाल सादर केलेला आहे व प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

फ) वितरकाना खर्चासाठी दिलेले अग्रीम वितरकाचे पदनामाने बँकेत खाते उघडून हाताळण्यात येत असून ऋण व अग्रीम म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे.

ग) ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या वर्षाच्या कंपनीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या अभिप्रायाचे अनुपालन करण्यासाठी चालू वर्षी सातव्या वेतन आयोगानुसार थकबाकीची आवश्यक तरतूद करण्यात आलेली आहे.

ह) चालू वर्षी कर्मचा-यांसाठी प्रोत्साहनात्मक रकमेचे शोधनासाठी अंदाजे रु. ६.०० कोटीची तदर्थ तरतूद करण्यात आलेली आहे.

य) कोविड-१९ महामारी मुळे दि. २५ मार्च, २०२० रोजी सुरु झालेल्या टाळेबंदी मुळे देशभरातील आर्थिक कार्यविधीत महत्वपूर्ण घट होउन त्याचे परिणाम स्वरुप कंपनीचे व्यावसायिक कार्य प्रभावित झाल्यामुळे अखेर त्याचा परिणाम वित्तीय विवरणपत्रावर झाला आहे.

**टिपणी क्र. ४८ पुनःर्गट आणि फेर मांडणी**

ताळेबंद, समावेशक उत्पन्नासह नफातोटापत्रक आणि रोख प्रवाह विवरणपत्र व भाग भांडवलातील बदलाचे विवरणपत्र व त्यांचेशी संबंधित असलेल्या टिपणीमधील मागील वर्षाचे आकडे आवश्यक त्या ठिकाणी पुनर्गट आणि फेर मांडणी करुन घेतलेले आहेत. वित्तीय विवरण पत्रातील आकडे जवळच्या रुपयात दर्शविण्यात आलेले आहेत.

वित्तीय विवरणपत्राचा अविभाज्य भाग असलेल्या टिपणी क्र. १ ते ४८ करिता स्वाक्षरी.

आमचे सम दिनांकाचे संलग्न अहवालानुसार
रतन चांडक आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. १०८६९६ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए सुधीर बाहेती)
भागीदार
स.क्र.०४२७११

शाह बाहेती चांडक आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए जय पोपटानी)
भागीदार
स.क्र.१३५०३८
स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०

संचालक मंडळाचे वतीने व करिता

स्वाक्षरित
(डॉ. एन. रामबाबू)
संचालक
सं.ओ.क्र # ०८१३५५०७

स्वाक्षरित
(एन. वासुदेवन)
व्यवस्थापकीय संचालक
सं.ओ.क्र # ०८९४०३१९

स्वाक्षरित
(सीएस सौरव सिंह)
कंपनी सचिव
ए-२२०५३
स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०

# महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

CIN : U45200MH1974SGC017206

# एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे २०१९-२०

पंजियीत कार्यालय:एफडीसीएम भवन, प्लॉट नं. ३५९/ब, अंबाझरी, हिंगणा रोड, नागपूर-४४० ०३६

# महालेखाकार (लेखापरीक्षा) - II, महाराष्ट्र, नागपुर
# ACCOUNTANT GENERAL (AUDIT) - II, MAHARASHTRA,NAGPUR

**गोपनीय**

डी.पी.सेल(ए एम जी-II)/एफडीसीएम/१९-२०/१६१
दिनांक -

प्रति,
व्यवस्थापकीय संचालक
फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड
एफडीसीएम भवन, ३५९/ब, अंबाझरी, हिंगणा रोड,
नागपूर ४४० ०३६.

विषय: फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर च्या दि.३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रिकृत लेख्यावर कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (ब) अंतर्गत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे अभिप्राय.

महोदय / महोदया,

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर च्या दि.३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रिकृत लेख्यावर कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (ब) अंतर्गत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे अभिप्राय (comment) सोबत जोडले आहेत.

वार्षिक सर्वसाधारण सभा (A.G.M.) झाल्यानंतर वार्षिक अहवालाच्या तीन छापील प्रती या कार्यालयास कृपया पाठविण्यात याव्यात, तसेच उपरोक्त वार्षिक अहवाल विधान सभेत सादर करण्याची तारीख या कार्यालयास कळवावी.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत
(एल. हांगशींग)
प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा) - II

सहपत्र: वरील प्रमाणे

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (ब) कलम १२९ (४) सह वाचावे त्याअंतर्गत फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूरच्या दि.३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रिकृत वित्तीय विवरण पत्रावरील अभिप्राय**

---

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर च्या दि. ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे, कंपनी अधिनियम २०१३ नुसार विहीत केलेल्या वित्तीय अहवालाचे चौकटीत तयार करण्याची जबाबदारी ही कंपनीच्या व्यवस्थापनाची आहे. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३९(५) कलम १२९ (४) सह वाचावे त्यानुसार नियुक्त केलेले सांविधिक लेखा परीक्षक हे अधिनियमाच्या कलम १४३ अंतर्गत त्यांनी स्वतंत्रपणे केलेल्या लेखापरीक्षणाचे आधारे व इंस्टीटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंटस् ऑफ इंडिया या व्यावसायिक संस्थेने विहीत केलेल्या अंकेक्षणाच्या प्रमाणानुसार या वित्तीय विवरणपत्रावर अभिप्राय व्यक्त करण्यासाठी कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १४३(१०) नुसार जबाबदार आहेत. त्यांनी ही जबाबदारी पार पाडलेली असल्याचे दिनांक २९ डिसेबंर, २०२० रोजीच्या लेखा परीक्षकांच्या अहवालात नमूद केलेले आहे.

मी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे वतीने कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ (६) (अ) अधिनियमाच्या कलम १२९ (४) सह वाचावे त्यानुसार फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूरच्या दिनांक ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे पूरक लेखा परीक्षण केलेले आहे. परंतु एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमिटेड (सहाय्यक कंपनी) च्या त्याच दिवशी संपलेल्या वर्षाकरिता वित्तीय विवरणपत्राचे लेखापरीक्षण केलेले नाही. हे पूरक लेखापरीक्षण आम्ही सांविधिक लेखा परीक्षकांचे कामाची कागदपत्रे न पाहता आणि मूलत: सांविधिक लेखापरीक्षकांनी केलेल्या प्राथमिक तपासाला मर्यादित राहून स्वतंत्रपणे आणि कंपनीच्या अभिमत व्यक्ती व लेखांकनासंबंधी निवडक अभिलेख तपासून केले आहे.

माझ्या पूरक लेखा परीक्षणाच्या आधारावर अधिनियमाच्या १४३ (६) (ब) कलम १२९ (४) सह वाचल्यास त्या अंतर्गत माझे निदर्शनास आलेल्या आणि माझ्या मते एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे आणि संबंधित लेखा परीक्षण अहवालाची योग्य समज येणे आवश्यक असल्याने खालील महत्वपूर्ण बाबी नमूद करु इच्छितो-

**अ. एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रावर लेखापरीक्षकाचे अहवालावर अभिप्राय लेखापरीक्षकांच्या अहवालाचे सहपत्र क.**

१. सांविधीक लेखापरीक्षकांनी सांविधिक लेखापरीक्षण अहवालाचे सहपत्र क मध्ये कंपनी विरुध्द १२ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असल्याचे नमूद केले आहे. तथापि कंपनीच्या नोंदीनुसार दि. ३१/३/२०२० रोजी २३९ न्यायालयीन प्रकरणे चार प्रदेशाचे प्रकरणासह कंपनी विरुध्द प्रलंबित होती. त्यामुळे लेखापरीक्षकांचा अहवाल त्या मर्यादेपर्यंत अपूर्ण आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक
यांचे वतीने व करिता
स्वाक्षरीत
(एल. हांगशींग)
प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा) - II

स्थळ : नागपूर
दिनांक: १५/०७/२०२१

शाह बाहेती चांडक आणि कंपनी,
सनदी लेखापाल,
२०५ घटाटे चेंबर,
पंचशील चौक
नागपूर - ४४० ०१२.

रतन चांडक आणि कंपनी,
सनदी लेखापाल,
४८७ 'गोधुली', लेन्ड्रा पार्क जवळ,
रामदासपेठ,
नागपूर - ४४० ०१०.

## "स्वतंत्र लेखा परीक्षकांचा अहवाल"

प्रति,
सभासद,
फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

## एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे लेखा परीक्षणावर अहवाल

### १. अभिप्राय

आम्ही फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (यानंतर सूत्रधारी कंपनी म्हणून निर्दिष्ट) चे सोबतचे एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे ज्यात दिनांक ३१ मार्च २०२० रोजीचा एकत्रिकृत ताळेबंद, एकत्रिकृत नफातोट्याचा हिशेब (इतर समावेशक उत्पन्न अंतर्भूत करुन) व रोख प्रवाह विवरण पत्र, वर्ष अखेर भाग भांडवलातील बदलाचे विवरणपत्र तसेच महत्वाच्या लेखा विषयक धोरणाचा सारांश आणि त्यासोबत जोडलेल्या इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचे लेखापरीक्षण केले आहे.

आमच्या मते व संपूर्ण माहितीनुसार आणि आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार आणि टिपणी क्र. ४६ जे चे अधिन राहून पूर्वोक्त वित्तीय विवरणपत्रे कंपनी अधिनियम २०१३ (अधिनियम) नुसार आवश्यक असलेली माहिती देत असून अधिनियमाच्या कलम १३३ सुधारित कंपनी (भारतीय लेखांकन मानक) नियम २०१५ सह वाचल्यास त्याअन्वये विहित केलेल्या भारतीय लेखांकन मानकाशी (Ind AS) अनुरुप आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वानुसार कंपनीची दि. ३१ मार्च २०२० रोजीची स्थिती, एकत्रिकृत नफा व एकूण एकत्रिकृत समावेशक उत्पन्न, एकत्रिकृत भाग भांडवलातील बदलाचे विवरणपत्र आणि त्या दिवशी संपणा-या वर्षाकरिता एकत्रिकृत रोख प्रवाह विवरणपत्र यांची खरी व वास्तववादी स्थिती दर्शवित आहेत.

### २. अभिप्रायाकरिता आधार

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३(१०) अंतर्गत विनिर्दिष्ट लेखापरीक्षण मानकानुसार (SAs) आम्ही एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे आमचे लेखापरीक्षण केले आहे. ह्या मानकांतर्गत आमच्या जबाबदा-या पुढे एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे लेखापरीक्षणा करिता जबाबदा-या अंतर्गत वर्णन केल्या असून त्या आमच्या अहवालाचा भाग आहेत. भारतीय सनदी लेखापाल संस्थेव्दारे निर्गमित नीतितत्व संहितेनुसार तसेच कंपनी अधिनियम २०१३ च्या तरतूदी आणि त्यामधील नियमा अंतर्गत एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राच्या आमच्या लेखापरीक्षणाशी सुसंबध्द असलेल्या नैतिक आवश्यकता सह आणि सदर आवश्यकता तसेच नितितत्व संहितेनुसार आम्ही आमच्या इतर नैतिक जबाबदा-या पार पाडल्या असून त्यानुसार आम्ही कंपनीपासून स्वतंत्र आहोत. आम्ही प्राप्त केलेला लेखापरीक्षण विषयक पुरावा एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रावर आमचे अभिप्राय व्यक्त करण्यासाठी पुरेसा व समर्पक आधार आहे असा आम्हाला विश्वास आहे.

**महत्वपूर्ण बाब (Emphasis of Matter)**

एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड, नागपूर (यापुढे 'सहाय्यक कंपनी' म्हणून उल्लेखित) सूत्रधारी कंपनीच्या या सहाय्यक कंपनीच्या सांविधिक लेखापरीक्षकांनी त्यांच्या लेखापरीक्षा अहवालात खालील बाबी महत्वपूर्ण बाबी म्हणून प्रतिवेदित केल्या आहेत.

i) फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड (एफडीसीएम) कडून व्हायबिलिटी गॅप फंड म्हणून रु. ४९४८८९७/- ची रक्कम येणे दर्शविली आहे. एफडीसीएमलि कडून प्राप्त माहितीनुसार एफडीसीएम लिमीटेड च्या संचालक मंडळाने या प्रकरणात निर्णय घेतलेला नाही आणि म्हणून ही रक्कम एफडीसीएमलि च्या लेखा पुस्तकात समाविष्ट करण्यात आलेली नाही.

ii) सहाय्यक कंपनीच्या लेखा परीक्षित वित्तीय विवरणपत्राच्या महत्वाच्या लेखा विषयक धोरणातील टिपणी क्र. १५ चे मुद्दा क्र. (v) कडे लक्ष वेधण्यात येत आहे, व्यवस्थापनाने कंपनीच्या कार्यावर कोवीड चा प्रभाव निर्धारित केला आहे.

iii) सहाय्यक कंपनीच्या लेखा परीक्षित वित्तीय विवरणपत्राच्या महत्वाच्या लेखा विषयक धोरणातील टिपणी क्र. १५ चे मुद्दा क्र. (एस) कडे लक्ष वेधण्यात येत आहे, व्यवस्थापनाने चालू संकल्पना आधाराचे (of going concern) निर्धारण केले आहे.

एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमिटेड नागपूर (सहाय्यक कंपनी) च्या सांविधिक लेखा परीक्षकांनी ह्या प्रकरणा संबंधाने त्यांचे निष्कर्षात सुधारणा नाही असे प्रतिवेदित केले आहे.

**३. लेखापरीक्षण विषयक महत्वाच्या बाबी**

लेखापरीक्षण विषयक महत्वाच्या बाबी अशा बाबी आहेत की ज्या आमच्या व्यावसायिक विवेचक दृष्टिने एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे चालू कालावधीच्या आमच्या लेखापरीक्षणात अत्यंत महत्वपूर्ण होत्या. अशा बाबी संपूर्ण एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राच्या आमच्या लेखापरीक्षणाचे संदर्भाने तसेच त्यावर आमचे अभिप्राय तयार करतांना संबोधित करण्यात आल्या होत्या आणि अशा बाबी संबंधाने आम्ही वेगळे अभिप्राय व्यक्त करीत नाही.

**४. एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राबद्दल व्यवस्थापनाची जबाबदारी**

भारतीय लेखांकन मानक (Ind AS) आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वानुसार एकत्रिकृत वित्तीय स्थिती, एकत्रिकृत वित्तीय कार्य, एकत्रिकृत एकूण समावेशक उत्पन्न, एकत्रिकृत भाग भांडवलातील बदलाचे विवरणपत्र आणि समूहाचे एकत्रिकृत रोख प्रवाह विवरणपत्र याबाबत कंपनी अधिनियम २०१३ ("अधिनियम") च्या कलम १३४ (५) मध्ये नमूद केलेल्या बाबी संबंधाने खरी व वास्तववादी स्थिती दर्शविणारे स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रे तयार करण्यासाठी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहे. या जबाबदारीमध्ये अधिनियमातील तरतूदीनुसार कंपनीच्या मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी पुरेसे लेखांकन दस्तऐवज ठेवणे तसेच फसवणूक आणि इतर अनियमितताचा तपास करणे व प्रतिबंध करण्यासाठी योग्य लेखा विषयक धोरणाची निवड करुन लागू करणे, वाजवी आणि दूरदर्शी प्राक्कलन करणे आणि निर्णय घेणे, फसवणूक आणि चुका यामुळे महत्वपूर्ण असत्यकथनापासून मुक्त आणि खरी व वास्तववादी स्थिती दर्शविणारे वित्तीय विवरणपत्रे तयार करणे व सादर करण्यासंबंधाने लेखाकंन दस्तऐवजाची अचूकता व पूर्तता याची खात्री करण्यासाठी पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची आखणी, अंमलबजावणी व पालन करणे इत्यादिचा सुध्दा अंतर्भाव होतो. जोपर्यंत व्यवस्थापन एकतर समूहाचे परिसमापन करीत नाही

किंवा कार्य करणे थांबवित नाही किंवा तसे केल्याशिवाय वास्तववादी विकल्प उपलब्ध राहत नाही तोपर्यंत कार्य चालू ठेवण्यासाठी (Going Concern) समूहाच्या कार्यकुशलतेचे निर्धारण करणे, कार्य चालू ठेवण्यासाठी संबंधित बाबीचे प्रकटन करणे आणि लेखांकन कार्य चालू ठेवण्याबाबत (Going concern) आधाराचा उपयोग करणे यासाठी एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे तयार करतांना समूहात समाविष्ट कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहे.

**५. लेखापरीक्षकांची जबाबदारी**

संपूर्ण एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे फसवणूक किंवा चुका यामुळे महत्वपूर्ण असत्यकथनापासून मुक्त आहेत यासंबंधाने वाजवी आश्वासन प्राप्त करणे आणि आमचे अभिप्राय अंतर्भूत असलेला लेखापरीक्षकांचा अहवाल निर्गमित करणे हे आमचे उद्देश आहेत. वाजवी आश्वासन हे आश्वासनाची वरिष्ट पातळी आहे. परंतु प्रमाण लेखांकन मानकानुसार केलेले लेखापरीक्षण अस्तित्वात असलेल्या महत्वपूर्ण असत्कथनाचा नेहमी तपास करेल याची हमी नसते. असत्यकथन हे फसवणूक किंवा चुका पासून उद्भवू शकते आणि जर अशा एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे आधारावर उपयोगकर्त्याचे आर्थिक निर्णय वैयक्तिकरित्या, एकूणात, संयुक्तपणे प्रभावित होणे अपेक्षित असल्यास सदर असत्यकथन हे महत्वपूर्ण मानण्यात येते. प्रमाण लेखांकन मानकानुसार लेखापरीक्षणाचा भाग म्हणून आम्ही व्यावसायिक विवेकबुध्दीचा वापर करुन लेखा परीक्षणात संपूर्णपणे व्यावसायिक संशयी वृत्तीचे पालन केले आहे.

आम्हाला देखील चुका किंवा फसवणूक यामुळे एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राच्या महत्वपूर्ण असत्यकथनाच्या जबाबदा-यांची ओळख व अंदाज आहे. अशा जबाबदा-यास प्रतियोगी स्वरुपाच्या लेखापरीक्षा कार्यपध्दतीची आखणी करुन त्याप्रमाणे लेखापरीक्षणाचे कार्य केले जाते. आणि आमच्या अभिप्रायाबाबत आधार तयार करण्यासाठी योग्य व पुरेसे लेखापरीक्षण पुरावे प्राप्त केले जातात. फसवणुकीमध्ये संगनमत, बनावट दस्तऐवज तयार करणे उद्देशपूर्वक अकृती, विपर्यास करणे किंवा अंतर्गत नियंत्रण अधिभावी ठरणे यासारख्या बाबी अंतर्भूत होत असल्याने चुकामंळे उद्भवणा-या जबाबदारीपेक्षा फसवणूकीपासून महत्वपूर्ण असत्यकथनाचा तपास न होण्याची जबाबदारी जास्त असते.

परिस्थितीशी अनुरुप अशा योग्य लेखापरीक्षा कार्यपध्दतीची आखणी करण्यासाठी लेखापरीक्षणाशी संबंधित अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची समज करुन घेण्यात येते. कंपनीकडे पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रण पध्दती अस्तित्वात आहे काय, अशा नियंत्रण पध्दतीची परिणामकारकता यासंबंधाने कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३ (३) अंतर्गत आमचे मत व्यक्त करण्यासाठी आम्ही जबाबदार आहोत.

व्यवस्थापनाने उपयोगात आणलेल्या लेखाविषयक धोरणांची समुचितता, लेखांकन प्राक्कलने आणि केलेले संबंधित प्रकटन याचे मूल्यमापन केले जाते.

समूहाच्या कार्य चालू ठेवण्याचे कार्यक्षमतेबाबत शंका उपस्थित करणा-या घटना किंवा परिस्थितीचे संबंधाने विशेष स्वरुपाची अनिश्चितता अस्तित्वात असल्यास लेखापरीक्षण पुराव्याचे आधारावर व्यवस्थापनाने उपयोगात आणलेल्या लेखांकनाचे कार्य चालू ठेवण्याचे आधाराबाबतच्या समुचिततेवर निष्कर्ष काढण्यात येतो. विशेष स्वरुपाची अनिश्चितता

अस्तित्वात असल्याबाबत आम्ही निष्कर्ष काढल्यास आमच्या लेखापरीक्षकांच्या अहवालात वित्तीय विवरणपत्रातील संबंधित प्रकटनाकडे लक्ष वेधणे आम्हाला आवश्यक असते किंवा जर असे प्रकटन अपर्याप्त असेल तर आमचे अभिप्रायात दुरुस्ती करावी लागते. आम्ही काढलेले निष्कर्ष आमच्या लेखापरीक्षकांच्या अहवालाचे दिनांकापर्यंत लेखापरीक्षणातील प्राप्त पुराव्यावर आधारित आहेत. तथापि भविष्यातील घटना किंवा परिस्थिती समूहाचे चालू असलेले कार्य (Going concern) बंद करण्यास कारणीभूत ठरु शकते.

एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे प्रकटनासह एकूण सादरीकरण, संरचना आणि आशय यांचे मूल्यमापन केले जाते. तसेच एकत्रिकृत विवरणपत्रे महत्वाचे व्यवहार आणि घटनांचे प्रतिनिधीत्व अशा पध्दतीने करतात की, ज्यामुळे वाजवी सादरीकरण साध्य होते. भौतिकता हा वित्तीय विवरणपत्रातील असत्यकथनाचा परिणाम आहे, ज्यामुळे वित्तीय विवरणपत्राची संमजसपणे चांगली माहिती असलेल्या उपयोगकर्त्यांचे आर्थिक निर्णय प्रभावित होऊ शकतात. आम्ही परिणामात्मक भौतिकता विचारात घेतो आणि उपरोक्त संयुक्तपणे नियंत्रित संस्थाच्या संबंधाने अधिनियमाच्या कलम १४३ च्या पोटकलम ३ व ११ चा संबंध केवळ अशा लेखापरीक्षित विवरणपत्रावर आधारित आहे. केलेल्या कामावरील आमचा विश्वास, इतर लेखापरीक्षकांचे अहवाल आणि व्यवस्थापनाव्दारे प्रमाणित वित्तीय विवरणपत्रासंबंधी वरील बाबीसंबंधाने एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रावरील आमचा अहवाल आणि खाली दिलेल्या विधीविषयक आणि विनियामक आवश्यकता याबाबी संबंधाने आमचे अभिप्रायात बदल नाही.

## ६. इतर बाबी

आम्ही सहाय्यक कंपनी (एफडीसीएम एस्सेलवर्ल्ड गोरेवाडा झू प्रायवेट लिमीटेड) च्या वित्तीय विवरणपत्राचे लेखापरीक्षण केलेले नाही. त्याच दिवशी संपणा-या वर्षाकरिता या सहाय्यक कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रात ताळेबंद, नफा तोट्याचा हिशेब, रोखप्रवाह आणि इतर वित्तीय विवरणपत्राचा अंतर्भाव असून त्यांचा एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रात विचार करण्यात आला आहे. एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रात समूहाचा निव्वळ नफा / तोट्याचा वाटा देखील अंतर्भूत असून त्याबाबत अहवाल व्यवस्थापनाव्दारे आम्हाला पुरविण्यात आला आहे आणि अधिनियमाच्या कलम १४३ पोटकलम (३) (११) च्या संबंधाने उपरोक्त सहाय्यक कंपनीचे संबंधात आमचा अहवाल केवळ इतर लेखापरीक्षकांच्या अहवालावर आधारित आहे.

## ७. इतर विधी विषयक आणि विनियामक आवश्यकतावर अहवाल

१. अधिनियमाच्या कलम १४३ चे पोटकलम ११ अन्वये केंद्र शासनाव्दारे निर्गमित कंपनी (लेखा परीक्षकांचा अहवाल) आदेश २०१६ ('आदेश') नुसार आवश्यक असलेल्या सदर आदेशाच्या परिच्छेद ३ आणि ४ मधील विनिर्दिष्ट बाबीसंबंधाने निवेदन आम्ही सहपत्र 'अ' मध्ये देत आहोत.

२. कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३(५) अंतर्गत आवश्यकतेनुसार, लेखापरीक्षणाच्या सुचविलेल्या पध्दतीचे अनुपालन करुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे व्दारा निर्गमित निर्देशावरील निवेदन आम्ही सहपत्र 'क' मध्ये देत आहोत.

३. कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३ (३) मधील आवश्यकतेनुसार आम्ही प्रतिवेदन करतो की:

**अ)** आमच्या माहिती आणि समजुतीप्रमाणे लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरण आम्ही मागितले व प्राप्त केले आहेत.

**ब)** आमच्या मते आम्ही केलेल्या लेखापुस्तकाचे तपासणीवरुन दिसून येते की कायद्यानुसार आवश्यक असलेली योग्य ती लेखापुस्तके कंपनीव्दारे ठेवण्यात आली आहेत.

**क)** या अहवालाशी संबंधित एकत्रिकृत ताळेबंद, एकत्रिकृत नफातोटा पत्रक आणि एकत्रिकृत रोख प्रवाह विवरणपत्र यांचा एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्र तयार करण्यासाठी ठेवलेल्या संबंधित लेखापुस्तकाशी मेळ आहे.

**ड)** आमच्या मते उपरोक्त एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे अधिनियमाच्या कलम १३३ अंतर्गत विनिर्दिष्ट लेखांकन मानकाचे अनुपालन करीत आहेत.

**ई)** आम्ही कंपनीकडून लेखी निवेदन प्राप्त केले आहे. संचालक मंडळाने घेतलेल्या नोंदीप्रमाणे नियुक्त केलेल्या संचालकापैकी दिनांक ३१ मार्च २०२० रोजी कोणीही संचालक कंपनी अधिनियम २०१३ कलम १६४(२) अन्वये अपात्र ठरविण्यात आलेले नाही.

**फ)** कंपनीच्या आर्थिक प्रतिवेदनावरील पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रणा संबंधाने आणि अशा नियंत्रणाचे प्रभावी अंमलबजावणी संबंधाने 'सहपत्र ब' मधील आमचा स्वतंत्र अहवाल पहावा.

४. लेखापरीक्षकांच्या अहवालात अंतर्भूत करावयाच्या इतर बाबीसंबंधाने कंपनी (लेखापरीक्षा व लेखापरीक्षक) नियम २०१४ च्या नियम ११ नुसार आमच्या मते आणि आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे व आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार :-

i) कंपनीने आपल्या भारतीय लेखांकन मानक (Ind AS) वित्तीय विवरणपत्रात प्रलंबित न्यायालयीन वादामुळे आपल्या आर्थिक स्थितीवर पडणा-या प्रभावाचे प्रकटन केले आहे. भारतीय लेखांकन मानक (Ind AS) वित्तीय विवरणपत्रातील टिपणी क्र. ४६ कडे लक्ष वेधण्यात येत आहे.

ii) कंपनीकडे विशेष अंदाजित नुकसान होण्याजोगे कोणतेही दिर्घमुदती करार किंवा पोटकरार नाहीत.

iii) गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधीत स्थानांतरीत करावयाच्या रकमेचे स्थानांतरण करण्यास कंपनीव्दारे विलंब झालेला नाही.

शाह बाहेती चांडक आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए जय पोपटानी)
भागीदार
स.क्र.१३५०३८

स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०

रतन चांडक आणि कंपनी,
सनदी लेखापाल, करिता
(संस्था नोंदणी क्र.१०८६९६ डब्ल्यू)
स्वाक्षरित
(सीए सुधीर बाहेती)
भागीदार
(स.क्र. ०४२७११)

स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०

## लेखा परीक्षकांच्या अहवालाचे सहपत्र - अ

## (आमचे सम दिनांकाचे अहवालात निर्दिष्ट केल्याप्रमाणे) वित्तीय वर्ष २०१९-२०

## (फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेडच्या सभासदांना प्रेषित केलेल्या दि. ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाच्या कंपनीच्या भारतीय लेखांकन मानक (Ind AS) वित्तीय विवरण पत्रावरील आमचे सम दिनांकाचे अहवालातील निर्दिष्ट)

१) अ) सख्यांत्मक तपशील व ठिकाण यासह स्थिर संपत्तीचे पूर्ण तपशील दर्शविणारी बाबवार यादी ठेवण्यात आली आहे.

ब) आम्हाला कळविल्याप्रमाणे व्यवस्थापनाने सन २०१९-२० या आर्थिक वर्षात स्थिर संपत्तीची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. व्यवस्थापनाने सन २०१९-२० या आर्थिक वर्षात प्रत्यक्ष पडताळणी केलेली नसल्याने विशेष विसंगती वगैरे असल्यास त्यासंबंधी व त्याचे परिणामस्वरुप लेखापुस्तकातील प्रभावासंबंधाने आम्ही अभिप्राय देऊ शकत नाही. टिपणी क्र. ३३ कडे लक्ष वेधण्यात येत आहे.

क) कंपनीच्या मालकीच्या मुक्त हस्त (free hold) मालकीच्या जमिनीवरील अचल संपत्तीचे हक्क विलेख (Title-deeds) कंपनीचे नावे आहेत. तथापि भाडे पट्टीने घेतलेल्या जमिनीवर बांधकाम केलेल्या इमारतीच्या स्वरुपातील अचल संपत्तीची मालकी जरी कंपनीची असली तरी हक्क विलेख कंपनीच्या नावे नाहीत. टिपणी क्र. ३३ कडे लक्ष वेधण्यात येत आहे.

२) अ) आम्हाला कळविल्याप्रमाणे सन २०१९-२० या आर्थिक वर्षात कच्चा माल, तयार मालाचा साठा व प्रगतीपथावरील कामाची प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापनाने केलेली नाही. व्यवस्थापनाने सन २०१९-२० या वर्षात प्रत्यक्ष पडताळणी केलेली नसल्याने विशेष विसंगती वगैरे असल्यास त्यासंबंधी व परिणामस्वरुप त्याचे लेखापुस्तकातील प्रभावासंबंधी आम्ही अभिप्राय देऊ शकत नाही. तसेच टिपणी क्र.३३ कडे लक्ष वेधण्यात येत आहे.

३) अ) कंपनी अधिनियम २०१३ कलम १८९ अंतर्गत ठेवलेल्या नोंदवहीत समाविष्ट कंपन्या, संस्था, मर्यादित दायित्व भगिदारी व इतर पक्षास कंपनीने कोणतेही प्रतिभूत किंवा अप्रतिभूत ऋण मंजूर केलेले नाही. त्यामुळे यासंबंधी तरतूदी लागू नाहीत.

४) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणाप्रमाणे कंपनीने ऋण, गुंतवणूक, हमी आणि प्रतिभूती यासंबंधाने कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १८५ व १८६ च्या तरतूदीचे अनुपालन केले आहे.

५) आंम्हाला दिलेल्या माहितीप्रमाणे कंपनीने जनतेकडून कोणत्याही प्रकारच्या ठेवी स्विकृत केलेल्या नाहीत, आणि परिणामत: भारतीय रिझर्व बँकेव्दारे निर्गमित केलेले निर्देश आणि कंपनी अधिनियम २०१३ कलम ७३ ते ७६ किंवा इतर संबंधित तरतूदी आणि त्याअंतर्गत तयार केलेले नियम लागू नाहीत.

६) आम्हाला दिलेल्या माहीतीप्रमाणे केंद्र शासनाने कंपनी अधिनियम २०१३ कलम १४८च्या पोटकलम (१) नुसार कंपनीला कंपनी राबवित असलेल्या कोणत्याही कार्यविधीसाठी परिव्यय लेखापुस्तके ठेवण्याबाबत विनिर्दिष्ट केलेले नाही.

७) अ) आम्हाला दिलेल्या माहीती व स्पष्टीकरणानुसार निर्विवाद सांविधानिक देणी, जसे भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर, विक्रीकर, संपत्तीकर, सीमाशुल्क, सेवाकर आणि उत्पादन शुल्क, मूल्यवर्धित कर, उपकर, वस्तु व सेवा कर आणि इतर कोणतीही लागू असलेली महत्वाची सांविधिक देणी याचा भरणा समुचित प्राधिका-याकडे चालू वर्षात नियमितपणे करण्यात आला आहे. सहा महीन्यापेक्षा जास्त कालावधीकरिता अशा रकमा प्रलंबित नाही.

ब) अपीलीय अधिका-याकडे प्रलंबित असलेल्या वादग्रस्त प्रकरणाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| कायद्याचे नांव | थकबाकीचे स्वरुप | विवादित रक्कम (रुपये) | निषेधाअंतर्गत भरणा केलेली रक्कम | रकमेशी संबंधीत कालावधी | विवाद प्रलंबित असलेले मंच |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र मूल्यवर्धित कायदा २००२ | विक्रीकर प्रकरणे | १२१०६०९/- | २८००००/- | २०१०-११ | सह आयुक्त (अपील) विक्रीकर, नागपूर |
| महाराष्ट्र मूल्यवर्धित कायदा २००२ | विक्रीकर प्रकरणे | ७४३२६४/- | ३२३२३२/- | २०११-१२ | सह आयुक्त (अपील) विक्रीकर, नागपूर |
| आयकर अधिनियम १९६१ | आयकर प्रकरणे | ४३८२०४०/- | ४३८२०४०/- | कर निर्धारण वर्ष २०१३-१४ | आयकर आयुक्त (अ), नागपूर |
| आयकर अधिनियम १९६१ | आयकर प्रकरणे | ६१८२४५०/- | ६१८२४५०/- | कर निर्धारण वर्ष २०१४-१५ | आयकर आयुक्त (अ), नागपूर |
| आयकर अधिनियम १९६१ | आयकर प्रकरणे | ३८४६७९०/- | ३८४६७९०/- | कर निर्धारण वर्ष २०१५-१६ | आयकर आयुक्त (अ), नागपूर |
| आयकर अधिनियम १९६१ | आयकर प्रकरणे | १८५६७५६७/- | ३८८४५९४/- | कर निर्धारण वर्ष २०१६-१७ | आयकर आयुक्त (अ), नागपूर |
| आयकर अधिनियम १९६१ | आयकर प्रकरणे | ८८६४१५४/- | १७७२८४०/- | कर निर्धारण वर्ष २०१७-१८ | आयकर आयुक्त (अ), नागपूर |

८) आम्हाला दिलेल्या माहीती आणि स्पष्टीकरणानुसार, आमच्या मते कंपनीने कोणतीही वित्तिय संस्था, बँका आणि ऋणपत्रधारक यांची देणी परत करण्यात कसूर केलेली नाही.

९) पार पाडलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेवर आधारित आणि व्यवस्थापनाने दिलेल्या माहीती आणि स्पष्टीकरणानुसार, कंपनीने प्रारंभिक सार्वजनिक मागणीव्दारे किंवा पुढील सार्वजनिक मागणीव्दारे ऋण विलेख आणि ऋणासह रक्कम उभारलेली नाही, परिणामत: आदेशाचे कलम ३ (ix) मधील तरतूदी कंपनीला लागू नाहीत. त्यामुळे त्याबाबत अभिप्राय नाही.

१०) पार पाडलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेवर आधारित आणि व्यवस्थापनाव्दारे दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार आम्ही प्रतिवेदित करतो की, चालू आर्थिक वर्षात कंपनीव्दारे किंवा कंपनीमध्ये

कोणतीही फसवणूक (Fraud) झाल्याचे निदर्शनास आलेले नाही किंवा प्रतिवेदीत करण्यात आलेले नाही.

११) कंपनी अधिनियम २०१३ च्या अनुसूची (v) ५ सह वाचल्यास कलम १९७ च्या आवश्यकतेनुसार आवश्यक मंजुरीनंतरच व्यवस्थेसंबंधी पारिश्रमिक अदा केले आहे किंवा तरतूद केली आहे.

१२) कंपनी निधी कंपनी नाही. त्यामुळे कलम (xii) मधील तरतूदी कंपनीला लागू नाही.

१३) कंपनी अधिनियम २०१३, कलम १७७ व १८८ मधील तरतूदींचे अनुपालन करुन भारतीय लेखांकन मानक (IndAS) - २४ "संबंधित पक्षकार प्रकटन" नुसार आवश्यक असल्याप्रमाणे संबंधित पक्षकारासोबतच्या सर्व व्यवहाराचे प्रकटन वित्तीय विवरणपत्रात करण्यात आले आहे. टिपणी क्र.४० पहावी.

१४) कंपनीने परीक्षणांतर्गत चालू आर्थिक वर्षात भागाचे कोणतेही अधिमान्य आवंटन किंवा खाजगी वाटप किंवा पूर्णत: अथवा अंशत: परिवर्तित ऋणपत्राचे वाटप केलेले नाही. परिणामत: आदेशाच्या कलम ३ (xiv) च्या तरतूदी कंपनीला लागू नाही.

१५) आम्हाला दिलेल्या माहितीप्रमाणे कंपनी अधिनियम २०१३ कलम १९२ च्या व्याप्तीत समाविष्ट होणारे रोखीत नसलेले व्यवहार कंपनीने संचालक किंवा त्यांचेशी संबंधित व्यक्तिशी केलेले नाहीत. परिणामत: आदेशाच्या, कलम ३ (xv) च्या तरतूदी कंपनीला लागू नाही.

१६) भारतीय रिझर्व बँक कायदा १९३४ कलम ४५ आयए अंतर्गत कंपनीला नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. परिणामत: आदेशाचे कलम ३ (xvi) च्या तरतूदी कंपनीला लागू नाही.

शाह बाहेती चांडक आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए जय पोपटानी)
भागीदार
स.क्र.१३५०३८

रतन चांडक आणि कंपनी,
सनदी लेखापाल, करिता
(संस्था नोंदणी क्र.१०८६९६ डब्ल्यू)
स्वाक्षरित
(सीए सुधीर बाहेती)
भागीदार
(स.क्र. ०४२७११)

स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०

स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०

# <u>लेखा परीक्षकांच्या अ.हवालाचे सहपत्र - ब</u>
# <u>(आमचे सम दिनांकाचे अहवालात निर्दिष्ट केल्याप्रमाणे) वित्तीय वर्ष २०१९-२०</u>

**<u>अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधाने कंपनी अधिनियम २०१३ ("कायदा") कलम १४३ पोटकलम ३ चे उपवाक्य (i) अंतर्गत अहवाल</u>**

आम्ही फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (**"कंपनी"**) च्या दिनांक ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाकरिता कंपनीच्या भारतीय लेखांकन मानक (Ind AS) वित्तीय विवरणपत्राच्या आम्ही केलेल्या लेखापरीक्षणाचे संबंधाने त्याच दिवशी संपलेल्या वर्षाकरिता आर्थिक प्रतिवेदनावर अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे लेखापरीक्षण केले आहे.

**अंतर्गत वित्तीय नियंत्रणाकरिता व्यवस्थापनाची जबाबदारी :**

आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधाने (इंस्टीट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊन्टट्स ऑफ इंडिया) भारतीय सनदी लेखापालाच्या संस्थेने (ICAI) निर्गमित केलेल्या मार्गदर्शक टिपणीत नमूद केल्यानुसार अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटकाचा विचार करुन कंपनीने आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणा संबंधाने कसोटीवर आधारित स्थापित केलेले अंतर्गत वित्तीय नियंत्रण सुस्थितीत ठेवण्यासाठी कंपनीचे व्यवस्थापन जबाबदार आहे. या जबाबदारीमध्ये कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत आवश्यक असल्याप्रमाणे कंपनीच्या व्यवसायाचे सुस्थितीत व कार्यक्षम संचालनाची खात्री करण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे योजनेची आखणी, अंमलबजावणी व परिचलन, कंपनीच्या धोरणांचा अवलंब, संपत्तीची सुरक्षा, फसवणूक आणि चुकांचा प्रतिबंध आणि तपास, लेखाविषयक अभिलेखाची अचूकता व पूर्णत्व आणि विश्वसनीय वित्तीय माहितीची वेळेवर तयारी इत्यादिचा अंतर्भाव आहे.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी :**

आम्ही केलेल्या लेखापरीक्षणाचे आधारे आर्थिक प्रतिवेदनावरील कंपनीचे अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधाने अभिप्राय व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरीक्षणाबाबत भारतीय सनदी लेखापाल (ICAI) संस्थेव्दारे निर्गमित मार्गदर्शक टिपणीनुसार ("मार्गदर्शक टिपणी") आणि कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३ (१०) अंतर्गत विहित केल्याचे मानण्यात आल्यानुसार, दोन्ही अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरीक्षणास लागू असलेले तसेच दोन्ही भारतीय सनदी लेखापाल संस्थेने निर्गमित केलेले, अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या लेखापरीक्षणास लागू मर्यादेपर्यंत आम्ही आमचे लेखापरीक्षण केले आहे. त्यानुसार सदर मानके आणि मार्गदर्शक टिपणीनुसार आम्ही नैतीक मूल्यांचे अनुपालन व लेखापरीक्षणाचे नियोजन करुन आर्थिक प्रतिवेदनावर पुरेसे अंतर्गत वित्तीय नियंत्रण स्थापित असून त्याचे पालन होत आहे आणि असे नियंत्रण सर्व महत्वपूर्ण विषयात प्रभावीपणे चालू आहे याबाबत वाजवी आश्वासन प्राप्त केले आहे.

आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण पध्दती पुरेशी असून प्रभावीपणे चालू आहे. यासंबंधाने लेखापरीक्षण पुरावा प्राप्त करण्यासाठी कार्यपध्दतीचा आमच्या लेखापरीक्षणात अंतर्भाव आहे. आमच्या आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या लेखापरीक्षणात आर्थिक प्रतिवेदनावर अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची जाणीव प्राप्त करणे, महत्वपूर्ण उणीवा असल्यास जबाबदारीचे निर्धारण करणे आणि निर्धारित जबाबदारीवर आधारित अंतर्गत नियंत्रणाचे प्रभावीपणे पालन होत असल्याबाबत चाचणी व मूल्यमापन करणे याचा अंतर्भाव आहे. निवड केलेली कार्यपध्दती लेखापरीक्षकांचे निर्णय तसेच वित्तीय विवरणपत्रे फसवणूक किंवा चुकामुळे महत्वपूर्ण असत्यकथन याबाबत जबाबदारीचे निर्धारण यावर अवलंबून आहे.

आर्थिक प्रतिवेदनावरील कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रण पध्दती संबंधाने आमच्या अभिप्रायाच्या आधारासाठी आम्ही पुरेसा आणि योग्य लेखापरीक्षण पुरावा प्राप्त केला आहे असा आम्हाला विश्वास आहे.

**आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ :**

सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वानुसार आर्थिक प्रतिवेदन आणि वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याची विश्वसनीयता बाह्य प्रयोजनासाठी वाजवी आश्वासन उपलब्ध करुन देण्यासाठी आखणी केलेली आर्थिक प्रतिवेदनावरील कंपनीची अंतर्गत वित्तीय नियंत्रण ही प्रक्रिया आहे. कंपनीच्या आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण यामध्ये १) व्यवहार अचूकपणे व योग्यप्रकारे प्रतिबिंबीत करणे आणि कंपनीच्या संपत्तीची विल्हेवाट यासंबंधाने वाजवी तपशीलासह अभिलेख ठेवणे, २) सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वानुसार वित्तीय विवरणपत्रे तयार करण्यासाठी आवश्यक असल्याप्रमाणे व्यवहाराची नोंद केल्याबाबत वाजवी आश्वासन उपलब्ध करुन देणे आणि व्यवस्थापन तसेच फक्त कंपनीच्या संचालकाच्या प्राधिकार पत्रानुसार कंपनीची प्राप्ती आणि खर्च करण्यात येत आहेत आणि ३) वित्तीय विवरणपत्रावर महत्वपूर्ण परिणाम करणा-या कंपनीच्या संपत्तीचे अनधिकृत संपादन, वापर आणि विल्हेवाट याबाबत वेळीच तपास करुन प्रतिबंध करणे यासाठी वाजवी आश्वासन उपलब्ध करुन देणे, असे धोरण व कार्यपध्दतीचा अंतर्भाव आहे.

**<u>आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या अंगभूत मर्यादा :</u>**

संगनमताची शक्यता किंवा अयोग्य व्यवस्थापन, नियंत्रणाचे अधिभावीकरण यासारख्या आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या अंगभूत मर्यादामुळे चुका किंवा फसवणुकीमुळे महत्वपूर्ण असत्यकथन घडून तपास न होण्याची शक्यता असते. तसेच परिस्थितीतील बदल, धोरण किंवा प्रक्रियेचा दर्जा इत्यादि मुळे आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत नियंत्रणाचे भविष्यकालीन कालावधीच्या प्रक्षेपणाचे कोणतेही मूल्यांकन अपूर्ण राहून बिघडण्याची शक्यता असते.

**अभिप्राय :**

आमच्या मते महत्वपूर्ण बाबतीत कंपनीकडे, आर्थिक प्रतिवेदनावरील पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रण पध्दत अस्तित्वात आहे आणि भारतीय सनदी लेखापालाच्या संस्थेने निर्गमित केलेल्या आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणावरील मार्गदर्शक टिपणीत नमूद केल्यानुसार अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटक विचारात घेता कंपनीने आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणा संबंधाने कसोटीवर आधारित अंतर्गत वित्तीय नियंत्रण स्थापित केले असून असे अंतर्गत वित्तीय नियंत्रण दिनांक ३१.०३.२०२० रोजी प्रभावीपणे कार्यरत होते.

शाह बाहेती चांडक आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए जय पोपटानी)
भागीदार
स.क्र.१३५०३८

स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०

रतन चांडक आणि कंपनी,
सनदी लेखापाल, करिता
(संस्था नोंदणी क्र.१०८६९६ डब्ल्यू)
स्वाक्षरित
(सीए सुधीर बाहेती)
भागीदार
(स.क्र. ०४२७११)

स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०

<u>स्वतंत्र लेखा परीक्षकांच्या अहवालाचे सहपत्र - क</u>
<u>(आमचे सम दिनांकाचे अहवालात निर्दिष्ट केल्याप्रमाणे) वित्तीय वर्ष २०१९-२०</u>

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३(५) अंतर्गत कंपन्याचे लेखापरीक्षणाकरिता निदेश व उपनिदेशानुसार अहवाल

| अ.क्र. | तपशील / निदेश | अभिप्राय |
|---|---|---|
भांडार साहित्य व सुट्या भागाचे खरेदीवरील या वर्षातील खर्च हा संबंधित लेखा शिर्षाअंतर्गत चालू वर्षात खर्ची टाकण्यात आला आहे.

## एफ) जैविक संपत्ती

वानिकी रोपवनाचे बाजारमूल्य उपलब्ध नसून त्यांचे पर्यायी रास्त किंमतीने मूल्यांकन करणे विश्वसनीय नसल्यामुळे रोपवाटीका, वानिकी रोपवने अशा जैविक संपत्तीचे मूल्यांकन परिव्यय मूल्याने करण्यात आले आहे.

आर्थिक वर्षाचे सुरुवातीस आणि वर्ष अखेरीस प्रत्येक प्रकारच्या जैविक संपत्तीचे मूल्यांकन भर, विल्हेवाट / इतर समायोजन दर्शविणारे वहनक्षम मूल्य याबाबत ताळमेळ अहवाल स्वतंत्रपणे प्रकट करण्यात आलेला नाही. कारण रोपवाटिका व रोपवनातील भर / घटीचे नैसर्गिक वाढीचे मूल्यांकन शक्य नाही.

रोपवाटिका आस्थापना या लेखा शिर्षाअंतर्गत आरंभीचे आधिक्य अधिक चालू वर्षातील खर्च यामधून १०% खर्च आणि रुट ट्रेनर / क्लोनल रोपवाटिका आस्थापना या लेखा शिर्षाअंतर्गत एकूण खर्चामधून २०% खर्च अनुक्रमे साग रोपवाटीका आणि रुट ट्रेनर व क्लोनल रोपवाटिका या लेखा शिर्षाअंतर्गत स्थानांतरित करण्यात आला आहे. ज्या रोपवाटिकेत कामे सुरु नाहीत अशा रोपवाटिकांचे बाबतीत अशा प्रकारचा १०% / २०% खर्च नफातोटयाचे हिशेबात निर्लेखित करण्यात आला आहे. तथापि, ज्या रोपवाटिकेत आंशिक स्वरुपात कामे सुरु आहेत अशा रोपवाटिकांच्या बाबतीत अशा १०% / २०% खर्चापैकी उद्दिष्टांच्या तुलनेत प्रत्यक्ष वापरलेल्या क्षमतेच्या प्रमाणात खर्च निर्लेखित करण्यात आला आहे.

## जी) रोपवन खर्च व बीज भूखंड विकास खर्चाचे निर्लेखन

i) वेगवेगळया क्षेत्रातील जिवंत रोपांची वेगवेगळी टक्केवारी लक्षात घेता, विरलनापूर्वी उभ्या असलेल्या एकूण झाडावरील सुरुवातीच्या प्रमाणशीर रोपवन खर्चाचे प्रमाणात विरलन कामात

........................

संबंधित क्षेत्रातून तोडलेल्या झाडावरील सुरुवातीचा प्रमाणशीर रोपवन खर्च निर्लेखित करण्यात आला आहे. बांबू रोपवनाच्या सुरुवातीच्या प्रमाणशीर खर्चाचे निर्लेखन एकूण आठ कापणीमध्ये करण्यांत आले आहे. औषधी वनस्पती रोपवन खर्चाचे निर्लेखन भिन्न रोपासाठी भिन्न कालावधी विचारात घेवून उत्पादनाच्या वर्षात करण्यात आले आहे. शासनास किंवा प्रकल्प प्राधिकरणास आदेशानुसार हस्तांतरित करण्यात आलेल्या रोपवनाचे बाबतीत सुरुवातीचे एकूण रोपवन मूल्य लेख्यात निर्लेखित/समायोजित करण्यांत आले आहे. बीज घटकाअंतर्गत बीज भूखंडा संबंधाने विकास कामावरील खर्च त्या शिर्षाअंतर्गत सुरुवातीच्या आधिक्याचे २०% या दराने निर्लेखित करण्यांत आला आहे.

ii) ताळेबंदात जैविक संपत्ती म्हणून अंतर्भूत केलेल्या रोपवन खर्चाची चालू वसुली योग्य एकूण किंमत जोपर्यंत अंदाजित केलेल्या एक अथवा अधिक भागातील नुकसान भरुन काढण्यासाठी पुरेशी आहे तोपर्यंत अशा काही भागातील अयशस्वी रोपवने निर्लेखित करण्यात आलेली नाहीत.

## एच) संपत्ती, यंत्रे व उपकरणे आणि प्रगतीपथावरील भांडवली कामे

भारतीय लेखांकन मानंक (Ind AS) संक्रमण करतांना कंपनीने आपल्या सर्व संपत्ती, यंत्रे व उपकरणांचे मूल्यांकन दिनांक 1 एप्रील 2015 रोजी पूर्वीचे सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वानुसार (GAAP)विचारात घेवून असे वहनक्षम मूल्य संपत्ती, यंत्रे व उपकरणांचे मानीव मूल्य म्हणून उपयोगात आणण्याचे ठरविले आहे.

मूर्त आणि अमूर्त अशा दोन्ही प्रकारच्या संपती, यंत्रे व उपकरणे संपादित मूल्य / बांधकाम मूल्य यातून संचित घसारा कमी करुन दर्शविण्यात आले आहे. संपत्ती मूल्यात खरेदी किंमत, कर, शुल्क, भाटक व संपत्ती उद्देशित उपयोगासाठी चालू स्थितीत आणण्यासाठी लागणा-या इतर प्रत्यक्ष खर्चाचा समावेश आहे. महत्वाच्या प्रकल्पाकरिता इतर पूर्व तयारी वरील खर्चाचे सुध्दा उचित ठिकाणी भांडवलीकरण करण्यात आले आहे.

प्रगतीपथावरील भांडवली कामात संपत्ती, यंत्रे व उपकरणे संपादित करण्यासाठी दिलेल्या अग्रिमाचा तसेच ज्या संपत्ती यंत्रे व उपकरणे उद्देशित उपयोगासाठी वर्षअखेर अजून तयार नाहीत त्यावरील खर्चाचा अंतर्भाव आहे.

ताळेबंदाच्या दिवशी हस्तस्थ आणि उपयोगात न आलेल्या बांधकाम साहित्याची किंमत "प्रगतीपथावरील भांडवली कामे " या स्वतंत्र लेखाशिर्षाअंतर्गत समाविष्ट आहे.

## आय) घसारा आणि परिशोधन

कंपनी अधिनियम २०१३ च्या परिशिष्ट II मध्ये विहित केल्यानुसार मूर्त संपत्ती, यंत्रे व उपकरणांचे वापरायोग्य आयुष्य विचारात घेवून त्याआधारे घसाऱ्याची तरतूद करण्यात आली आहे.

कंपनी अधिनियम २०१३, लागू झाल्यानंतर कंपनीने परिशिष्ट II मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार अंदाजित वापरायोग्य कालावधीचे प्रयोजन केले आहे. त्यानुसार संपत्तीचे शिल्लक वहनक्षम मूल्य सुधारीत उर्वरित वापरायोग्य कालावधीमध्ये अवक्षयित करण्यात येत आहे.
संपत्तीची भर किंवा घट या संबंधाने पूर्ण महिना आधारभूत धरुन भर/घटीचे संबंधात प्रमाणशीर घसाऱ्याची परिगणना करण्यात आली आहे. वापरास अयोग्य परंतु विक्री न झालेल्या संपत्तीवर वापरास अयोग्य घोषित केल्यानंतर घसाऱ्याची आकारणी करण्यात आलेली नाही. तसेच प्रकल्प प्राधिकरणास किंवा शासनास, आदेशानुसार स्थानांतरीत केलेल्या स्थिर संपत्तीचे निर्लेखन अवक्षयित मूल्याने करण्यात आले आहे.

प्रत्येकी रु. पांच हजार पर्यंत किंमतीच्या संपत्ती खरेदीचे वर्षात पूर्णपणे अवक्षयित करण्यात येतात.

एफडीसीएम एस्सेलवर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड संबंधाने-
संपत्तीचे संपादन करतेवेळी किंवा त्यानंतरच्या पुनर्विलोकनानुसार उर्वरित वापरायोग्य अंदाजित आयुष्य उपरोक्त सूचीत अंतर्भूत वापरायोग्य आयुष्यापेक्षा कमी किंवा अधिक असेल अशावेळी व्यवस्थापनाचे अंदाजावर आधारित वापरायोग्य आयुष्य / उर्वरित वापरायोग्य आयुष्य विचारात घेवून कमी / अधिक दराने अवक्षयनाची तरतूद करण्यात आली आहे.

ह्या धोरणास अनुसरुन संपत्ती, यंत्रे व उपकरणे वापरायोग्य आयुष्यावर खालील प्रमाणे अवक्षयित करण्यात आली आहेत.

| अवक्षयण योग्य संपत्ती | वापरायोग्य आयुष्य |
|---|---|
| ईमारती व रस्ते | ३ ते ६० वर्ष |
| यंत्रे व संयंत्रे | ३ ते १५ वर्ष |
| कार्यालयीन उपकरणे | ३ ते ५ वर्ष |
| संगणके व आकडेवारी संस्करण घटक | ३ ते ६ वर्ष |
| उपस्कर व जोडकाम | ५ ते ८ वर्ष |
| वाहने | ८ ते १० वर्ष |
| पशुधन / पक्षी | ५ ते ७० वर्ष |

## जे) संपत्तीचे नुकसान

प्रत्येक ताळेबंदाच्या दिवशी संपत्तीच्या वहनक्षम मूल्यात कांही नुकसान झाले किंवा कसे हे ठरविण्यासाठी अशा वहनक्षम मूल्याचा आढावा घेण्यात येतो त्यात काही संपत्तीचे वहनक्षम मूल्य वसुलीयोग्य मूल्यापेक्षा अधिक असल्यास त्या मर्यादेपर्यंत झालेल्या नुकसानीची तरतूद करण्यात येते. संपत्तीचे वसुलीयोग्य मूल्य हे निव्वळ विक्रीमूल्य तसेच वापरातील मूल्यापेक्षा जास्त आहे. संपत्तीच्या सतत वापरानंतर आणि वापरायोग्य कालावधी संपल्यानंतर अशा संपत्तीच्या विल्हेवाटीपासून प्राप्त होणारा भविष्यातील अंदाजित अपेक्षित रोख प्रवाह हे संपत्तीच्या वापरातील सध्याचे मूल्य आहे. बिघाडामुळे झालेले नुकसान नफातोट्याचे हिशेबात अथवा पुनर्मूल्यांकन संचिती मधून, जे लागू असेल त्याप्रमाणे विचारात घेण्यात येते.

## के) अनुदानाचे लेखांकन

शासकीय अनुदानाशी संबंधित संलग्न अटींचे अनुपालन करण्यात येईल आणि अनुदान प्राप्त होईल यासंबंधाने पुरेशी खात्री असेल तरच असे अनुदान कंपनीव्दारे मान्य करण्यात येते.

प्रवर्तकाचे अंशदान या स्वरुपातील शासन अनुदान हे संचिती अंतर्गत जमा करण्यात येते व भागधारकाच्या निधीचा भाग म्हणून संबोधण्यात येते.

उत्पनाशी संबंधित शासकीय अनुदान, ज्या संबंधित खर्चाची भरपाई उद्देशित आहे त्या मर्यादेपर्यंत आवश्यक कालावधी मध्ये नफा तोटा पत्रकात पध्दतशीर आधारावर दर्शविण्यात येते. असे अनुदान एकतर उत्पनांतर्गत स्वतंत्रपणे दर्शविण्यात येते किंवा संबंधित खर्च प्रतिवेदित करतांना कमी करण्यात येते.

ठराविक कार्यक्रमासाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधी संबंधित कार्यक्रमाच्या निधी लेख्यात जमा करण्यात आला आहे.

## एल) गुंतवणूक

चालू गुंतवणूक अशी गुंतवणूक आहे की, ज्याचे स्वरुप त्वरीत वसुलीयोग्य आहे आणि ज्या मागील हेतू गुंतवणूक केल्याचे दिनांकापासून एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी ठेवण्याचा नाही.

## एम) संशोधन व विकास खर्च

प्रायोगिक तत्वावर घेण्यात आलेली सिंचित / उर्जा रोपवने इत्यादि सह कंपनीमध्ये किंवा अन्यथा "**संशोधन व विकास**" या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आलेला खर्च ज्या वर्षात करण्यात आला त्याच वर्षी पूर्णपणे नफातोटयाचे हिशेबात सदर लेखाशिर्षाअंतर्गत खर्ची टाकण्यात आला आहे.

## एन) महसूल मान्यता

मालाच्या विक्रीपासूनचे उत्पन्न महत्वाची जोखीम व स्वामित्वाचा मोबदला खरेदीदारांकडे स्थानांतरीत केल्यानंतरच मान्य करण्यात येते, आणि व्यापारी कसर व सूट विचारात घेवून निव्वळ रकमेने दर्शविण्यात आले आहे.

" टर्न की " आधारावर घेतलेल्या रोपवन प्रकल्पाचे बाबतीत लाभ किंवा हानीची परिगणना कंपनीव्दारे ज्या वर्षात प्रकल्प पूर्ण झाला / करार समाप्त झाला त्या वर्षात करण्यात आली आहे.

**एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड संबंधाने:-**

ग्राहकासोबत केलेल्या संविदापासून उत्पन्नात तिकीट विक्री, अन्न व पेय पदार्थाची विक्री आणि त्या सेवेशी संबंधित तरतूदीचा अंतर्भाव आहे.

खालीलपैकी एखाद्या निकषाची पूर्तता होत असल्यास कंपनी वेळेनुसार कार्याचे उत्तरदायित्व पूर्ण करुन उत्पन्नास मान्यता देते.

i) कंपनीच्या कार्यामुळे कंपनीसाठी पर्यायी वापरासह एखाद्या संपत्तीची निर्मिती होत नाही आणि विशिष्ट दिनांकापर्यंत केलेल्या कामाचे शोधन करण्यासाठी अंमलात आणण्याजोगा (प्रर्वतनीय) अधिकार आहे.

ii) कंपनीच्या कार्यामुळे एखाद्या संपत्तीची निर्मिती होते किंवा त्यात वाढ होते ज्यामुळे ग्राहकाच्या नियंत्रणातील संपत्तीची निर्मिती होते किंवा त्यात वाढ होते.

iii) कंपनी कार्य करीत असल्याने कंपनीच्या कार्यामुळे ग्राहकांना लाभ प्राप्त होऊन एकाचवेळी उपभोग घेता येतो.

ज्यावेळी कार्याचे उत्तरदायित्वाकरिता वरील पैकी एकाही अटीची पूर्तता होत नाही अशा वेळी ज्या बिंदुवर कार्याचे उत्तरदायित्वाची पूर्तता होते त्यावेळी उत्पन्नास मान्यता देण्यात येते.

जेंव्हा कंपनी वचन दिलेली वस्तू किंवा सेवा (म्हणजे तिकीट विक्री, अन्न व पेय पदार्थांची विक्री) प्रदान करुन कार्याचे उत्तरदायित्व पूर्ण करते त्यावेळी कार्याव्दारे मोबदल्याची रक्कम प्राप्त करुन करारावर आधारित संपत्तीची निर्मिती करते. जेथे ग्राहकांकडून मिळालेली मोबदल्याची रक्कम मान्य उत्पन्नापेक्षा अधिक असते तेथे कराराचे दायित्वात वाढ होते. बहुविध कार्यदायित्वाचे प्रकरणात प्रत्येक कार्याचे उत्तरदायित्व पूर्ण झाल्यानंतरच अशा कार्यात उत्पनास मान्यता देण्यात येते.

संविदेत निश्चित प्रदानाच्या अटी विचारात घेवून आणि कर व शुल्क वगळून प्राप्त झालेला किंवा येणे असलेला मोबदला रास्त मूल्याने विचारात घेवून उत्पन्नाचे मूल्यमापन करण्यात येते.

इतर प्रकरणात (अर्थात व्याजाचे उत्पन्न) कंपनीला आर्थिक लाभ प्राप्त होऊ शकतील आणि जर लागू असेल तर उत्पन्न व खर्चाचे मूल्यांकन विश्वसनीय रितीने करता येणे संभवनीय असेल त्या मर्यादे पर्यंत उत्पन्नास मान्यता देण्यात येते.

## ओ) रजा रोखीकरण

कंपनीव्दारे कर्मचा-यांकरिता रजा रोखीकरण निवृत्ती लाभाकरिता तरतूद करण्यात येते. कर्मचा-यांना भविष्यात रोखीकरण करण्यासाठी ठराविक मर्यादेच्या अधिन राहून रजा संचय करण्याचा हक्क आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळाने कळविलेल्या वार्षिक रकमेच्या आधारावर देयतेची तरतूद करण्यात आली आहे.

## पी) सेवा उपदान

भाविष्यात देय असलेल्या सेवा उपदानाच्या लाभाची प्रत्येक ताळेबंदाच्या दिनांकाची देयता भारतीय आयुर्विमा महामंडळातर्फे प्रक्षेपित एकक पत (Projected Unit credit Method) पध्दतीचा उपयोग करुन ठरविली जाते. विमागणित शास्त्रानुसार गृहीतकातील बदलामुळे उत्पन्न

होणारा लाभ अथवा हानी निर्मितीच्या कालावधीचे नफातोटयाचे विवरणपत्रात दर्शविण्यात आली आहे.

सेवा उपदानासाठी भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या गट सेवाउपदान विमा योजनेमार्फत निधी उपलब्ध होत आहे.

आयुर्विमा महामंडळाने केलेल्या मूल्यांकनाचे आधारे कंपनीच्या पात्र समयश्रेणी कर्मचा-यांकरिता सेवा उपदानाची तरतूद करण्यात आली आहे.

## क्यू) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर / वस्तू व सेवा कराची वसुली आणि शोधन

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर / वस्तू व सेवा कराची वसुली आणि भरणा याची नोंद त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या वेगळया लेख्यात करण्यात आली आहे. यापूर्वीच्या निर्धारण वर्षाशी संबंधित, यापूर्वी निश्चित करता येण्यासारखी नसलेली कोणतीही निर्विवाद कर मागणी ज्या वर्षात शोधन झाले किंवा आदेश प्राप्त झाले त्या वर्षात हिशेबात घेण्यात आली आहे.

## आर) शासकीय विभाग/यंत्रणाकडे स्थानांतरीत रोपवन व इतर संपत्तीचे क्षतिपूर्ती दावे

शासकीय विभाग/यंत्रणांकडे स्थानांतरीत करावयाच्या रोपवन व इतर संपत्तीचे क्षतिपूर्ती दाव्याची रक्कम, प्रकल्प प्रस्तावास शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर कंपनीने सादर केलेल्या दाव्याच्या आधारे करण्यात आली आहे. कंपनीची रोपवन व इतर संपत्ती शासकीय विभागास समर्पित केल्याचे प्रकरणी क्षतिपूर्तीच्या दाव्याची रक्कम खर्चाचे आधारावर दर्शविण्यात आली आहे.

## एस) तरतूद आणि संभाव्य देयता.

भूतकाळातील घटनांपासून निर्मित संभवनीय दायित्व परंतु ज्याचे अस्तित्व घडणे किंवा न घडणे यावरुन निश्चित करता येईल, एक किंवा अधिक भविष्यकालीन घटना ज्या पूर्णपणे कंपनीच्या नियंत्रणात नाहीत किंवा ज्या प्रकरणात भविष्यकालीन साधनांच्या विल्हेवाटीसंबंधाने सध्याचे दायित्व मोजता येवू शकत नाही किंवा दायित्वाबाबत विश्वसनीय अंदाज करता येत नाही अशा संभाव्य देयता दर्शविण्यात आल्या आहेत.

साधनांच्या विल्हेवाटीत अंतर्भूत आर्थिक लाभामुळे दायित्व निकाली काढता येणे शक्य असेल आणि ज्या संबंधाने निश्चित अंदाज करता येतील अशा विश्वसनीय अंदाजाचे आधारावर तरतूद करण्यात आली आहे. केलेली तरतूद आवश्यकतेपेक्षा कमी नाही तसेच वर्षाचे शेवटचे दिनांकास असलेले दायित्व निकाली काढण्यासाठी आवश्यक तरतूद योग्य अशा अंदाजाचे आधारावर ठरविण्यात आली आहे.

संभाव्य संपत्ती विचारात घेण्यात आलेल्या नाहीत किंवा वित्तीय विवरणपत्रात प्रकटन करण्यात आलेले नाही.

## टी) उत्पन्नावरील करांचे लेखांकन

करासंबंधाने खर्चात चालू आयकर आणि लांबणीवर टाकलेला कर भार/जमा यांचा अंतर्भाव आहे. आयकर अधिनियम १९६१ च्या तरतूदीनुसार कर देयतेची परिगणना करुन त्या आधारावर दरवर्षी चालू कराची तरतूद करण्यात येते.

ताळेबंदाच्या दिनांकास अधिनियमित किंवा कायम अधिनियमित कर दर तसेच कर नियम यांचा उपयोग करुन कर देय उत्पन्न आणि लेख्यानुसार उत्पन्न यामधील कालावधीतील फरकामुळे लांबणीवर टाकलेल्या देयतेची नोंद करण्यात आली आहे. लांबणीवर टाकलेल्या संपत्तीच्या वसुलीची वाजवी निश्चिती असल्यानंतरच त्याचा विचार करण्यात येतो.

## यु) रोख प्रवाह विवरणपत्र

रोखप्रवाह अप्रत्यक्ष पध्दतीचा उपयोग करुन प्रतिवेदित करण्यात आला आहे. ज्याव्दारे रोख स्वरुपात नसलेले व्यवहार पुढे ढकललेले किंवा उपार्जित भूत किंवा भविष्यातील कामापासून रोख प्राप्ती किंवा शोधन आणि गुंतवणूकीच्या किंवा वित्तीय रोख प्रवाहाशी संबंधित उत्पन्न किंवा खर्चाच्या कोणत्याही बाबी याच्या परिणामाकरिता आयकरापूर्वीचा नफा समायोजित करण्यात आला आहे. कंपनीचे कार्य, गुंतवणूक तसेच वित्तीय कार्यविधीपासूनचा रोखप्रवाह वेगवेगळा दर्शविण्यात आला आहे.

## व्ही) वस्तुसूची

कृषी विषयक कार्यविधी आणि निष्काषित केलेले कृषी उत्पादन / वनोपज यांना भारतीय लेखांकन मानक (Ind AS) -२ (वस्तुसूची) चे परिच्छेद ३ (अ) अन्वये जैविक संपत्तीमधून विनिर्दिष्टपणे वगळण्यात आल्यामुळे ते कंपनीला लागू नाही. वस्तुसूची मध्ये अंतर्भूत प्रगतीपथावरील कामांचे मूल्यांकन परिव्यय मूल्यावर आधारित आहे. कापणी प्रक्रियेच्या परिणामस्वरुप प्राप्त उत्पादन म्हणजे विक्रीसाठी तयार वनोपज मालाच्या संवरण स्कंधाचे मूल्यांकन निव्वळ वसुलीयोग्य मूल्य / रास्त मूल्याने करण्यात आले असून अशा मूल्यातील बदल त्या कालावधीच्या नफा किंवा तोटयात विचारात घेण्यात आला आहे.

## डब्ल्यू) प्रतिभाग मिळकत

समता भागधारकाचा संबंध असलेल्या चालू वर्षाचे नफा किंवा तोटयास या वर्षात शिल्लक असलेल्या समता भागाचे भारित सरासरीने भागून मूळ प्रतिभाग मिळकतीची परिगणना करण्यात आली आहे.

## एक्स) प्रस्तावित लाभांश

वार्षिक सर्वसाधारण सभेची मान्यता प्रलंबित असल्याने संचालक मंडळाने शिफारस केलेल्या लाभांशाची तरतूद लेख्यात करण्यात आली नाही. समता भागधारकांनी मान्यता दिलेल्या दिनांकास भागावरील लांभाशाची नोंद देयता म्हणून करण्यात येते.

## टिपणी - २३ विभाजनीय व्ययाचे संविभाजन

चालू वर्षातील एकूण रु.४४०८.३४ लाख (मागील वर्षी रु. ३३०२.७७ लाख) विभाजनीय व्ययापैकी रु.१८८७.८८ लाख (मागील वर्षी रु.१३४३.९९ लाख) रकमेचे ठराविक दीर्घ मुदती कार्यक्रमांवर त्या कार्यक्रमाअंतर्गत क्षेत्रीय कामावरील खर्चाचे प्रमाणात भांडवलीकरण करण्यात आले आहे.

## टिपणी - २४ पडीत जमिन विकास कार्यक्रम

शासन निर्णय क्रमांक एफएलडी- १०८६/३०३/प्रक्र-३/फ-२ दि. ३ जून १९८७, क्रमांक इजीएस-११८८/१८८/इजीएस-६ दि. ७ फेब्रुवारी १९८९ आणि क्रमांक एफडीएम-१०९०/२४००/ प्रक्र-७३/९०/फ-२ दि. १ फेब्रुवारी १९९१ नुसार शासन अर्थसहाय्याअंतर्गत त्याचप्रमाणे बँकांकडून अर्थसहाय्याअंतर्गत पडीत जमिन विकास कार्यक्रम राबविण्यात आला आहे. शासन अर्थसहाय्याअंतर्गत पडीत जमीन विकास कार्यक्रम रोजगार हमी योजना/महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोहयो सह महाराष्ट्र शासनाचा अभिकर्ता म्हणून राबविण्यात येत आहे. शासनाने आस्थापना व वरकड खर्च तसेच पडीत जमीन विकास कार्यक्रमाअंतर्गत कामाच्या खर्चासाठी पुरविलेला निधी हा प्राप्तीचे स्वरुप विचारात घेवून संचिती व अतिरेक, अप्रतिभूत ऋण तसेच ठेवी आणि अग्रिम या शिर्षाअंतर्गत विनियोजित करण्यात आला आहे आणि खर्च सुध्दा त्यानुसार संबंधित रोपवन लेख्याअंतर्गत विनियोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत प्राप्त निधीपेक्षा जास्त झालेला खर्च रु.२४७.४३ लाख, (मागील वर्षी रु. २३९.२० लक्ष) चल संपत्तीअंतर्गत येणे रकमांतर्गत दर्शविण्यात आला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत एकूण खर्चात पश्चिम नाशिक वनप्रकल्प विभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी सन २०१२-१३ मध्ये केलेल्या रु.११२.१४ लाख (मागील वर्षी रु. ११२.१४ लाख) खर्चाचा अंतर्भाव त्यांचे विरुध्द सुरु केलेल्या व प्रगतीपथावर असलेल्या चौकशीच्या निर्णयाच्या अधिन राहून आहे.

## टिपणी - २५ औषधी वनस्पती रोपवन कार्यक्रम

कंपनीच्या औषधी वनस्पती रोपवन कार्यक्रमाअंतर्गत विविध स्त्रोताअंतर्गत प्राप्त निधी ताळेबंदात " संचिती व अतिरेक " अंतर्गत दर्शविण्यात आला असून, खर्च "जैविक संपत्ती" अंतर्गत औषधी वनस्पती रोपवन कार्यविधी अंतर्गत दर्शविण्यात आला आहे. औषधी वनस्पती संवर्धन व विकास शाखेचा आस्थापना व वरकड खर्च हा औषधी वनस्पती कापणी कार्यक्रमावर दर्शविण्यात आला आहे.

## टिपणी - २६ कॅम्पाअंतर्गत कार्यक्रम / योजना

भारत सरकारने नैसर्गिक सहाय्यभूत पुनर्निर्मिती, वनव्यवस्थापन, पायाभूत सुविधांचा विकास, वन्यजीव संरक्षण व व्यवस्थापन व इतर संलग्न कार्यविधीसाठी कॅम्पाअंतर्गत प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेमार्फत निधी निर्गमित केला आहे. प्राप्त निधी व खर्च (निव्वळ खर्च) ताळेबंदात इतर चल देयता व इतर भाग — सचिंती व अतिरेक अंतर्गत अंतर्भूत करण्यात आला आहे.

## टिपणी - २७ गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय

शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी/१००९/प्रक्र-११९/फ-१ दि.२५.११.२०११ नुसार नागपूर येथे गोरेवाडा प्रकल्प कंपनीव्दारे कोणत्याही अभिकर्तृत्व वर्तना शिवाय राबविण्यात येत आहे. चालू वर्षात कंपनीला यासाठी रु. ११९९.९९ लाख (मागील वर्षी रु. २०००.०० लाख) निधी प्राप्त झाला असून कंपनीव्दारे रु. ४३८२.४२ लाख (मागील वर्षी रु. २४०९.८६ लाख) खर्च करण्यात आला आहे. शासनाकडून मिळालेला निधी हा अप्रतिभूत ऋण व अग्रीमाचे स्वरुपात नसल्यामुळे प्राप्त निधी व खर्च (निव्वळ खर्च) "इतर चल देयता" या शिर्षाअंतर्गत अंतर्भूत करण्यात आला आहे. उपयोगात न आलेल्या निधीवरील व्याज इ. असल्यास इतर उत्पन्नात अंतर्भूत करण्यात आला आहे.

## टिपणी - २८ बीज उत्पादन क्षेत्र

मखमलाबाद, तळोदा, किनवट आणि आमगांव येथील (अंदाजे) ९०.०० हेक्टर क्षेत्रावरील बीज उत्पादन क्षेत्र त्यातील संपत्तीसह वनविभागाकडून घेतले असून ते कंपनीच्या वापरात व नियंत्रणाखाली आहे. सदर क्षेत्राचे वापरासंबंधी शर्ती व अटी दि. ३१ मार्च २०२० पर्यंत ठरविण्यात आलेल्या नाहीत.

## टिपणी - २९ वृक्षकाढणी / कापणी कार्यविधी

पर्यावरण आणि वन मंत्रालय भारत सरकार यांनी वन विषयक कामास, या कार्यविधी अंतर्गत निधीच्या अधिक्यातून व्यवस्थापन आराखडयानुसार (अनिवार्य) रोपवनांची निर्मिती व देखभाल करण्याचे अधिन राहून मान्यता प्रदान केली आहे. या वर्षात कंपनीने साग रोपवन कार्यवर्तुळाअंतर्गत वृक्षकाढणी व इतर कार्यवर्तुळांतर्गत कापणी कार्यविधी राबविली आहे. या कार्यक्रमाअंतर्गत या वर्षातील एकूण खर्च व महसूल अनुक्रमे उपयोग झालेल्या मालाची किंमत व मालाची विक्री या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविलेला आहे. कंपनीने जैविक संपत्ती अंतर्गत व्यवस्थापन आराखडयानुसार (अनिवार्य) रोपवन कार्यक्रमावर रु.४३३१.७७ लाख (मागील वर्षी रु. ४३३१.५६ लाख) खर्च केला आहे. वृक्ष काढणी कार्यविधीअंतर्गत निष्कासित मालाच्या विक्रीपासून प्राप्त महसूलातून भविष्यात व्यवस्थापन आराखडयानुसार (अनिवार्य) रोपवनांची निर्मिती व देखभाल करण्यासाठी पुरेसा निधी राखून ठेवावयाचा असल्याने त्यासाठी आवश्यक असलेल्या एकूण रु.२३४६.१२ लाख (मागील वर्षी रु. २७५८.०९ लाख निधीची तरतूद लागू असलेल्या किमान वेतन दरानुसार या वर्षात करण्यात आली आहे.

## टिपणी - ३० कंपनीकडे वनक्षेत्राचे हस्तांतरण

एफडीसीएम लिमिटेडकडे हस्तांतरित केलेले वनक्षेत्र निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पत्र क्रमांक एफडीसी-१०९४/प्रक्र-५७८/फ-५ दि.११.९.१९९७ व शासन निर्णय क्रमांक एफडीसी-१०९४/ प्रक्र-५७८/फ-५ दि.२३.९.१९९७ निर्गमित केलेला आहे. भूपट्टयाच्या करारपत्राव्दारे वनक्षेत्र हस्तांतरणाच्या शर्ती व अटी शासनाव्दारे अजूनपर्यंत निश्चित करण्यात आलेल्या नाहीत.

शासन निर्णय क्रमांक एफडीसी-१०७४/६४७४६/फ-५ दि. २७ जून १९७८ चे परिच्छेद क्रमांक (IX) अन्वये भूपट्टयाच्या कराराची अंमलबजावणी किंवा प्रत्यक्षात भूपट्टयावर जमिनीचा ताबा घेणे यापैकी जे अगोदर येईल तेंव्हापासून पाच वर्षापर्यंत वार्षिक रु.१/- याप्रमाणे भाडेपट्टी एफडीसीएम लिमिटेडने द्यावयाची होती. या कालावधीच्या समाप्तीनंतर शासन निश्चित करेल त्याप्रमाणे भाडेपट्टी एफडीसीएम लिमिटेडने शासनास द्यावयाची होती. तथापि भाडेपट्टी अजूनपर्यंत निश्चित करण्यात आलेली नाही. शासन निर्णय क्रमांक एफएलडी-१०८७/२४६२/प्रक्र-३४७/फ-२ दि. ६ सप्टेंबर १९९० नुसार, एफडीसीएम लिमिटेडने वार्षिक रु.१/- प्रति खंड (ब्लॉक) प्रमाणे भूपट्टयाचे भाडे द्यावयाचे आहे. तथापि वन जमिनीचे भूपट्टयाचे करारपत्र दि.३१.३.२०२० पर्यंत झालेले नसल्यामुळे या बाबींवरील देयता निश्चित झालेली नाही, त्यामुळे यापूर्वीचे दि. २७ जून १९७८ चे शासन निर्णयानुसार दि. ३१.३.२०२० पर्यंतच्या भाडेपट्टी देयतेची तरतूद करण्यात आली आहे.

## टिपणी - ३१ कंपनीकडून वनविभागास क्षेत्राचे हस्तांतरण

चालू आर्थिक वर्षात कंपनीने वन विभागास कोणतेही क्षेत्र हस्तांतरीत केलेले नाही.

## टिपणी - ३२ कंपनीची जमीन व इमारतीचा वनविभागाव्दारे ताबा

नाशिक प्रदेशातील तत्कालीन यावल विभागातील चोपडा येथील रु २१.९० लाख (मागील वर्षी रु. २१.९० लाख) रकमेची जमीन व इमारती वनविभागाच्या ताब्यात आहेत. तथापि ही संपत्ती पूर्णपणे अवक्षयीत झालेली आहे. यासंबंधीचा मोबदला किंवा इतर काही असल्यास याबाबत अजून अंतिम निर्णय झालेला नाही आणि त्यामुळे सदर संपत्तीची मालकी अजूनही कंपनीकडें आहे.

## टिपणी - ३३ वस्तुसूची / संपत्तीची प्रत्यक्ष पडताळणी

कंपनीच्या पूर्ण मालकीच्या जमीनीवरील अचल संपत्तीचे हक्क विलेख कंपनीच्या नावे आहेत. तथापि भाडेपट्टीने घेतलेल्या जमिनीवर बांधलेल्या इमारतीच्या स्वरुपातील अचल संपत्ती जरी कंपनीच्या मालकीची असली तरी हक्क विलेख कंपनीच्या नावे नाहीत.

व्यवस्थापनाने अखेरच्या स्कंधाची / संपत्तीची प्रत्यक्ष पडताळणी वर्षअखेर केलेली नाही, तथापि यापूर्वीच्या वर्षात खालील त्रुटी आढळून आलेल्या होत्या. स्थिर संपत्ती नोंदवही ठेवण्यात आलेली असली तरी संपतीला अनुक्रमांक (कोडिंग) /लेबल लावणे (टॅगींग) इत्यादिचे काम प्रगतीपथावर आहे.

i) प्रत्यक्ष पडताळणीत मध्य चांदा वनप्रकल्प विभागात रु.३२.२९ लाख (मागील वर्षी रु. ३४.२९ लाख) किंमतीच्या वनोपज मालाच्या स्कंधात तुटीमुळे तफावत आढळून आली आहे. या प्रकरणात प्रशासकीय कार्यवाही सुरु असल्याने सदर माल "मालाचा अखेरचा निलंबन स्कंध" शिर्षा अंतर्गत ठेवण्यात आला आहे.

ii) प्राणहिता वनप्रकल्प विभागातील जिमलगट्टा विक्री आगारातील रु.५.१८ लाख ( मागील वर्षी ५.१८ लाख) किंमतीचा माल समाज विरोधी घटकाव्दारे जाळण्यात आला. या प्रकरणात प्रशासकीय कार्यवाही सुरु असल्याने सदर माल "मालाचा अखेरचा निलंबन स्कंध" शिर्षा अंतर्गत दर्शविण्यात आला आहे.

**टिपणी - ३४ कर्मचा-यांना सेवा उपदान व रजा रोखीकरण लाभासंबंधाने प्रकटन :**

अ-१) एफडीसीएम लिमी., कर्मचा-यांचे संबंधाने (वनमजूर वगळून) सेवाउपदान :-

| १ | **गृहीतक** (Assumption) | **दि.३१.०३.२०१९ रोजी** | **दि.३१.०३.२०२० रोजी** |
|---|---|---|---|
| | सवलत दर | ७.५०% | ७.२५% |
| | वेतन वृध्दी | ७.००% | ७.००% |
| २ | **दि.३१.०३.२०२० रोजी दायित्वाचे वर्तमान मूल्यातील बदल दर्शविणारा तक्ता** | | रक्कम (रुपये) |
| | वर्षाच्या सुरुवातीस दायित्वाचे वर्तमान मूल्य | ३९५६७९३०४.०० | २९००६३५०५.०० |
| | व्याज खर्च | २९६७५९४७.०० | २१७५४७६३.०० |
| | चालू सेवा खर्च | २४२२७१८७.०० | १५९४६४७२.०० |
| | शोधन केलेले लाभ | (१०६०४७२६२.००) | (६९४५२६०१.००) |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (५३४७१६७१.००) | २९५९१५५८.०० |
| | वर्ष अखेर दायित्वाचे वर्तमान मूल्य | २९००६३५०५.०० | २८७९०३६९७.०० |
| | | | |
| ३ | **दि.३१.०३.२०२० रोजी योजनांतर्गत मालमत्तेच्या रास्त मूल्यातील बदल दर्शविणारा तक्ता** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | वर्षाच्या सुरुवातीस योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ३१५१६८७०५.४२ | ४१५६६७१४०.५१ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अपेक्षित प्राप्ती | (३७४४०६१९.६३) | २६९८०६२६.९९ |
| | अंशदान | २४३९८६३१६.७२ | -- |
| | शोधन केलेले लाभ | (१०६०४७२६२.००) | (६९४५२६०१.००) |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर विमागणितीय प्राप्ती/(नुकसान) | निरंक | निरंक |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४१५६६७१४०.५१ | ३७३१९५१६६.५० |
| ४ | **योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य दर्शविणारा तक्ता** | | |
| | वर्षाच्या सुरुवातीस योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ३१५१६८७०५.४२ | ४१५६६७१४०.५१ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीची प्रत्यक्ष प्राप्ती | (३७४४०६१९.६३) | २६९८०६२६.९९ |
| | अंशदान | २४३९८६३१६.७२ | निरंक |
| | शोधन केलेले लाभ | (१०६०४७२६२.००) | (६९४५२६०१.००) |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४१५६६७१४०.५१ | ३७३१९५१६६.५० |
| | निधीची स्थिती | १२५६०३६३५.५१ | ८५२९१४६९.५० |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अंदाजित प्राप्ती पेक्षा जास्तीची प्राप्ती | निरंक | निरंक |
| | (प्रत्यक्ष प्राप्ती दर = अंदाजित प्राप्ती दर वार्षिक नूतनीकरण दिनांक ३१ मार्च रोजी आल्यामुळे) | | |
| ५ | **दि.३१.०३.२०२० रोजी विचारात घेतलेले विमागणितीय प्राप्ती/नुकसान** | | |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | ५३४७१६७१.०० | (२९५९१५५८.००) |
| | वर्षाकरिता विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान-योजनेअंतर्गत संपत्ती | निरंक | निरंक |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (५३४७१६७१.००) | २९५९१५५८.०० |
| | या वर्षातील विचारात घेतलेली | (५३४७१६७१.००) | २९५९१५५८.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | | |
| | | | |
| **६** | **ताळेबंद आणि नफातोटयाचे विवरणपत्रात विचारात घ्यावयाची रक्कम** | | |
| | वर्ष अखेर दायित्वाचे वर्तमान मूल्य | २९००६३५०५.०० | २८७९०३६९७.०० |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४१५६६७१४०.५१ | ३७३१९५१६६.५० |
| | निधीची स्थिती | १२५६०३६३५.५१ | ८५२९१४६९.५० |
| | ताळेबंदात विचारात घेतलेली निव्वळ संपत्ती / (देयता) | १२५६०३६३५.५१ | ८५२९१४६९.५० |
| **७** | **नफातोटयाच्या विवरणपत्रात विचारात घेतलेले खर्च** | | |
| | चालू सेवा मूल्य | २४२२७१८७.०० | १५९४६४७२.०० |
| | व्याज खर्च | २९६७५९४७.०० | २१७५४७६३.०० |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अपेक्षित प्राप्ती | (३७४४०६१९.६३) | (२६९८०६२६.९९) |
| | वर्षात विचारात घेतलेले निव्वळ विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (५३४७१६७१.००) | २९५९१५५८.०० |
| | नफा तोटयाचे विवरणपत्रात विचारात घेतलेला खर्च | ३७८७२०८२.०० | ४०३१२१६६.०० |

अ-२) वनमजूर संबंधाने सेवाउपदान :-

| १ | **गृहीतक** (Assumption) | **दि.३१.०३.२०१९ रोजी** | **दि.३१.०३.२०२० रोजी** |
|---|---|---|---|
| | सवलत दर | ७.५०% | ७.२५% |
| | वेतन वृध्दी | ७.००% | ७.००% |
| **२** | **दि.३१.०३.२०२० रोजी दायित्वाचे वर्तमान मुल्यातील बदल दर्शविणारा तक्ता** | | रक्कम (रुपये) |
| | वर्षाच्या सुरुवातीस दायित्वाचे वर्तमान मूल्य | १७८४६९३६८.०० | १६८७१५३३८.०० |
| | व्याज खर्च | १३३८५२०३.०० | १२६५३६५०.०० |
| | चालू सेवा खर्च | ५४८२३७०.०० | ४९९१५९९.०० |
| | शोधन केलेले लाभ | (१७७१५१३५.००) | (२७४१५२४४.००) |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (१०४५१५६४.००) | १०४९७८७३.०० |
| | वर्ष अखेर दायित्वाचे वर्तमान मूल्य | १६९१७०२४२.०० | १६९४४३२१६.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | **दि.३१.०३.२०२०२० रोजी योजनांतर्गत मालमत्तेच्या रास्त मूल्यातील बदल दर्शविणारा तक्ता** | | |
| | वर्षाच्या सुरुवातीस योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ३७५९८३९५.१९ | ५९७०१०८४.६२ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अपेक्षित प्राप्ती | २५८०८२९.८० | ३३४७९१२.५० |
| | अंशदान | ३७२३६९९४.६० | -- |
| | शोधन केलेले लाभ | (१७७१५१३५.००) | (२७४१५२४४.००) |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर विमागणितीय प्राप्ती/(नुकसान) | निरंक | निरंक |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ५९७०१०८४.६२ | ३५६३३७५३.२० |
| | | | |
| ४ | **योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य दर्शविणारा तक्ता** | | |
| | वर्षाच्या सुरुवातीस योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मुल्य | ३७५९८३९५.१९ | ५९७०१०८४.६२ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीची प्रत्यक्ष प्राप्ती | २५८०८२९.८३ | ३३४७९१२.५८ |
| | अंशदान | ३७२३६९९४.६० | -- |
| | शोधन केलेले लाभ | (१७७१५१३५.००) | (२७४१५२४४.००) |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ५९७०१०८४.६२ | ३५६३३७५३.२० |
| | निधीची स्थिती | (१०९४६९१५७.३८) | (१३३८०९४६२.८०) |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अंदाजित प्राप्ती पेक्षा जास्तीची प्राप्ती | निरंक | निरंक |
| | (प्रत्यक्ष प्राप्ती दर = अंदाजित प्राप्ती दर वार्षिक नूतनीकरण दिनांक ३१ मार्च रोजी आल्यामुळे) | | |
| | | | |
| ५ | **दि.३१.०३.२०२० रोजी विचारात घेतलेले विमागणितीय प्राप्ती/नुकसान** | | |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | १०४५१५६४.०० | (१०४९७८७३.००) |
| | वर्षाकरिता विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान योजनेअंतर्गत संपत्ती | निरंक | निरंक |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (१०४५१५६४.००) | १०४९७८७३.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | या वर्षातील विचारात घेतलेली विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (१०४५१५६४.००) | १०४९७८७३.०० |
| | | | |
| ६ | **ताळेबंद आणि नफातोटयाचे विवरणपत्रात विचारात घ्यावयाची रक्कम** | | |
| | वर्ष अखेर दायित्वाचे वर्तमान मूल्य | १६९१७०२४२.०० | १६९४४३२१६.०० |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ५९७०१०८४.६२ | ३५६३३७५३.२० |
| | निधीची स्थिती | (१०९४६९१५७.३८) | (१३३८०९४६२.८०) |
| | ताळेबंदात विचारात घेतलेली निव्वळ संपत्ती / (देयता) | (१०९४६९१५७.३८) | (१३३८०९४६२.८०) |
| | | | |
| ७ | **नफातोटयाच्या विवरणपत्रात विचारात घेतलेले खर्च** | | |
| | चालू सेवा मूल्य | ५४८२३७०.०० | ४९९१५९९.०० |
| | व्याज खर्च | १३३८५२०३.०० | १२६५३६५०.०० |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अपेक्षित प्राप्ती | (२५८०८२९.८३) | (३३४७९१२.५८) |
| | वर्षात विचारात घेतलेले निव्वळ विमागणितीय (प्राप्ती)/ नुकसान | (१०४५१५६४.००) | १०४९७८७३.०० |
| | नफा तोटयाचे विवरणपत्रात विचारात घेतलेला खर्च | ५८३५१७९.०० | २४७९५२०९.०० |

**ब)** कर्मचा-यांना रजा रोखीकरण निवृत्ती लाभ, भारतीय आर्युविमा महामंडळाशी संलग्न करण्यात आले आहे. तथापि यासंबंधाने प्रकटीकरण करण्यासाठी आवश्यक माहिती पुरविण्यास आयुर्विमा महामंडळाने असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे लेखा मानकानुसार प्रकटीकरण करता येवू शकले नाही.

## टिपणी - ३५ कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर)

कंपनीने कॉर्पोरेट सामाजीक उत्तरदायीत्व कार्यविधी (**CSR**) व्यवस्थापनासाठी एफडीसीएम सी एस आर ट्रस्टची स्थापना केली आहे. एफडीसीएम सीएसआर ट्रस्टला केलेले अंशदान व सीएसआर खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

( रु.कोटीत )

| तपशील | ३१ मार्च २०२० रोजी | ३१ मार्च २०१९ रोजी |
|---|---|---|
| चालू वर्षात खर्च करावयाची रक्कम | २.५५ | २.०४ |
| मागील वर्षातील उपलब्ध रक्कम | -- | -- |
| एकूण | २.५५ | २.०४ |
| चालू वर्षात एफडीसीएम सीएसआर ट्रस्ट ला केलेले अंशदाना पोटी खर्च | २.५५ | २.०४ |

## टिपणी - ३६ क्षतिपूर्ती दावे / शासन किंवा शासकीय यंत्रणाकडून इतर येणे रकमा

संचालक मंडळाच्या निर्देशाप्रमाणे कंपनीची मालमत्ता/रोपवनाचे रु ७६.६३ लाख (मागील वर्षी रु. ११०७.७६ लाख) रकमेच्या क्षतीपूर्ती दाव्याचे या वर्षात लेखांकन करण्यात आले आहे. (टिपणी क्र. १६ पहावी)

तसेच महाराष्ट्र शासन/इतर य़ंत्रणाकडून महामंडळाला क्षतिपूर्ती दाव्यापोटी रु २९१३३.०४ लाख (मागील वर्षी २९१५६.३६ लाख) इतकी रक्कम येणे आहे. (टिपणी क्र. ३ पहावी).

सदर प्रकरणात वसुलीसाठी महाराष्ट्र शासन वा इतर य़ंत्रणाकडे कंपनीद्वारे पाठपुरावा सुरु आहे. येणे असलेल्या रक्कमा शासन किंवा शासकीय यंत्रणाकडून येणे असल्यामुळे येणे रक्कमा दिर्घकाळ प्रलंबित असल्या तरी संदिग्ध म्हणून कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

## टिपणी - ३७ उपयोगात न आलेल्या निधीवर व्याज व इतर उत्पन्न

निधीच्या गुंतवणूकीवरील प्राप्त व्याज इतर उत्पन्नात अंतर्भूत करण्यात आले आहे. ज्याठिकाणी शासन निधी पुरविणा-या यंत्रणेकडून स्पष्ट सूचना असतील त्याठिकाणी प्राप्त व्याज हे देयता / इतर देणे म्हणून दर्शविण्यात आले आहे.

शासनास देय असलेली रक्कम तसेच राबविण्यात येत असलेल्या काही ठराविक योजनेअंतर्गत उपयोगात न आलेल्या इतर शासन निधीवर शासनाचे कोणत्याहि निर्देशाअभावी व्याजाची तरतूद करण्यात आलेली नाही.

## टिपणी - ३८ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास कायदा २००६

कंपनीकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारित दि. ३१.३.२०२० रोजी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास कायदा २००६ अंतर्गत नोंदणीकृत कोणतेही सूक्ष्म, लघु, आणि मध्यम कंत्राटदार/ पुरवठाधारक व सेवा देणारे नाहीत.

## टिपणी - ३९ खंड प्रतिवेदन –

कंपनीची मुख्य कार्यविधी ही रोपवन निर्मिती असल्यामुळे लेखांकनासंबंधी स्वतंत्र प्रतिवेदन देण्यायोग्य खंड नाही.

## टिपणी - ४० संबंधित पक्षकार व्यवहार प्रकटन -

(अ) **संबंधित पक्षकारांची यादी**

(I) **व्यवस्थापकीय प्रमुख व त्यांचे नातेवाईक**

श्री एन. वासुदेवन, व्यवस्थापकीय संचालक

डॉ. एन. रामबाबू तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक

**(II) इतर अस्तित्व**

अ) एफडीसीएम लि एम्प्लॉइज जीजीसीए स्किम

ब) एफडीसीएम सीएसआर ट्रस्ट

**(ब) वरील संबंधित पक्षकारांसोबत केलेल्या व्यवहाराचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.**

**व्यवस्थापकीय प्रमुख व त्यांचे नातेवाईकांसोबत केलेले व्यवहार:-**

व्यवस्थापकीय संचालक हे कंपनीचे व्यवस्थापकीय प्रमुख म्हणून संबंधित पक्षकार आहेत. व्यवस्थापकीय संचालक यांना वेतन व भत्यांच्या शोधना व्यतिरिक्त संबंधित पक्षकार संबंधाने या वर्षात कोणतेही व्यवहार नाहीत.

| अ.क्र. | वर्ष २०१८-१९ | व्यवस्थापकीय प्रमुख | कालावधी | वेतन व भत्ते (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. एन. रामबाबू | व्यवस्थापकीय संचालक | १.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ | ३०.२६ |
| अ.क्र. | वर्ष २०१९-२० | व्यवस्थापकीय प्रमुख | कालावधी | वेतन व भत्ते (रुपये लाखात) |
| १ | डॉ. एन. रामबाबू | व्यवस्थापकीय संचालक | १.०४.२०१९ ते ३१.०३.२०२० | ३२.५५ |

**सामायिक नियंत्रणातील भागासंबधी व्यवहार**

(रु कोटीत)

| अ.क्र. | वर्ष | एफडीसीएम सी एस आर ट्रस्ट | एफ. डी. सी. एम. लि. एम्प्लॉइज जी.जी.सी.ए. स्किम |
|---|---|---|---|
| | **२०१८-१९** | | |
| १ | वित्तीय वर्षाकरिता अंशदान | २.०४ | १६.९६ |
| | **२०१९-२०** | | (रु कोटीत) |
| १ | वित्तीय वर्षाकरिता अंशदान | २.५५ | २०.५० |

**टिपणी - ४१ प्रती भाग मिळकत —**

समता भाग धारकांचा संबंध असलेल्या कालावधीकरिता निव्वळ नफ्यास या कालावधीत शिल्लक असलेल्या समता भागाचे भारित सरासरीने भागून मूळ प्रतिभाग मिळकतीची परिगणना करण्यात आली आहे. तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| प्रती भाग मिळकत | २०१९-२० | २०१८-१९ |
|---|---|---|
| कर आणि अनिवार्य संचिती चे तरतूदीनंतर निव्वळ नफा | रु.१३७०.४४ लाख | रु.७९४३.६५ लाख |
| भारित सरासरी समता भागाची संख्या | ३२३१२३४८ | ३२३१२३४८ |
| प्रती भाग मूळ / मिश्रीत मिळकत | रु. ४.२४ | रु. २४.५८ |

## टिपणी - ४२ लांबणीवर टाकलेली कर संपत्ती (निव्वळ)

(रु.लाखात)

| तपशील | चालू वर्ष अखेर दिनांक ३१.०३.२०२० रोजी | मागील वर्ष अखेर दिनांक ३१.०३.२०१९ रोजी |
|---|---|---|
| **लांबणीवर टाकलेली कर संपत्ती** | | |
| संदिग्ध ऋणाकरिता तरतूद | १.८३ | ४.६६ |
| कर्मचारी भविष्य निर्वाह निधी करिता तरतूद | ६.७९ | १५.९६ |
| संपत्ती, यंत्रे व उपकरणावरील घसारा | ४.९० | १५.४० |
| **एकूण** | **१३.५२** | **३६.०२** |
| **लांबणीवर टाकलेली कर देयता** | -- | -- |
| **लांबणीवर टाकलेली कर संपत्ती/(देयता) (निव्वळ)** | **१३.५२** | **३६.०२** |
| **चालू वर्षी लांबणीवर टाकलेला कर** | **२२.५०** | **३.१२** |

## टिपणी - ४३ बँकेतील शिल्लक / बँक हमी

बँकेतील शिल्लकेत गुंतवणूक केलेल्या दिवसापासून एक वर्षापेक्षा जास्त कालावधी नसलेल्या बँकेतील अल्पमुदती ठेवींचा समावेश आहे. रु. ७६.९८ लाख रकमेच्या (मागील वर्षी रु.८३.५१ लाख) अल्पमुदती ठेवी बँक हमी घेण्यासाठी बँकांकडे तारण ठेवण्यात आलेल्या आहेत.

## टिपणी - ४४ संपत्तीची हानी -

संपत्तीचे बिघाड / नुकसान याबाबत सूचना आहे किंवा कसे यासंबंधाने ताळेबंदाचे दिवशी कंपनीने संपत्तीचे निर्धारण केले आहे. ताळेबंदाच्या दिवशी संपत्तीला बिघाड /हानी झाल्याबाबत कोणतीही सूचना नाही.

## टिपणी - ४५ आयकर तरतूद

(रु. लाखात)

| आयकराची तरतूद | २०१९-२० | २०१८-१९ |
|---|---|---|
| सुरुवातीची शिल्लक | १७४०४.०० | १४१२९.०० |

| | | |
|---|---|---|
| चालू वर्षातील भर | १०५०.०० | ३२७५.०० |
| एकूण | १८४५४.०० | १७४०४.०० |
| वजा: चालू वर्षातील समायोजना | -- | -- |
| अखेरची शिल्लक | १८४५४.०० | १७४०४.०० |

उत्पन्नाची कृषी तसेच अकृषी या दोन भागात विभागणी करुन प्रत्येक भागाअंतर्गत येणा-या उत्पन्न व खर्चाच्या सर्व ओळख योग्य बाबी विचारात घेवून त्या आधारावर आयकराकरिता रु.१०५०.०० लाख ( मागील वर्षी रु. ३२७५.०० लाख ) रकमेची तरतूद करण्यात आली आहे. सामान्य स्वरुपाच्या महसूली खर्चाची विभागणी प्रत्येक भागावर अशा विभागणीपूर्वी त्या भागातील एकूण प्राप्तीचे आधारे करण्यात आली आहे.

## टिपणी - ४६ संभाव्य देयता

तरतूद न केलेली संभाव्य देयता आणि कंपनी विरुध्द केलेल्या दाव्याचे संबंधात न स्विकारलेल्या देयता :-

ए) i) कंपनीच्या मालकीची/कंपनीचे ताब्यात असलेली काही जमीन, ईमारती इत्यादी वरील नगरपालिका विषयक आणि इतर स्थानिक करासंबंधी, निर्धारण प्रलंबित असल्यामुळे तसेच काही प्रकरणात देयता स्विकृत न केल्यामुळे :- याबाबत देयता रक्कम स्पष्ट करण्यासारखी नाही.

ii) सन १९९२-९३ ते २०१९-२० या वर्षाकरिता आगार विभाग बल्लारशाचे बाबतीत नगर परिषद करासंबंधी रु. ८१.३१ लाख (मागील वर्षी रु.६४.७९ लाख) रकमेची देयता समुचित प्राधिका-यांकडे अपील प्रलंबित असल्यामुळे कंपनीने स्विकृत केलेली नाही.

iii) जमीन महसूल जर काही असल्यास.

बी) ताळेबंदाचे दिवशी भांडवली कार्यावरील अंमलबजावणीस शिल्लक असलेल्या कराराची तरतूद न केलेली अंदाजित रक्कम :- निरंक.

सी) i) पात्र मजूरांसाठी या अगोदरच्या वर्षाची भविष्य निर्वाह निधीचे संबंधात जर काही देयता असल्यास.

ii) विविध वनप्रकल्प विभागाअंतर्गत कंपनीव्दारे मजूरांच्या भविष्य निर्वाह निधीचे शोधनात अनियमितता /शोधन न करणे या संबंधाने भविष्य निर्वाह निधी आयुक्त, नागपूर यांनी आकारलेल्या नुकसान भरपाई बाबत देयता रु. २०८६.९८ लाख (मागील वर्षी रु.१८८४.२३ लाख) सदर प्रकरणात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अपील न्यायाधिकरण, नवी दिल्ली यांचे निर्देशानुसार पुढील निर्णयाचे अधिन राहून कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

iii) मजूरांचे संबंधाने उपदानाबाबत जर काही देयता असल्यास.

iv) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे आदेशान्वये किनवट वनप्रकल्प विभागातील मजूरांना कामावरुन कमी करण्याच्या बाबतीत देयता रु.२६.३४ लाख (मागील वर्षी रु.२६.३४ लाख) आणि श्री. के.डी.चव्हाण वनमजूर यांच्यावर झालेल्या वन्य प्राण्याच्या हल्ल्यामुळे नुकसान भरपाई संबंधाने श्रम न्यायालय नांदेड यांचे प्रकरण क्रमांक डब्ल्यू.सी.ए /११/२००० मधील आदेशानुसार व कंपनीने केलेले अपील प्रलंबित असल्याने देयता रु. ०.८३ लाख.

v) कर निर्धारण वर्ष २०१०-११ व २०११-१२ संबंधाने मूल्य वर्धित कराची देयता रु. १९.५४ लाख (मागील वर्षी रु.१३.५३ लाख)

डी) विक्रीकर / मूल्यवर्धित कर निर्धारण प्रलंबित असल्यामुळे/लांबणीवर टाकल्यामुळे व्याज, भूर्दंड इ. बाबत जर काही देयता असल्यास.

ई) कर्मचारी/मजूर यांच्या विविध मागण्या अभिनिर्णयासाठी प्रलंबित असल्यामुळे, त्याबाबत देयता निश्चित करता येण्यासारखी नाही.

एफ) रोपवन क्षेत्रातील उभ्या झाडांची प्रत्यक्ष पडताळणी न झाल्यामुळे काही संभाव्य नुकसान इत्यादी असल्यास.

जी) टिपणी क्र. २८ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे बीज उत्पादन क्षेत्रासंबंधी निर्धारित न केलेला मोबदला :- रक्कम निश्चित करता येण्यासारखी नाही.

एच) मा. श्रम न्यायालय यांचे तक्रार क्र.युएलपी क्र.२७/२०१४ मधील आदेशानुसार नाशिक प्रदेशातील नंदूरबार विभागातील श्री.एस.जे.बारजिभे वनरक्षक यांना वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त केल्याने, अपील प्रलंबीत असल्याने वेतन व भत्ते यांची देयता अंदाजे रु. २१. ६१ लाख. ( मागील वर्षी २१.२५ लाख )

आय) मा. श्रम न्यायालय तृतीय नागपूर यांनी प्रकरण क्र.पीजीए/३/२०१३ अन्वये दि. २८.९.२०१५ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार श्री. के.जी.सहारे मजूर नागपूर वन प्रकल्प विभाग यांना सेवा उपदानाचे संबंधाने, कंपनीने दाखल केलेले अपील प्रलंबीत असल्याने देयता रु ०.९७ लाख.

जे) एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड (सहाय्यक कंपनी) ने दावा केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम रु. ४९४८८८९७/- अद्यापही कंपनीने मान्य केलेली नाही. कंपनी व त्याच्या सहाय्यक कंपनीची एकत्रित वित्तीय विवरणपत्रे तयार करतांना वरील रकमेची रु. ४९४८८८९७/- सहाय्यक कंपनीच्या इतर वित्तीय संपत्ती अंतर्गत एफडीसीएम कडून येणे दर्शविली असली तरी ते कमी करण्याच्या दृष्टीने line by line भर घालतांना विचारात घेतलेली नाही कारण खर्चाची प्रतीपूर्ती प्रक्रियेत असल्याने कंपनीच्या लेखा पुस्तकात देय म्हणून

स्विकृत केलेली नाही. सदर रक्कम भाग म्हणून एकत्रित करुन एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रात दर्शविण्यात आली आहे.

के) आगार विभाग बल्लारशाह येथील आकस्मिक कामगारांना कामावरुन कमी केल्याचे विरोधात कामगारांनी मा. सुप्रीम कोर्टात दाखल केलेली विशेष याचिका क्र. एसएलपी/८८३६/२०१५ प्रलंबीत असल्याने अंदाजे देयता रु. ३२.५७ लाख (मागील वर्षी रु. ३२.५७ लाख).

एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड च्या बाबतीत :-

अ) एस्सेल वर्ल्ड लिझर प्रायव्हेट लि. (ELPL) ने कंपनीच्या वतीने केलेल्या रु. ७९८२०८९/- (वस्तू व सेवाकर वगळून) खर्चाचा दावा केलेला आहे. संचालक मंडळाने ठरविलेल्या कार्य पध्दतीनुसार अशा दाव्यांची तपासणी ह्या उद्देशासाठी संचालक मंडळाने स्थापन केलेल्या समितीकडून करावयाची आहे. अशा खर्चाचे लेखांकन आकस्मिक व मंजुरीवर अवलंबून आहे. (मागील वर्षी :- निरंक)

ब) भांडवली कार्यावरील अंमलबजावणीस शिल्लक असलेल्या कराराची तरतूद न केलेली अंदाजित रक्कम रु. ११९०५०९३६.१६ (मागील वर्षी ७४५६७१७३.९०) (कंपनीच्या स्थापनेनंतर कंपनीने पहिल्या टप्याशी संबंधित कामाच्या निविदा काढल्या. रु. २०१२५४४१३.७४ चे कार्य आदेश संबंधितांना देण्यात आले असून त्यापैकी रु. ८२२०३४७८/- चे शोधन संबंधितांना दि. ३१ मार्च २०२० पर्यंत करण्यात आले आहे.)

## टिपणी - ४७ संकिर्ण / इतर महत्वाच्या बाबी :-

अ) व्यापारी येणे अंतर्गत विविध लेख्यातील वैयक्तिक शिल्लक, येणे रकमा आणि इतर येणे विकलनाधिक्य यांस पुष्टी मिळालेली नाही.

ब) रोख व बँकेतील शिल्लक रकमेच्या आधिक्यात गोंदिया वन प्रकल्प विभागातील रोख रकमेची लुटमार झालेल्या रु.३.२२ लाख भरणा न केलेल्या महसूलाचा (मागील वर्षी रु.३.२२ लाख) समावेश आहे. सदर प्रकरणी विभागीय चौकशीची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही.

क) अल्पमुदती ऋण व अग्रिम यात कर्मचा-यांकडून वसूलीयोग्य नामंजूर प्रमाणकांची रक्कम रु.१०८.२९ लाख (मागील वर्षी रु.६७.८२ लाख) चा समावेश आहे.

ड) कंपनीच्या आधीच ताब्यात असलेल्या जमिनीच्या अनुषंगाने जमीन महसूल इ. देय असल्यास त्या संबंधाने कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

इ) जनहित याचिका क्रमांक ३४२१५ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ यांनी तत्कालिन खामगाव वन प्रकल्प विभागातील रोजगार हमी योजना संबंधाने विशेष लेखा परीक्षण करण्याचे निर्देश दिलेले असून मे. ए.एस. दाणी आणि कंपनी सनदी लेखापाल यांनी त्यांचा अहवाल सादर केलेला आहे व प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

फ) वितरकाना खर्चासाठी दिलेले अग्रिम वितरकाचे पदनामाने बँकेत खाते उघडून हाताळण्यात येत असून ऋण व अग्रिम अंतर्गत वर्गीकृत करण्यात आले आहे.

ग) ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या वर्षाच्या कंपनीच्या लेख्यांवरील भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या टिप्पणीच्या अनुपालनानुसार चालू वर्षी सातव्या वेतन आयोगानुसार थकबाकीची तरतूद करण्यात आली आहे.

ह) चालू वर्षी कर्मचा-यांना प्रोत्साहनपर रकमेसाठी रु. ६.०० कोटी (अंदाजे) ची तदर्थ तरतूद करण्यात आली आहे.

च) कोविड १९ (महामारीमुळे) दि. २५ मार्च २०२० रोजी सुरु झालेल्या टाळेबंदीमुळे देशभरातील आर्थिक गतीविधीमध्ये महत्वपूर्ण कमी होऊन त्याचे परिणामस्वरुप कंपनीचा व्यवसाय प्रभावित होऊन त्याचा परिणाम वित्तीय विवरण पत्रावर झाला आहे.

छ) एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड ने त्यांच्या लेखापरीक्षित वित्तीय विवरणपत्रात त्यांच्या पातळीवर चालू संकल्पना आधार (going concern) ह्या गृहीतकाचे बाबतीत कोणतीहि अनिष्ट सूचना नसल्याचे प्रतिवेदीत केले आहे.

**टिपणी क्र. ४८:- <u>सहाय्यक कंपन्या</u>**

**(अ)** दि. ३१ मार्च २०२० रोजी सहाय्यक कंपनीची यादी खालील प्रमाणे आहे:-

| **कंपनीचे नांव** | **संस्थापन देश** | **एफडीसीएमलिचा दि. ३१ मार्च रोजीचा धारणाधिकार** | | **दि. ३१ मार्च रोजी अल्पसंख्य हितसंबंध** | | **एकत्रिकृत केल्याप्रमाणे** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **२०२०** | **२०१९** | **२०२०** | **२०१९** | |
| एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमिटेड | भारत | ५१% | ५१% | ४९% | ४९% | सहाय्यक कंपनी |

एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड झू प्रायव्हेट लिमिटेड ही दि. १४.११.२०१८ रोजी स्थापन झालेली एकमेव सहाय्यक कंपनी आहे.

(ब) सहाय्यक कंपनीची संक्षिप्त वित्तीय माहिती खालील प्रमाणे आहे.
सहाय्यक कंपनीची प्रकट केलेली रक्कम आंतर कंपनी कमी करण्यापूर्वीची आहे.

अ) सहाय्यक कंपनीचे व्यवसायाचे प्रमुख स्थान :- भारत

ब) धारण केलेल्या अल्पसंख्य हितसंबंधाव्दारे (NCI) स्वामित्वाचे प्रमाण:- ४९%

क) धारण केलेल्या अल्पसंख्य हितसंबंधाव्दारे (NCI) मतदान अधिकाराचे प्रमाण:- ४९%

| तपशील | ३१ मार्च २०२० (रुपये) | ३१ मार्च २०१९ (रुपये) |
|---|---|---|
| अल्पसंख्य हितसंबंध % | ४९% | ४९% |
| सूत्रधारी कंपनीचे हितसंबंध | ५१% | ५१% |
| संक्षिप्त ताळेबंद | | |
| अचल संपत्ती | १३८३५५८८० | ४५३२६५१३ |
| चल संपत्ती | ६७२२६९९५ | ५२५३६०८७ |
| एकूण संपत्ती | २०५५८२८७५ | ९७८६२६०० |
| चल देयता | ५५११५७७८ | ४७३८३७०३ |
| निव्वळ संपत्ती | १५०४६७०९७ | ५०४७८८९७ |
| समता भाग | १५०४६७०९७ | ५०४७८८९७ |
| संचित अल्पसंख्य हितसंबंध | ७३७२८८७८ | २४७३४६६० |
| सूत्रधारी कंपनीचे संचित हितसंबंध | ७६७३८२१९ | २५७४४२३७ |
| अल्पसंख्य हितसंबंधाशी संबधित नफा/तोटा | | |
| समावेशक उत्पन्न | निरंक | निरंक |
| सहाय्यक कंपनीचा तोटा | (११८००) | (१००००) |
| अल्पसंख्य हितसंबंधाशी संबंधित तोटा | (५७८२) | (४९००) |
| सूत्रधारी कंपनीचे हितसंबंधाशी संबंधित तोटा | (६०१८) | (५१००) |
| **सहाय्यक कंपनीचा रोख प्रवाह** | | |
| चालू कार्यापासून रोख प्रवाह | ७५१६१५७ | ४७३७३७०३ |
| गुंतवणूक कार्यविधीपासून रोख प्रवाह | (९३०२९३६७) | (४५३२६५१३) |
| वित्तीय कार्यविधीपासून रोख प्रवाह | १००००००००० | १०००००० |
| रोख आणि रोख सममूल्य यामध्ये निव्वळ वाढ | १४४८६७९० | ३०४७११९० |

## टिपणी - ४९ पुन:र्गट आणि फेर मांडणी

ताळेबंद, समावेशक उत्पन्नासह नफातोटापत्रक आणि रोख प्रवाह विवरणपत्र व भाग भांडवलातील बदल व त्यांचेशी संबंधित असलेल्या टिपणीमधील मागील वर्षाचे आकडे आवश्यक त्या ठिकाणी पुनर्गट आणि फेर मांडणी करुन घेतलेले आहेत. आर्थिक विवरण पत्रातील आकडेवारी जवळच्या रुपयात दर्शविण्यात आली आहे.

एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचा अविभाज्य भाग असलेले टिपणी क्र. १ ते ४९ करिता स्वाक्षरी.

**आमचे सम दिनांकाचे संलग्न अहवालानुसार**

रतन चांडक आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. १०८६९६ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए सुधीर बाहेती)
भागीदार
स.क्र.०४२७११

शाह बाहेती चांडक आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए जय पोपटानी)
भागीदार
स.क्र.१३५०३८

स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०

**संचालक मंडळाचे वतीने व करिता**

स्वाक्षरित
(डॉ. एन. रामबाबू)
संचालक
सं.ओ.क्र # ०८१३५५०७

स्वाक्षरित
(एन. वासुदेवन)
व्यवस्थापकीय संचालक
सं.ओ.क्र # ०८९४०३१९

स्वाक्षरित
(सीएस सौरव सिंह)
कंपनी सचिव
ए-२२०५३

स्थळ : नागपूर
दिनांक : २९.१२.२०२०